नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

युगवाणी

वर्ष एकेचाळीसावे | अंक ९/१० | सप्टेंबर/आक्टोबर '८९

अनुक्रम

● संपादक : प्रकाश देशपांडे कार्यकारी संपादक : केशव जोशी

● संपादक मंडळ : भा. ल. भोळे, इंदुमती शेवडे, अ. द. वेलणकर, पंकज चांदे, अक्षयकुमार काळे

● विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या युगवाणीस महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त झाले आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२

कस्तुरीमृग

पद्‌माकर पाटील

अ ने सिग्रेटीचा लांब झुरका घेतला अन् ओठांचा चंबू करून हळूहळू तोंडावाटे धुराची वलये बाहेर फेकू लागला.

"मला हे असं धुरात वेढून स्मोकिंग करणं आवडतं. भर्रकन धुराचा सूर फेकून देणं ह्याला काय स्मोकिंग करणं म्हणतात ? छ्या ! "

"ज्याची त्याची आवड असते. अन् प्रत्येकाची मतं वेगवेगळी असू शकतात." ब ने कॉफीचा कप बशीत ठेवीत म्हटलं. हातातल्या रुमालाची घडी ओठ टिपून घेण्यासाठी ओठांवर ठेवून पुन्हा मांडीवर पसरविली.

"आता हे पहा—समोरच्या भिंतीवरचं ते पेंटिंग कसलं आहे ?" ब अधिक उल्हासात आला.

"मी जेव्हाजेव्हा येथे आलोय तेव्हातेव्हा हे हरिणाचंच चित्र आहे असं मला जाणवतंय. आयला, मॉडर्न आर्ट म्हणजे गंमत आहे नाही ?" अ ने सिग्रेट समोरच्या ॲश-ट्रेत झटकत म्हटलं.

"अगदी बरोबर. हे हरिणाचंच चित्र आहे. पण, हा हरीण म्हणजेच मृग—साधा नाही तर, कस्तुरीमृग आहे !"

"म्हणजे मृग समजा वा कस्तुरीमृग समजा."

"ऑफकोर्स ! थोडक्यात, तुझी ह्या स्मोकिंगच्या बाबतीत जशी मतं आहेत तशीच इतरांचीही असू शकतात असं थोडंच आहे. ती विरुद्धही असू शकतात. जशी ह्या पेंटिंगच्या बाबतीतही असू शकतात. इज इट राईट ?"

"एस्ऽ" अ च्या तोंडातून का कुणास ठाऊक एकदम धुराळा बाहेर पडला. तो ठसठसत हसला.

अ, ब दोघंही खळखळून हसलेत.

ब च्या चेहऱ्यावर आतलं म्हणणं अ ला [illegible]- त्याचा आनंद पसरला. वास्तविक [illegible] गोष्ट होती.

"कस्तुरीमृग म्हणजे नवलच नाही ? म्हणजे स्वतःपाशीच स्वतःच्या बेंबीशी कस्तुरी असून त्याचा शोध मात्र तो चौफेर घेत हिंडतो." अ.

"हा वेडेपणा की, निसर्गाची मूळ [illegible]-घडणच. कुणास ठाऊक" ब.

अ ने बाजूच्या बंद काचेतनं रस्त्यावर वर्दळीत पाहिलं नि मग, मनगट पुढे करून घड्याळावर नजर टाकली.

"वास्तविक ती आतापर्यंत यायला हवी होती."

"बायकांचं हे असंच—" ब थोडा थांबला नि मग तोही काचेतनं दूरवर रस्त्यावरच्या वर्दळीत पहात बोलला, "आज आपण प्रथमच दोघं परस्परांना आपापल्या प्रेयसींची ओळख करून देतोय नाही ? पण, नेमका उशीर होतोय."

अ नि ब दोघंही चिंतातूर झाले.

"अरे, चोरूनलपून भेटायचं म्हणजे हा असा थोडा मागेपुढे उशीर होणारच." अ ने स्वतःलाच समजविल्यासारखं ब ला म्हटलं.

"आपल्या दोघांच्याही प्रेयसी विवाहित आहेत. हे साम्य म्हणजे योगायोगच नाही ?" ब उगाच हसला.

"अन् आपणही मुलंबाळंवाले आहोत हेही साम्यच !"

अ, ब दोघंही खळखळून हसलेत.

आता रेस्टॉरंटात बरीच गर्दी जमून होती. जवळजवळ सारेच टेबल्स् पुरुष—स्त्रियांनी भरून

होते. स्टिरिओवर कुठलीशी मंदमधुर धून छेडली जात होती.

"बाय द वे, तुझी बायकोमुलं कशी आहेत सध्या ?"

"ठीक आहेत झालं !" ब सुस्कारा सोडीत बोलला. त्याच्या बोलण्यात मनातली नाराजी डोकावून गेली.

"काल तर तिचं नि माझं चांगलचं भांडण झालं. साध्याशा कारणावरून." ब च्या कपाळाला आठया पडल्यात. तो दुसरीकडे शून्यात पाहू लागला.

"भाडणं व्हायचीच संसारात, आमचीही होतात." अ ने आता दुसरी सिग्रेट पेटविली.

ब अतिशय दुःखी झाला. क्षणभर त्याने डोळे मिटून डाव्या हाताची बोटे भुवया-पापण्यांवरून फिरविलीत नि मग डोळे उघडून बाजूच्या काचेरी चौकटीत पाहू लागला.

काचेतनं त्याच्या पुढयात कालची सकाळ डोकावू लागली, तसतसा तो अस्वस्थ होत गेला. मग, स्वतःशीच काहीसं हलकेसं पुटपुटला. भ्रमिष्टासारखा.

काचेतली धूसर सकाळ क्षणात हळूहळू विरघळत गेली.

आता काच स्पष्ट दिसू लागली.

"व्हॉट इज ए मॅटर ?"

अ च्या नजरेतनं ब चा नर्व्हसनेस् सुटला नाही.

"कालचा सॅटरडे असल्यामुळे पोराची मॉर्निंग स्कूल होती. शाळेची वेळ झाली तरी रिक्षा घरी आला नाही ही म्हणे, तुम्ही त्याला शाळेत सोडून द्या. मी म्हणे तू पोहोचवून ये. बस् ! एवढयावरून कुठल्याकुठे कडाक्याचं भांडण पोहोचलं. फुलीश !"

ब ने मांडीवरच्या रुमालानं चेहरा पुसल्यासारखा केला. पुढयातला ग्लास ओठाशी धरून आतलं उरलं पाणी प्राशन केलं. मग, एकदम ताण सैल झाल्यासारखा तो ऐसपैस बसला. अ च्या नजरेला नजर भिडवून क्षणभरानं उगाच स्मितला.

"अरे माझी बायकोही अशीच ! थोडयाथोडया गोष्टींवरून भांडते. मी तर तिची केअर करीतच नाही. अपना, खाओपिओ मजा करो !"

अ ने धुराची वलये काढलीत. त्या वलयांकडे नि मग ब कडे पहात तो बोलला, "वुई आर सेलिंग इन द सेम बोट ?" अन् तो हसला.

ब ने नुस्तंच अ कडे पाहिलं नि मग तो रेस्टॉरंटातल्या लोकांत नि पुन्हा बाहेर काचेतनं रस्त्यावरच्या वर्दळीत पाहू लागला.

"ही सुद्धा आतापर्यंत यायला हवी होती." ब काहीसा आत्मविश्वासानं बोलला.

"ही प्रचंड महानगरी. कोण कुठल्या कुठल्या टोकाला राहतो. त्यात लोकलसचं जाळं. प्रचंड वर्दळ. थोडासा उशीर होणारच बाबा. शिवाय नवऱ्याला/घरच्यांना चुकवून यायचं म्हणजे थोडं रिस्कीच."

अ ने पाण्याचा ग्लास तोंडाला लावला. बोटातली सिग्रेट अॅश-ट्रेत झटकली.

"बाकी मधुमुळे मला खूपच रिलिफ मिळतो. ती आहे म्हणूनच मला सारं सुसह्य होतं. तिच्यासारखी मैत्रिण/प्रेयसी खरंच दुनियेत दुसरी कुणी नसावी."—ब खुलला. मघाच्या नर्व्हसनेस्चं, कुठलंही चिन्ह आता त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हतं.

"करेक्ट ! माझंही. माझी मैत्रीण प्लस प्रेयसीबद्दल हेच मत आहे थोडक्यात साऱ्यांनाच आपल्या प्रेयसी अशाच वाटत असतात." अ.

ब खटयाळासारखा खळखळून हसला.

"जोक नको समजू. अगदी रिअली म्हणतोय मी," अ ने सिग्रेटीचा लांबवर झुरका घेतला नि वेटरला पुन्हा बोलावून दोन कॉफीची ऑर्डर दिली.

"नको यार आता कॉफी. बहुत हुआ."

"जस्ट अ टाईमपास म्हणून घ्यायची कॉफी. ऑफीसात घेतो कां आपण रोज अशी कॉफीमागून कॉफी ?"

"ओके. ओके."

"तर सांगतो काय—एकदा असंच माझं बायकोशी खूप भांडण झालं. मला अगदी जीव द्यावासा वाटला होता त्या दिवशी. संध्याकाळलाच शब्नोची भेट झाली नि क्षणात का कुणास ठाऊक मी नॉर्मल झालो. रिअली शी इज अ ग्रेट वुमन ! केव्हा केव्हा वाटतं हीच बायको हवी होती आपली."

अ सुखावत प्रेयसीच्या आठवणीत गुंतला.

क्षणभरानं ब नंच बोलणं काढलं.

"तुझी मुलगी फोर्थ स्टॅंडरला जातेय नं ?"

"हो. त्याचं काय ?"

"नाही–त्यानंतर काही ? मला म्हणायचं, काही प्रोग्रेस ? प्रेग्नंन्सी ?"

"ओ नो ! नॅचरली फॅमिली प्लॅनिंग होतंय. अन् काय करायचं रे पोरांचं लेंढार वाळगून ? छचा !"

अ ने कॉफीचा घोट घेऊन कप परत बशीत ठेवला.

"मुलगा नकोय का ?"

"नॉट नेसेसरी. मुलगा काय किंवा मुलगी काय–दोघंही सारखेच... रेडियोवरची जाहिरात ऐकत नाहीस की काय ?"

अ, ब दोघंही खळखळून हसलेत.

क्षणभर दोघंही उगाच इकडेतिकडे पहात बसलेत.

"आपल्या दोघांच्या बायकोपोरांची अजून भेट नाही घडून आली. परंतु दोघांच्या प्रेयसींची मात्र आज भेट घडून येतेय."

"फर्स्ट लव्हर देन वाईफ !" ब बोलला.

"तू शहरातल्या एका टोकास राहतोस तर मी दुसऱ्या टोकास. त्यात आपल्या दोघांच्या बायका वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी करतात. चौघांचा वेळ जुळेल तसे भेटू या एखादे वेळी घरी. सद्या प्रेयसींची तर ओळख होऊन जाऊ दे."

ब ने पुन्हा जवळच्या काचेरी खिडकीतनं रस्त्यावर दूरवर वर्दळीत पाहिलं, अन् तो अकस्मात फुलत गेला. त्याचे डोळे हर्षाने चमकू लागले.

"गुड ! अरे ती बघ. ती येतेय. माय लव्हर. मधू !"

अ ने एव्हाना ताडलं होतंच की, वेटचाला त्याची मधू दिसली असावी, अन् ती इकडेच येत असावी. तोही तिला पहाण्यास अधीर झालाच होता.

अ नेही झटकन् वळून वंद काचेरी खिडकीतनं दूरवर वर्दळीत पाहिलं.

"कुठं रे ?"

"अरे ती–ती ! गर्द निळी साडीवाली ! तसलाच स्लीव्हलेस निळा ब्लाऊज. त्या आटोच्या पुढल्या अंगास बघ."

ब हर्षोत्फुल्ल उरानं बोलू लागला.

अ ने दूरवर तिचेकडे पाहिलं. रोखून रोखून पाहिलं. मग, डोळे फाडूनफाडून पुन्हापुन: निरखलं. अन् तो अचंबलाच !

"व्हॉट ?" तो ओरडलाच. पण लगेच त्याने स्वत:ला सावरलं. कारण ती–ती त्याची बायको होती. माधवी.

अ ला धडधडायला झालं. त्याचे ओठ थरथरू लागलेत. कपाळावर घाम जमल्यासारखं झालं. त्याने लगेच खिशातल्या रुमालानं चेहरा पुसून काढला. त्याला काय करावं कळेना.

ब चं अ कडे लक्षच नव्हतं. तो तृप्तीनं काचेतनं तिचेकडे रोखून पहात होता. पाचेक मिनिटातच ती ह्या रेस्टॉरंटात त्यांचेजवळ येऊन बसणार होती.

"क्या दोस्त ? कैसी है अपनी जान ?"

ब ने अभिमानभरल्या उरानं अ ला विचारलं.

"बहोत अच्छी...बरं, मी जरा टॉयलेटला जाऊन येतो." अ गोंधळल्यासारखा बोलला. बळेबळेच स्मितला.

"क्यों ? पहाताच टॉयलेटला जावसं वाटलं की काय रे ?" ब ने मिस्कीलपणे अ ला टोमणा मारला.

दोघंही हसलेत.

अ ने हातातली सिग्रेट अॅश-ट्रेत चुरगाळली अन् झटकन् खुर्चीतनं उठला. मागील दाराकडे असलेल्या रेस्टॉरंटच्या टॉयलेटकडे लगबगीनं वळला.

ती आत आली तसा ब हर्षोत्फुल्ल उरानं म्हणाला, "वेलकम मधू ! वेलकम ! बस–अग, केव्हाची वाट पहातोय आम्ही दोघं तुझी."

"काय तुमच्या मित्राची जोडी नाही आलीय अजून ?" ती पदर सावरीत खुर्चीत बसली. हातातली पर्स टेबलाच्या कडेशी आडवी पाडली.

"तो आलाय. पण, त्याची ती-अजून यायचीय."

मग, ब च क्षणभरानं बोलला, "तो टॉयलेटला गेलाय. तुला पहाताच उठला लेकाचा !"

"ईऽऽ काहीतरीच काय ?"

ब खळखळून हसला. मग, तीही त्याच्या मिस्किल हास्यात मिसळली.

"अग, एवढा उशीर ?"

"अहो, घरीच ह्यांच्या कटकटीमुळे उशीर झाला. मेली फास्ट लोकल चुकली. मग आले रखडत. मैत्रिणीची तब्बेत पाहून येते म्हटलं तर

अनुक्रमणिका

काय–घर डोक्यावर घेतलं! म्हणे मलाही बाहेर जायचंय. पण, मी हट्टालाच पेटले. निघाले.–नवरा आहे की, दुश्मन कोण जाणे !"

तिने एक दीर्घ सुस्कारा सोडला. मग ऐसपैस बसली.

"सुधीर, तुझी सोबत कित्ती सुखद वाटते, सांगता यायचं नाही बघ." ती भावनाविवश झाली.

ब नुसता स्मितला. बशीतल्या कपाशी चाळा करीत तिच्या डोळ्यात पाहू लागला. तीही त्याच्या डोळ्यात बुडत होती. तृप्त तृप्त होत होती.

"मुलं, बायको काय म्हणतात ?"

"नाव नको काढू तिचं, प्लीज."

"सॉरी हंऽ."

ती त्याचेकडे टक लावून पहात गप्पशी बसल्यासारखं पाहून ब ने म्हटलं, "कां ग, कसला विचार करतेस ?"

ती नुस्ती हसली. पदराशी चाळा करीत राहिली.

"काय " ब ची उत्सुकता ताणावली.

"तू माझा–नवरा हवा होतास. रिअली."

"ओऽ !" दोघंही खळखळून हसलीत.

ब ने मनगटावरच्या घड्याळात पाहिलं. अ अजूनही टॉयलेटकडून परतला नव्हता.

"हा लेकाचा घोडा आहे की काय ? अजूनही येत नाही."

ब च्या थिल्लर विनोदावर ती तोंडावर हात ठेवून गालातल्या गालात हसली.

"मी जरा पाहून येतो. अन् मीही जाऊन येतो. नाही तरी केव्हाचेच आम्ही दोघं येथे गप्पा छाटीत बसून आहोत."

ब खुर्चीतनं उठला अन् टॉयलेटकडे वळला.

ती टेबलावरचं मेनूकार्ड उगाच चाळत राहिली.

ब मागील दाराशी असलेल्या रेस्टॉरंटच्या पॉश टॉयलेटमध्ये दार ढकलून आत शिरला. त्याने मनाशी आधीच ठरविलं की हा साला लघवी करीत असताना गुपचुप त्याचे मागे जाऊन उभं रहायचं अन् पाठीत धपाटा हाणायचा. लेकाला घाबरवून सोडायचं.

पण टॉयलेट शांत होतं. ब ला आत अ कुठेच दिसेना.

"हा साला अदृश्य तर झाला नाही ना ? की आपण येथे आलो अन् हा तिथे मधूजवळ टेबलावर जाऊन पोहोचलाय ? नजरचुकीनं/गर्दीमुळं अशी शक्यताही नाकारता येत नाही."

ब टॉयलेटच्या वरच्या फर्शीवर उभा राहिला. लघवीसाठी पॅंटची बटनं खोलू लागला. समोर तोंडाशीच काचेरी तावदानाची अर्धवट उघडी खिडकी होती. त्यातनं बाहेरची–बाजूच्या रस्त्यावरची वर्दळ स्पष्टपणे दिसत होती.

लघवी करताकरताच ब दचकला. स्वत:शीच भांबावला.

कारण अ बाहेर रस्त्याच्या कडेशी स्वत:च्या एझदी मोटारसायकलपाशी कुणा स्त्रीशी बोलत उभा होता. ती स्त्री पाठमोरी होती.

क्षणभरानं अ ने आपल्या मोटारसायकलला किक् दिली अन् तो तिचेवर दोन्ही टांगा टाकून स्वार झाला. तिच्या बसण्याची वाट पाहू लागला. तशी ती सोबतची स्त्री फिरून मागच्या सीटवर येऊन बसली. तिने अ च्या कमरेभोवती विळखा घातला.

आता तिचा चेहरा ब ला स्पष्ट दिसला, अन् तो दचकला ! भूकंपच होतोय की काय असा क्षणभर त्याला भास झाला. कारण ती स्त्री–त्याची बायको होती. शबनम !

ब ने पॅंटची बटनं कशी, केव्हा बंद केली हेही त्याचं त्याला कळलं तो नाही. धडधडत्या उरानं टॉयलेटमधनं बाहेर पडला. हॉलमध्ये आला.

हॉल स्त्री–पुरुषांनी गच्च भरून होता. कुठलंसं आफ्रिकन हॉट सॉंग कर्कशपणे स्टिरिओवर वाजत होतं.

मधू त्याची वाटच पहात होती.

"का ? तुमचा तो दोस्त कुठाय हो ! भेटला नाही ?" ब ला एकटाच परतलेला पाहून तिनं अचंब्यानं विचारलं.

ब काहीच न बोलता खुर्चीत कोसळल्यागत बसला

त्याने खिशातनं रुमाल काढून चेहरा पुसला. मग, क्षणभर डोळे मिटून डाव्या हाताची बोटे भुवया/पापण्यांवरून फिरविलीत.

"का-तब्बेत बरी नाही का तुमची ?" तिने म्हटलं.

व मूक.

"काही भांडणबिंडण केलंय की काय त्याचेशी, टॉयलेटमधे ?"

थोड्या वेळानं ब बोलला, "काही नाही गऽ. ठिकाय मी–" तो कसावसा एवढं बोलला. थरथरानं ऊर/ओठ दाबायचा प्रयत्न करू लागला.

"नालायक ! हरामी साली !" ब स्वतःशीच मनातल्या मनात त्वेषाने पुटपुटला. सहजच त्याची नजर समोरच्या भिंतीवरल्या पेंटिंगकडे गेली. घनदाट जंगलात धावणारं एकाकी हरीण. मृग. कस्तुरीमृग...

क्षणभरानं ब दचकला. अचंबला.

कारण, चित्रातला कस्तुरीमृग हळूहळू जागच्या जागी अदृश्य होऊ लागला अन् त्या जागी त्याला तो स्वतःला दिसू लागला !

क्षणात पुन्हा ब च्या डोळ्यापुढे बायको उभी झाली अन् तो ओरडलाच !

"हरामी साली !"

□ □

पद्माकर पाटील
६० रवींद्र नगर, रिंग रोड
नागपूर ४४००२२

अनुक्रमणिका

मुन्शी प्रेमचंद व हरि नारायण आपटे

मूळ लेखन :
राजेंद्र पटोरिया
अनुवाद :
कुसुम पटोरिया

मुन्शी प्रेमचंद हिंदी भाषेचे युगप्रवर्तक साहित्यकार होते, तर हरी नारायण आपटे मराठी कादंबरी क्षेत्रात 'मनोज्ञ मन्वंतर' घडवून आणणारे कादंबरीकार होते. कालदृष्ट्या हरिभाऊ प्रेमचंदांपेक्षा ११ वर्षे पूर्वी जन्मले होते. जेव्हा यांचा उदय हिन्दी व मराठी साहित्याच्या जगात झाला तेव्हा त्या त्या भाषेतील कादंबरी आपापल्या बाल्यावस्थेत होती, आपल्या विकासाचा मार्ग शोधीत होती. ह्या दोन्ही लेखकांनी आपल्या भाषेच्या कादंबरीला नवे रूप दिले. तिला अस्वाभाविक अद्‌भुत जगातून काढून यथार्थाच्या भूतलावर जणू उभे केले. मनोविश्लेषणाची आधारभूमी तिला दिली. ह्या दोघांनी आपापल्या कादंबऱ्यांना जीवनातल्या विविधतेने सजविले. प्रेमचंद आणि आपटे ह्यांच्या नंतर कादंबरी या साहित्यप्रकाराचा खूप विकास झाला. तरी कादंबरीच्या क्षेत्रात त्यांचे स्थान अढळ आहे. आजची कहाणी वास्तववादाच्या अतिरेकाने व मनोविज्ञानाच्या विकृतीने युक्त आहे, पण ह्या दोघांचे साहित्य वरील दोषांतून मुक्त आहे, कारण त्यांचे मनोवैज्ञानिक चित्रण व अनुभव वैचारिक भूमिकेवर आहेत–

प्रेमचंद व हरिभाऊ ह्या दोघांच्या कादंबऱ्या समस्यामूलक आहेत. त्यांनी त्याकाळच्या रूढिग्रस्त भारतीय समाजाचे गलितांगाचे चित्र रेखाटलेले आहे. भारतीय समाजाला सुधारण्यासाठी उपायही सांगितलेले आहेत. विजोड विवाह, हुंडाप्रथा, एकत्र कुटुंबाचे त्रास देणारे वातावरण, विधवेची करुण स्थिती, स्त्रीशिक्षण आदी अशा समस्या आहेत, ज्यांचे दोघांनीही तन्मयतेने वर्णन केले आहे. प्रेमचंदांनी याशिवायही काही समस्यांचा विचार केला आहे. त्यांनी ग्रामीण व शहरी जीवनाच्या अत्यंत खालच्या दर्जाच्या मानवाचे प्रश्न उभे केले. पण हरिभाऊंची दृष्टी शहरातील जीवनावर–पांढरपेशा मध्यम वर्गावर केंद्रित होती.

प्रेमचंद यांचे मन ग्रामीण संस्कृतीत खूप रमले होते. त्यांनी भोळ्या भाबड्या ग्रामीणांची साधी वृत्ती, अंधश्रद्धा, दारासमोर गाई बांधण्याची उत्कट इच्छा, नियतिवाद, नातेवाईकांचे भय, ईर्षा, द्वेष, प्रेम, सहयोग इत्यादी भावना बोलक्या केल्या आहेत. त्यांच्या दु:खांचे, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांचे मन हलवून सोडणारे वर्णन केले आहे. वेगाने वाढणाऱ्या औद्योगीकरणाच्या संस्कृतीशी विरोध दाखवला आहे. सांप्रदायिकतेची ज्वलंत समस्या त्यांच्या समोर होती. ह्याच्या उलट हरिभाऊंनी आपल्या कादंबऱ्यांचा विषय म्हणून मध्यमवर्गीय नागरी संस्कृतीचीच निवड केली आहे. हरिभाऊंनी पूर्ण लक्ष कौटुंबिक जीवनावरच केंद्रित केले आहे, म्हणून डॉ. श्री. व्यं. केतकरांनी अधिक्षेपाने त्यांच्या कादंबऱ्यांना सदाशिवपेठी म्हटले आहे. वस्तुत: हरिभाऊंनी ग्रामीण जीवन पाहिलेच नव्हते. जेवढे पाहिले होते,

अनुक्रमणिका

अनुभविले होते, तेवढेच लिहिणे त्यांना शक्य होते. यास्तव त्यांची लेखणी ग्रामीण जीवनाच्या वाटेस गेलीच नाही. पण प्रेमचंद यांचा अनुभव व्यापक होता.

वेश्यांविषयी प्रेमचंदांचा दृष्टिकोन सहानुभूतीचा आहे, तर हरिभाऊंची दृष्टी तिरस्काराची आहे, असे दिसते. त्यांनी वेश्यांच्या समस्यांचा गांभीर्याने विचारच केलेला नाही.

अस्पृश्यांच्या स्थितीचे वर्णन करून प्रेमचंदांनी समाजाच्या धार्मिकतेची पोकळी उघड केली आहे, पण आपटे ह्याविषयी मौन बाळगतात.

प्रेमचंदांच्या तुलनेत हरिभाऊंचे विषयक्षेत्र संकुचित आहे. प्रेमचंदांच्या अनुभवजन्य लेखणीतून भारतीय समाजाच्या विविध वर्गातील विविध व्यक्ती त्यांच्या साहित्यामध्ये उभ्या झाल्या आहेत. संकुचित क्षेत्रातही हरिभाऊंनी जीवनाचे विविध रूप वाचकांच्या समोर ठेवले आहे. त्यांचे विषय-क्षेत्र सीमित असले, तरी त्यांची दृष्टी सीमित नव्हती. त्यांनी हाताळलेल्या समस्या केवळ महाराष्ट्राची समस्या नसून संपूर्ण भारताच्या समस्या आहेत. हरिभाऊंनी सुद्धा स्वतःच्या युगाचा ज्वलंत असा प्रश्न 'राजकीय सुधारणा आधी की सामाजिक सुधारणा आधी' ह्याबद्दल विचार केला आहे.

प्रेमचंद वर्तमानाचा विचार करणारे कथाकार होते. काही आरंभीच्या कथा वगळल्या तर नंतर त्यांनी पुन्हा कादंबरीसाठी इतिहासापासून विषय निवडले नाही. हरिभाऊंचे मन भारताच्या विशेषतः महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाने भारावलेले आहे. म्हणून त्यांनी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्यास सुरुवात केली. ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याचा उद्देशही भारतीयांच्या भूतकाळाविषयी गौरवभाव जागृत करणे व राष्ट्राच्या उत्थाना-करिता प्रेरणा देणे हाच होता. हरिभाऊंनी अनुवादपर किंवा आधारित साहित्याची निर्मितीच मुख्यत्वाने केली आहे. पण प्रेमचंदांचे लेखन अनुभवजन्य लेखन आहे.

कादंबऱ्यांचे विषय भिन्न असले तरी त्या दोघांचे उद्दिष्ट जीर्ण-शीर्ण समाजाला नवे रूप देणे हे होते. म्हणून त्यांनी ते समस्या रूप मांडताना त्यावर उपायही सुचविले आहेत. आपटे-कादंबरीकाराचे कौशल्य उद्दिष्टसिद्ध होणे हेच मानतात, प्रेमचंद कादंबरीची सार्थकता यथार्थोन्मुख आदर्शवादी होण्यात मानतात. प्रेमचंद यांच्या मते साहित्यकार मशाल घेऊन पुढे चालतो. समाजाचा मार्गदर्शक असतो. दोघांनीही जीवनाचे जे आदर्श मांडले ते व्यावहारिक व मानवोपयोगी आहेत.

प्रेमचंद व हरिभाऊ दोघांची जीवनदृष्टी मानवतावादी आहे. दोघांचा विश्वास सेवा व कर्मण्यतेमध्ये आहे. प्रेमचंदांकरिता जीवन खेळ होता, तर हरिभाऊंच्या दृष्टिकोनातून संग्राम. दोघे निष्काम कर्माला महत्त्व देत होते. दोघांचेही जीवनावर प्रेम होते, तरी मृत्यू त्यांना भयप्रद नव्हता. प्रेमचंदांनी मृत्यूला विश्रामस्थळ म्हटले आहे. दोघेही धनाला जीवनाचे साधन मानीत होते. हरिभाऊ समाजात बऱ्यावाईट दोन्ही-प्रकारच्या माणसांचे अस्तित्व मानतात, तर प्रेमचंद वाईट व्यक्तीसुद्धा परिस्थितीमुळेच तशी वाग-ण्यास विवश झाली असे समजतात

प्रेमचंद नारीची पूर्णता माता होण्यातच मानतात. पतित म्हटल्या जाणाऱ्या स्त्रियांनाही ते सन्मानपूर्ण दृष्टीने पाहतात. पण हरिभाऊ आदर्श स्त्रियांबरोबर पतितांचेही वर्णन करतात.

ईश्वर, पूजा व मोक्षाविषयी त्यांचे विचार वेग वेगळे होते. प्रेमचंदांकरिता हे नि. र्थक आणि माणूसकीला घातक आहेत. त्यांच्या मते जीवन हेच ईश्वर आणि जीवनाला उदात्त बनविणे हीच पूजा व मोक्ष आहे हरिभाऊही धर्माच्या रूढ स्वरूपाला विराट समाजपुरुषाला झाकण्यात असमर्थ अशी फाटकी चिंधी मानतात. पण हरि-भाऊंचा विश्वास ईश्वरीय प्रेरणेमध्ये होता. प्रेमचंद जीवनाच्या संघर्षामुळे बहिर्मुख झाले होते, तर हरिभाऊ अध्यात्मवादी व अन्तर्मुख.

प्रेमचंद व हरिभाऊ ह्या दोघांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये वर्णनात्मक शैली वापरली आहे. प्रेमचंद यांनी पूर्वप्रचलित वर्णनात्मक शैलीचा यशस्वी प्रयोग केलेला आहे. ते तटस्थ होऊन सबंध कथा मांडतात हरिभाऊंनी आत्मकथात्मक शैलीचा पण वापर केला आहे. त्यांच्या आत्मकथात्मक शैलीत लिहिलेल्या कादंबऱ्या अधिक हृदयस्पर्शी आहेत.

अनुक्रमणिका

जी परिस्थिती आणि जी व्यक्ती ते चितारतात, त्याच्याशी पूर्ण तादात्म्य साधणे हे दोघांचे वैशिष्टच. ह्या तादात्म्यामुळेच वाचक त्या कादंबरीत मग्न होऊन राहतो. चित्रणाच्या ह्या कौशल्यातच त्यांचे यश सामावलेले आहे. प्रेमचंदांचा 'होरी' आणि हरिभाऊंची 'यमुना' वाचकाला अगदी जवळची वाटते.

भाषेच्या क्षेत्रातही दोघांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. दोघांनी आपापल्या भाषेचे रूप स्थिर केले. प्रेमचंद सहज सुलभ भाषेत जास्त आशय व्यक्त करतात, पण हरिभाऊंची भाषा अलंकारिक वाटते. वर्णनशैलीच्या अतिरेकामुळे कथानक रेंगाळते, पण प्रेमचंदांच्या कादंबरीत सहज प्रवाह दिसतो.

ह्या दोघांचे साहित्य इतर भारतीय भाषांमध्ये भाषान्तरित झाले आहे, तरी पण दोघेही इतर भाषेच्या साहित्यावर आपला ठसा उमटविण्यात अयशस्वी ठरले आहेत.

हरिभाऊंचे जिवंतपणीच मराठी साहित्यक्षेत्रात कौतुक झाले, तर प्रेमचंद मृत्यूनंतरच जास्त गाजले-वाजले.

साहित्यात इतके प्रवाह निर्माण झाले की आज हरिभाऊ मागे पडले. हिन्दी साहित्यातही लेखन जरी विपुल झाले तरी प्रेमचंदांचा पथ अजून पुढे कधीही नेला नाही.

□ □

राजेंद्र पटोरिया,
कुसुम पटोरिया,
आझाद चौक, सदर, नागपूर

अनुक्रमणिका

हरिशंकर परसाई . . .

उत्तम कानिटकर

"मी विनोदाने लिहितो, पण म्हणजे नुसते हसविण्यासाठी लिहीत नाही. 'ह्यूमरिस्ट्' आणि 'सटायरिस्ट' यातला फरक आपण लक्षात घेतला पाहिजे. माझ्या लेखनामुळे संवेदनाशील समजूत उत्पन्न करणारे संस्कार होत नाहीत असा आक्षेप कुणीकुणी घेतात, आणि नुसती दिसेल त्याची टर उडविण्यापुरतेच सटायर जीवनाशी संबंधित असते असेही म्हटले जाते. पणं हे खरे नव्हे....

"व्यंग्य-लेखकाच्या मनाची संवेदना इतर लेखकांपेक्षा बोथट असते हे मुळीच खरे नाही. उलट, आमच्या मनाला समाजाच्या आणि व्यक्तीच्या जीवनाची जास्तच जवळून जाणीव असते, असे म्हणायला हवे,......" हरिशंकर परसाई व्यंग्य साहित्यावरच्या आक्षेपाला हिरीरीने उत्तर देताना म्हणाले.

परसाईंचा आग्रहाने मांडण्याचा मुद्दा असतो की, समाजातल्या विकृती, विसंगती, अन्तर्विरोध यांच्याशी आमचा अगदी जवळचा संबंध असतो. त्यामुळे आम्ही व्यंग लेखक दु:खी असतो, आमच्या मनात ते सारे पाहून विलक्षण पीडा उत्पन्न होते. अखेर आम्ही या समाजावर प्रेम करतो म्हणूनच त्याच्या भ्रमपूर्ण स्थितीबद्दल आमच्या हृदयात वेदना उठतात. आहे यापेक्षा काहीतरी चांगले, सुधारलेले उभे रहावे म्हणून आम्ही लिहितो. फक्त आमचा लिहिण्याचा प्रकार वेगळा; गंभीर चर्चात्मक लिहिण्याऐवजी व्यंगात्मक, वक्रोक्तीपूर्ण, व्याजोक्तीपूर्ण लिहून आम्ही लोकजागृतीचा प्रयत्न करतो, अनिष्टावर जळजळीतपणे आणि डिवचणारे असे लिहून आघात करण्याची खटपट करतो. तेव्हा व्यंग्य लेखक हे केवळ चार घटका हंसवणारे नव्हेत; ते वाचणाराला हसवीत, पण त्यावरोबरच अन्तर्मुख होऊन बदलण्याची प्रेरणा देत लिहितात! आंतरिक संवेदनेत इतर प्रकारच्या लेखकांपेक्षा आम्ही तसूभरही उणे नाही!!

व्यक्ती

व्यंगात्मक लेखनाची आपली भूमिका अशी वेगळेपणाने टिकवून ठेवणारे हरिशंकर परसाई आज हिंदी साहित्यांत एक सिद्धहस्त लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत, आणि त्यांच्या वाङ्मयाची भाषांतरेही वेगवेगळ्या भाषांत झाली आहेत. १९२२ च्या ऑगस्टमध्ये त्यांचा जन्म मध्यप्रदेशातल्या होशंगाबाद जिल्ह्यात जमानी या गावी झाला. एम्. ए. ची पदवी हिंदी विषयात मिळवून ते खण्डवा व जबलपुर येथे जवळजवळ तेरा वर्षे अध्यापक म्हणून राहिले; परंतु १९५७ पासून गेली सत्तावीस वर्षे लेखन हाच त्यांचा पूर्ण वेळचा उद्योग आहे. गेली काही वर्षे अपघातामुळे ते घरातच बांधले गेले असले तरी त्यांची लेखणी मात्र अजूनही तळपत आहे. नुकताच 'पाखंड का अध्यात्म' हा त्यांचा चोवीसावा संग्रह प्रसिद्ध झाला. त्यांचे दोन संग्रह भारतीय ज्ञानपीठाने प्रकाशित केले आहेत. त्यातला एक १९५८ मध्ये व दुसरा १९६३ मध्ये.

त्यांच्या आजवरच्या समग्र लेखनाचा सन्मान करून अलिकडेच 'चकल्लस ट्रस्ट' या साहित्यिक संस्थेने त्यांना वीस हजार रुपयांचे पारितोषिक दिले. यंदाच्या वर्षी साहित्य अकादमीने त्यांचा विशेष सन्मान केला. तसेच मध्यप्रदेश शासनाच्या

संस्कृतिविभागाने त्यांचा 'शिखरसन्मान' करून गौरव केला. आता १९८५ मध्ये त्यांना 'पद्मश्री' देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. त्यांच्या कितीतरी रचना हिन्दी वाचकांना मुखोद्गत व्हाव्यात इतक्या काळजाला भिडणाऱ्या आहेत. आज वयाच्या त्रेसष्टाव्या वर्षी काहीशा पंगु अवस्थेत शरीराने घायाळ झालेला हा वीर अजूनही सामाजिक अन्तर्विरोध, विसंगती, मुखवटे, ढोंग, संदर्भहीन झालेले रीतिरिवाज, नग्न स्वार्थ, या आणि अशा विकृतींवर लेखणी सरसावून पोटतिडिकेने लिहीत आहे, हल्ला चढवीत आहे, वाचणाराला तटकन् उठून बसायला (सिट्–अप्) प्रवृत्त करीत आहे.

प्रबोधनाची तळमळ

अर्थात आपल्या केवळ लिहिण्याने संपूर्ण सामाजिक परिवर्तन घडेल असा त्यांचा भ्रम नाही. अशा परिवर्तनाठी क्रांतिकारी आंदोलनच हवे याची त्यांना जाणीव आहे. पण तरीसुद्धा मी लिहीत राहतो कारण त्यातून परिवर्तनाला आवश्यक अशी चेतना तरी जागविण्याचा माझा प्रयत्न असतो अशी त्यांची धारणा आहे. माणसाला स्वत:चे परखड परीक्षण करायला प्रवृत्त करणे हे देखील काही कमी महत्त्वाचे काम नव्हे. लेखनाच्या माध्यमातून ते करीत राहण्याचा त्यांचा संकल्प आहे.

तेव्हा हरिशंकर परसाई या हिन्दी भाषेतल्या सिद्धहस्त विनोदी लेखकाची जातकुळी ही अशी अगदी वेगळ्या प्रकारची आहे. खरे म्हणजे त्यांच्या 'घराण्या'चे लेखक इतर भाषांमध्ये, मराठीत देखील फारच कमी सापडतात. मराठीतला विनोद हा हलकाफुलका गंमत म्हणून लिहिला जाणारा पुष्कळच असतो, पण विनोदगर्भ लिहिताना लोकांच्या विकृतीवर कोरडे ओढून त्यांना जागे करणारे परसाईंसारखे लेखक भारतीय साहित्यात वेगळेच स्थान पटकावून बसले आहेत ते उगीच नव्हे. खरे तर 'व्यंग' शब्दाचा उपयोग आपण केवळ 'उणीव' असा करतो, आणि तेच फक्त शोधणाराला कावळ्याची उपमा देतो; पण हिंदी भाषेने 'व्यंग्य' हा शब्द ज्या 'सटायर' या लेखनप्रकारासाठी स्वीकारला आहे, त्याचा मूळ अर्थ नुसत्या चोच मारण्यापेक्षा कितीतरी व्यापक आणि रचनात्मक आहे. 'सटायर' याचा 'दुर्गुण किंवा मूर्खपणाचा किंवा तसे वागणाराचा बुरखा फाडून थट्टेखोरपणाने त्याचे अवगुण उघडकीला आणायचे, पण ते अशा दुर्गुणांना कमी करण्यासाठी,' (Composition in which vice, or folly, or person as guilty of it, is held up to ridicule to expose and discourage vice and folly and false pretensions) असा अर्थ ऑक्सफोर्ड डिक्शनरीत सापडतो त्याचा उपयोग कुणाचेतरी वर्म काढून त्यावर लोकांना नुसते हसविण्यासाठी करणारे कितीतरी असतील, पण त्यातून झडझडून जागे करून ते दुर्गुण कमी करण्यासाठीच लिहिणारे हरिशंकर परसाईसारखे चिंतक विरळेच आहेत. त्यांना लोकांना हसवायचे आहे, पण ते टाळ्या मिळविण्यासाठी नव्हे; त्यांचा तो काही सामाजिक श्रेष्ठ मूल्यांसाठी संघर्ष आहे! व्यंग्य, हे त्यांचे त्या लढ्यातले शस्त्र आहे!! ती नुसती एखाद्या विदूषकाची लांबुळकी टोपी नव्हे. नुसते विडंबन नव्हे. त्यामधून लोकप्रबोधन करणारी अशी परसाईंची आजवर चोवीस पुस्तके प्रकाशित झाली. त्याखेरीज नियमितपणे जवळजवळ तीस वर्षे ते नियतकालिकांतून स्तंभलेखन करीत आहेत, आणि त्यांच्या लेखनातले काही नमूने पाहिले म्हणजे त्यांचा समाजसुधारकाचा पिंड स्पष्ट दिसतो.

आसूड

आपल्या 'इसलिए' या नियतकालिकाच्या संपादकीय लेखात परसाई 'सांस्कृतिक उपनिवेशवाद आणि बुद्धिजीवी' या विषयावर लिहिताना म्हणतात– "एक बौद्धिक प्रकारचा वर्ग आहे. त्याला 'इंटलेक्चुअल इलीट' (elite) (प्रबुद्ध उच्चभ्रू) असे म्हणतात. हे लोक मोठे गमतीदार असतात. त्यांच्याजवळ रगड पैसा असतो, आणि त्यांची राहणी पश्चिमी थाटाची असते. त्यांचे पाय जमिनीला लागत नाहीत, ते वेगळे जीवन जगत असतात. मोठ्या गंभीरपणाने मुळातच नसलेल्या शून्य गोष्टींची ते चर्चा करतात. पश्चिमेकडून उसन्या घेतलेल्या म्हणी त्यांच्या जिभेवर खेळत असतात, आणि संध्याकाळी ते उंची मदिरा घशाखाली रिचवन आपल्या दिवसाचे सार्थक करतात.

या देशाशी आणि इथल्या माणसांचे त्यांना काही सोयरसुतक नसते; आपला इथला जन्म म्हणजे नुसता एक भौगोलिक अपघात समजून विचारे त्यासाठी नेहमीच खंत करीत जीवन कंठीत असतात! नेहमी 'स्टेट्स्'ची आठवण काढून कळा देतात, आणि या देशाबद्दल येता जाता शेरे ठोकून देतात–' दि कंट्री इज गोइंग टु डॉग्ज '!

"...वी. एस्. नाइपाल यांचीच गोष्ट घ्या, कारण नाइपालबद्दल बोलणे म्हणजे प्रतिष्ठित समजले जाते. असे सांगतात की नाइपाल म्हणतो, भारतात बैलगाड्यांच्या चाकांना रबरी टायर लावले पाहिजेत! खरे म्हणजे ज्याने आपल्या खेडोपाडीचे खडबडीत, काटे आणि दगड पसरलेले, टळटळीत उन्हात तापणारे रस्ते पाहिले असतील त्याच्या सहज लक्षात येईल की अशा रस्त्यांसाठी गाडीच्या चाकाला लोखंडाचीच धाव हवी. शेतकरी ज्या बैलांच्या पाठीवर जूं ठेवून शेती करतो, त्याच बैलांना नंतर गाडीला जुंपतो. अन् टायरची किंमत कशी त्याला परवडेल? आणि ते फुटले म्हणजे सुधारण्यासाठी वर्कशॉप खेडोपाडी कुठून येणार? स्पष्टच बोलायचे म्हणजे नाइपालचा हा सल्ला अगदी मूर्खपणाचा आहे; पण नाइपालने म्हटले ना, मग आमचे इलीट लगेच त्याचे म्हणणे डोक्यावर घेणार. लंडनमधे राहणारे निराद चौधरी लगेच नाइपालची मुक्ताफळे चवीने चर्चिणार!

"हे निराद चौधरी महाशय सुद्धा एक मासलेवाईक व्यक्ती आहे. आयुष्यभर भारतात उच्च ब्रिटिश नोकरीत राहिले. स्वतःला इंग्रजच समजतात. ते ब्रिटिशांचे समर्थक समजले जातात. दि स्टोरी ऑफ अननोन इंडियन, ए पॅसेज टु इंग्लंड, व्हॉट इज हिंदुइझम वगैरे लिहिले आहे. उच्चवर्गीय इंग्रजांच्या बरोबर दारूचा पेला घेऊन गप्पा मारल्या की त्यांना धन्य धन्य होते. व्हाय आय ॲम प्रो–ब्रिटिश या आपल्या लेखात ते म्हणतात–" जन्मापासूनच माझ्यावर पश्चिमी संस्कार झाले. मी पहिल्यापासून कमोडचाच उपयोग केला, तसेच माझ्या आईने मला सुरुवातीला 'इलियड' शिकवले, महाभारत नव्हे." आता कमोड वापरतो की बैठकीचा संडास, यावर बुद्धिमान माणसाचे विचार बनावेत आणि राष्ट्रीयता घडावी, ही तर स्वच्छ मूर्खपणाची गोष्ट आहे. आणि मोठे झाल्यावर तरी निराद चौधरींनी महाभारत का वाचले नाही? असे हे निराद चौधरी नाइपालच्या लिहिण्यावर मखलाशी करणार, आणि नाइपाल निराद चौधरीची वाहवा करणार!

"असेच आणखी एक आहेत षष्टीव्रत! हेही लंडनला राहतात. इंग्लिशमध्ये अपस्टार्ट किंवा हिंदीत उचक्का (मराठीत उठवळ) ज्याला म्हणतात असा हा गृहस्थ. पत्रकार आहेत. माय गॉड डाइड यंग, दि स्टोरी ऑफ ॲन इंडियन लेडी किलर वगैरे पुस्तके गाठीला आहेत, कधीकधी लेखात सांगतात की स्कॉचची पूर्ण बाटली रिचवून, मी भारतातल्या स्थितीबद्दल गार्डियनसाठी सातशे शब्द लिहिले! मुंबईत आले की ताजमध्ये, दिल्लीला अशोक मधे उतरतात. त्यांना वाटत असते की भारतातली सर्वांगसुंदर स्त्री, षष्टीव्रत येतो कधी आणि आपण त्याला मिठी कधी मारतो अशी आपल्यासाठी जीव टाकते आहे. आणि गंमत म्हणजे रोगण लावलेल्या या उथळ उच्चवर्गीय स्त्रिया लगेच येतातही आणि ओ षष्टी, ओ षष्टी करीत त्याच्या कुठल्यातरी मूर्खासारख्या पण चेतवणाऱ्या कानुक बोलण्यावर अमेरिकन उच्चभ्रू बायकांसारख्या ही–ही करीत माना हलवीत म्हणतात, हाऊ नाइस, ओ, ही वॉज ऑलवेज लाइक दॅट!

"अशी ही जात आहे, आणि भारतातल्या महानगरांमधून यांच्यासारखे हजारो भक्त प्रशंसक प्रबुद्ध उच्चभ्रू पसरलेले आहेत. यांना विदेशातून, विशेषत: अमेरिकेतून एखादे प्रशस्तीपत्र मिळाले नाही तोवर आपले जिणे व्यर्थ वाटत असते...असे बुद्धिजीवी 'इलिट' आपल्या देशात हजारोंच्या संख्येने आहेत आणि त्यांच्या हातापायांखेरीज बाकीचे सगळे विदेशी आहे. हे परोपजीवी आहेत. परोपजीवी माणूस म्हशीच्या पाठीवर बसून तिच्या शरीरावरचे किडे खाणाऱ्या कावळ्यासारखा असतो. आमचा अशिक्षित, अर्धशिक्षित किंवा पोरकट असलेला, संस्कृतीपासून फुटून निघालेला आणि विनाकारण आधुनिक राहणीचे खोगीर

ओढलेला नवधनाढ्य वर्ग म्हणजे ती म्हैस आहे, आणि तोच वर्ग विदेशी मालाचा सर्वात मोठा ग्राहक आहे. गंमत म्हणजे त्याच्या पाठीवर बसून आमचा 'बौद्धिक इलिट' कावळ्यासारखे किडे मटकावीत चालला आहे! (असे हे बाहेरून होत असलेले सांस्कृतिक साम्राज्यवादाचे आमच्यावर आक्रमण आहे.)..."

हे सारे परसाईंचे लिहिणे ओठावर स्मित आणते, पण मनाला फटके मारल्यासारखे, दाहक, आणि प्रक्षोमक असते. सहसा वाचायला मिळणार नाही असा त्यांच्या मार्च ८४ मधल्या लेखाचा काही भाग विस्ताराने दिला, तो त्यांची लेखणी आसूडासारखी झोडपते कशी, हे ताजे वाचायला मिळावे म्हणून. यात गंमत नाही नुसती, मनोरंजन नाही, खडबडून जागे करणे आहे! दांभिक बुरखे ओरबाडून काढणे आहे!

बिचारा त्रिशंकु

आणखी एक वेगळा नमुना पहा. 'जैसे उन के दिन फिरे' या आपल्या संग्रहातल्या एका व्यंग्य लेखात परसाईंनी पौराणिक त्रिशंकूला रेण्ट कंट्रोलर विश्वामित्राने स्वर्गपुरीत एक चांगले घर इंद्राला सांगून देवविले, आणि घराचा ताबा घेण्यासाठी पाठवून दिले त्याची कथा आहे. त्रिशंकु बिचारा विश्वामित्राच्या मुलाला चांगले गुण दिले म्हणून विश्वामित्राला प्रसन्न करून घेतलेला गरीब शाळामास्तर. तो हातगाडीवर आपले सामान लादून इंद्रपुरीत (सिविल लाइन्स) इंद्राच्या बंगल्यावर जाऊन पोचला, आणि कोणत्या घरात राहायला जायचे ते विचारू लागला. इंद्र बगीचा मधे आरामखुर्चीवर बसला होता.

"नमस्कार, साहेब–"

"हं, काय काम आहे?" राग आला तरीदेखील तो गिळून त्रिशंकु म्हणाला, "विश्वामित्रांनी एका घरासाठी आपल्याला फोन केला होता–"

"ठीक आहे, ठीक आहे–कुठे आहेत तुझे साहेब? त्या घरात राहायला येणारे साहेब कुठे–?"

"नाही, मीच राहीन त्या घरात–"

"तू? तू राहणार माझ्या घरात? विश्वामित्र काय आजकाल दिवसादेखील पिऊन पडलेला असतो की काय?"

"का? काय झालं?"

"मला वाटलं होतं कुणा सज्जन माणसासाठी घर पाहिजे असणार–"

"मी काय सज्जन नाही? मी काय माणूस नाही? मी का नाही तुमच्या मालकीच्या घरात राहू शकत?"

"जो नुसता माणूस आहे त्याच्यासाठी नाहीत मी घरं बांधलेली–"

"म्हणजे? मी समजलो नाही–मी राहू शकत नाही, मग इथे राहण्यासाठी कोणती लायकी असावी लागते?"

"भिकारी इथे राहू शकत नाहीत! तुझ्याजवळ मोटार आहे? ट्रॅन्झिस्टर आहे? रेफ्रिजरेटर आहे? सोफासेट आहे? मुलं तुझी पब्लिक स्कूलमधे घातली आहेस? की कुठल्यातरी खेडवळ शाळेत? कॅक्टसचे किती प्रकार असतात आहे ठाऊक तुला? कोणत्या क्लबात जातोस तू?... नाही ना? मग तू इथे येण्याची हिम्मतच कशी केलीस?..."

हे परसाई आहेत. पैसेवाल्यांचा मुखवटा घणांनी फोडताहेत! 'इलिट'च्या आत्मकोषाचे धागे टराटरा फाडताहेत. नुसते हसवत नाहीयत, 'दिमाग' ठिकाणावर आणताहेत!

परसाईंची प्रेरणा :

अशाच भेदक व्यंग्य रचनामधल्या घायल वसन्त, अकाल उत्सव, मध्यमवर्गीय कुत्ता, सुदामा के चावल, मेनका का तपोभंग, यासारख्या लेखांनी हिंदी वाचकाला वेड लावले. त्यातले अनेक परिच्छेद वाचकांना जणू पाठ झाले आहेत. परसाईंचे स्तंभ, वृत्तपत्राचे एक फार मोठे आकर्षण असते. ते मनाला हळुवार फुंकर घालीत नाहीत, प्रहार करतात, पण तरीही लोकांना ते आवडते. कधी कधी आपल्या नादानपणाची जाणीव असलेल्या माणसाला आपल्याला कुणीतरी सडकून बोलावे असे वाटत असते, तसेच परसाईंचे लेख वाचताना वाचकाला वाटते! अर्थात जणू काय हे आपल्याला नव्हे, इतरांसाठी म्हटले आहे असा आव आणून माणूस वर वर खदाखदा हसतो देखील;

पण मनातल्या मनात तो उमजलेला असतो की या टोप्या आपल्याला देखील बरोबर बसताहेत! अन् अशाच मनस्थितीत मग माणसे धिटाईने आत्मपरीक्षण करू लागतात; हेच परसाईंच्या लिखाणाचे यश म्हणावयाचे. 'त्यांच्या लेखनामागची प्रेरणा सामाजिक मूल्यांसाठी संघर्ष करण्याची आहे (He is directly connected with the struggle of social values), अशा शब्दांत न्यायमूर्ति श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी परसाईंच्या लेखनामागची भूमिका नावाजली आहे, ती उगीच नाही.

जो लेखक नुसत्या लोकरंजनासाठी लिहायला बसलेला नाही, ज्याला काही विशिष्ट वैगुण्यांवर तडाखे लगावीत आपल्या प्रिय समाजाला जागे करायचे आहे, त्याचे नक्कीच काही तरी स्पष्ट वैचारिक चिंतन असते, एक पक्की बैठक असते, काही निकष असतात. परसाईंची तात्त्विक आणि व्यावहारिक बैठक साम्यवादाची आहे, आणि ती ते कधी लपवीत नाहीत. 'लोकांचा लेखक' बनण्याची आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात 'सरळ सरळ प्रश्न असा आहे की समाजात वर्गभेद आहेत, आणि कोणत्या वर्गाची बाजू घ्यायची हे लेखकाला निश्चयाने ठरवावेच लागेल. शोषण करणाराची की शोषितांची?... अनेक लेखक दोन्ही बाजूचे लिहितात. दोघांसाठी टिऱ्या बडवतात; एकाला म्हणतात, 'काय छान ठोकून काढतो आहे-', दुसऱ्याची कीव करतात, 'काय पिटाई होते आहे!' खरे म्हणजे हे स्वच्छपणे सांगावे लागेल की, तुम्ही पिटणाराच्या बाजूचे की पिटल्या जाणाऱ्याच्या? दुसरी गोष्ट म्हणजे आम्ही लेखक, आणि सामान्य लोक साधारणपणे एकाच वळणाचे आयुष्य जगतो. रिक्षावाल्याचे आणि आमचे रेशनचे दुकान एकच असते, साखरेचा काळाबाजार त्याला आणि मला सारखाच सोसावा लागतो. त्याच्या ज्या अडचणी, त्याच माझ्याही असतात. शिवाय मला हेही पक्के ठाऊक आहे की या अडचणी दुसऱ्या शोषक वर्गाला नसतात!... साहजिकच मी सामान्य माणसाच्या समस्यांनी संवेदित होतो. साखरेची टंचाई साठेबाज आणि नफाखोर व्यापाऱ्यांमुळे आहे हे माहीत असल्यावर माझी संवेदना पीडितांच्या बाजूने प्रकट झाली तर त्यात नवल ते काय? साहजिकच मी प्रस्थापितांना 'एक्स्पोज' करण्याचा, चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न करीन; क्रोध आणि घृणा माझ्या लेखनामुळे उत्पन्न व्हावी यासाठीच पोटतिडिकेने लिहीन. तो माझ्या लेखनाचा उद्देशच आहे!

डॉक्टरकडे आलेल्या कॅन्सरच्या रोग्याला जर डॉक्टर नुसता धीर देऊन तुला काहीच झालेले नाही असे सांगू लागला, तर तो डॉक्टर एक भला माणूस, भावनाशील मनुष्य थोडाच म्हणता येईल? डॉक्टरने खरे तर रोग्याला स्पष्ट सांगायला हवे की तुला कॅन्सर झाला आहे, पण आपण त्याला जास्तीत जास्त उपाय करू. तोच चांगला डॉक्टर, तोच माणुसकी असलेला डॉक्टर. व्यंग्य लेखकाला देखील ही भूमिका घेऊन स्पष्ट स्पष्ट लिहायला हवे, समाजातल्या विकृतींवर न्यायाची बाजू घेऊन हल्ला चढवायला हवा; आणि वर्गविग्रहामध्ये निःसंदिग्ध पवित्रा घ्यायला हवा'

आधुनिकतेशी परसाईंचे भांडण नाही, पण पश्चिम युरोपातली आणि अमेरिकेतली तीच फक्त आधुनिकता हे त्यांना मान्य नाही. पूर्व युरोप, समाजवादी देशांनीही आधुनिक विचारांची आणि राहणीची कास धरली आहे, तिकडे का पाहू नये? असा प्रश्न करून परसाई त्यातलेही वर्म उघडे करतात– 'समाजवादी आधुनिकता पत्करली तर वर्गीय स्वार्थ साधत नाही, शोषण स्वातंत्र्य नष्ट होते, काळा पैसा जमविता येत नाही, हरामखोरीने पैसा मिळवून नेत्रदीपक झगमगाटाचे आयुष्य जगता येत नाही. अमानुष स्वार्थाने अंदाधुंद दौडता येत नाही!' म्हणून व्यक्तिगत स्वातंत्र्यावर काही सामाजिक बंधने घालणारी समाजवादी देशातली आधुनिकता आपण पत्करत नाही. अरे, मनसोक्त स्वार्थ साधणारी अमेरिकी आधुनिकता तरी तुम्ही विचार करून स्वीकारता का? आधुनिक तर व्हायलाच हवे, पण त्याचा अर्थ अमानुषपणा स्वीकारायचा असा नव्हे! त्यामुळे संस्कृती नष्ट होते, जीवनदृष्टि बदलते, मूल्ये ढासळतात आणि संवेदनाच बधिर होते. अशा सांस्कृतिक साम्राज्यवादाचे बळी आपण होता कामा नये असा परसाईंचा आग्रह असतो.

पण त्याचबरोबर संस्कृतीच्या नावाने जोपासली जाणारी पुराणमतवादी, यथास्थितिवादी आणि पुनरुत्थानवादी विचारप्रणाली देखील आपण झिडकारली पाहिजे असे ते म्हणतात, कारण त्यामुळे तर्कनिष्ठा, विज्ञाननिष्ठा आणि हितकारी आधुनिकता या गोष्टींपासून आपण दूर राहतो. केरळमधला अय्यप्पा पंथ, बुनियादी इस्लाम, शतकुंडी यज्ञ, गायत्री यज्ञ, संतोषी मां, रथयात्रा, गंगाजल अशी याची नाना रूपे आहेत, आणि त्यापासून प्रत्येक समंजस, विवेकी, प्रगतिशील बुद्धिवाद्याने सावध राहून संघर्ष केला पाहिजे असा परसाई मोठ्या कळकळीने आग्रह करतात.

हरिशंकर परसाईंशी आपण या सगळ्याच बावतीत सहमत होऊ असे नाही, पण त्यांच्या विडंबनात्मक व्यंग्य लेखनाचा गाभा कळण्यासाठी त्यांची वरची प्रेरणाकेन्द्रे समजून घेतली पाहिजेत.

एक धोका :

अर्थात अशा मनस्वी पवित्र्याने उभ्या ठाकलेल्या आणि तेही उपरोध, विडंबन, वक्रोक्ती, व्याजोक्ती, थट्टा, टिंगल, टर, निर्भर्त्सना अशा सगळ्या शस्त्रांचा उपयोग करणाऱ्या लेखकाचा मार्ग सरळ आणि मऊ गालिचावरचा नसतो. असा लेखक विवादास्पद असतो, वैरीही उत्पन्न करतो. कधी कधी टोकाचे लिहून जातो, आणि ते टोक भलत्या ठिकाणी रक्त काढते, अन् परिणाम उलटाच होतो. असे काही प्रसंग परसाईंना देखील तीस वर्षात आले, प्रबोधनाऐवजी कटुताच वाढली. पण असे अपवाद सोडले तर त्यांच्या सतत परिश्रमाचे स्थान नेहमी वरचे राहिले. त्यांची ओळख करून घेताना हाही पैलू न पाहणे अन्यायाचे होईल, म्हणून केवळ त्याचा उल्लेख केला. व्यंगाचे शस्त्र शल्यक्रिया करून रोगी सुधारण्यासाठीच आपण वापरतो असे म्हणणाराला, त्या शस्त्राचे टोक कुठे जिव्हारी लागून रोगी टेबलावरच व्हायोलंट होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. हे अवघड आहे, पण केलेच पाहिजे. अलिकडे मात्र परसाईंच्या लेखनातली मिरची पोटात आगच उठेल अशी राहिलेली नाही.

स्तंभलेखन आणि साहित्यनिर्मिती :

स्तंभलेखन किंवा वृत्तपत्रातले लिखाण हे साहित्यच नव्हे, असा एक हेटाळणीचा सूर सन्मान्य साहित्यचर्चेत अनेकदा निघतो. या बावतीत परसाईंचे विचार नेमके आणि स्पष्ट आहेत. ते म्हणतात, 'खरोखर आपला उद्देश लोकशिक्षणाचा, लोकांमध्ये जागृती आणि चेतना उत्पन्न करण्याचा असेल तर, मी तर म्हणेन, प्रत्येक रचनात्मक लेखकाने थोडे तरी वृत्तपत्रीय लेखनही केले पाहिजे. बरे, आम्ही स्तंभलेखक नुसते कॉमिक्स-सारखे लिहीत नसतो, त्यांत अंतर्राष्ट्रीय राजकारण, अर्थकारण, सामाजिक–सांस्कृतिक–धार्मिक–सांप्रदायिक समस्या वगैरे कितीतरी असते. एखाद्या प्रासंगिक संदर्भात विषय लिहायला घेतला, तरी जे लिहिले जाते ते व्यापक असते, त्याचा स्पॅन मोठा असतो, त्यात विश्लेषण असते, त्यामुळे ती घटना शिळी झाली तरी स्तंभलेखन ताजे राहते. तीस वर्षापूर्वी लिहिलेला माझा मजकूर देखील आज तुम्हाला आजचा वाटेल! घटनेचा मानवीय अर्थ आम्ही लिहितो, तो जुना होत नाही. म्हणून स्तंभ-लेखन हे केवळ वृत्त कथन (रिपोर्टिंग) नव्हे, ते शाश्वत साहित्य आहे. वालमुकुंद गुप्त, बालकृष्ण भट्ट, शिवशंभू, चेकाव्ह, हेमिंग्वे, आर्दे, डिकन्सचे पिकविक पेपर्स, यांचे कितीतरी लिखाण स्तंभ लेखनाच्या रूपानेच झाले, पण ते अमर साहित्य आहे.'

असा हा मनस्वी व्यंग्यकार, आज शरपंजरी पडला असला तरी एक चिंतनशीलतेचा पुंज आहे. विवादास्पद असला तरीदेखील फार मोठ्या प्रमाणावर जागृतीचे काम करणारा आहे. समाजाच्या घडणीचा आणि आर्थिक संतुलनाचा विचार केवळ भावनात्मक माणुसकीचा नाही, शास्त्रीय मानवतेचा (Scientific Humanism) आहे असे मानणारा आहे साम्यवादी विचाराचा असला तरी निर्विवादपणे या मातीशी एकरूप आहे. सणसणीत-पणे फटके मारणारा शब्दप्रभु असला तरी कुशल शल्यचिकित्सकाच्या हाताने रोगाचा इलाज करणारा साहित्यकार आहे. त्याच्या मनातली तळमळ, उणेदुणे काढून केवळ फजिती पाहणाऱ्या टवाळखोराची नव्हे, 'न देखवे डोळा ऐसा हा आकांत, परपीडे चित्त दुःखी होते' अशा हृदयातून येणाऱ्या ओलाव्याची आहे. म्हणून हरिशंकर परसाई हिंदी

साहित्यातली एक रचनात्मक विचाराची मातबर असामी आहे !!

हरिशंकर परसाई यांचे प्रकाशित साहित्य

हसते हैं, रोते हैं (१९५१)
भूत के पांव पीछे (१९५५)
तब की बात और थी (१९५६)
तट की खोज (कादंबरी) (१९५६)
जैसे उनके दिन फिरे (१९५८) ज्ञानपीठ
बेइमानी की परत (१९६३)
सुनो भाई साधो (१९६३)
सदाचार का तावीज (१९६३) ज्ञानपीठ
पगडंडियों का जमाना (१९६६)
और अन्त में (१९६८)
उल्टी सीधी (१९७०)
रानी नागफनी (१९७१)
बोलतीं रेखाएं (१९७१)
निठल्ले की डायरी (१९७१)
अपनी अपनी बीमारी (१९७२)
तिरछीं रेखाएं (१९७२)
शिकायत मुझे भी है (१९७२)
एक लडकी, पांच दीवाने (१९७३)
ठिठुरता हुआ गणतंत्र (१९७३)
वैष्णव की फिसलन (१९७६)
मेरी श्रेष्ठ व्यंग्य रचनाएं (१९७७)
माटी कहे कुम्हार से (१९७९)
विकलांग श्रद्धा का दौर (१९८०)
पाखण्ड का अध्यात्म (१९८३)

□ □

उत्तम कानिटकर,
९०२ A, राइट टाउन, जबलपूर ४८२००२

हस्तलिखिते : आवाहन

महाराष्ट्रातील विविध ठिकाणी जुनी मौल्यवान हस्तलिखिते प्रकाशित न होता तशीच पडून आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा असा विचार आहे की, मौल्यवान हस्तलिखिते एकत्र करून आवश्यकतेनुसार त्यांची छपाई करून ती प्रकाशित करावी किंवा मायक्रोफिल्म करून त्यांचे जतन करावे. अशाप्रकारची हस्तलिखिते साधारणत: कुठे आहेत व ती कुठल्या स्वरूपात आहेत याची माहिती जर साहित्य संस्कृती मंडळाला देण्यात आली तर मंडळास कार्यवाहीच्या दृष्टीने ते सोईचे होईल. हस्तलिखिताची माहिती देताना मूळ लिखाण मोडी लिपित किंवा देवनागरीत आहे याचाही खुलासा करावा. प्राथमिक माहिती आल्यानंतरच मंडळ त्यावर पुढील विचार करील. याबद्दल संबंधितांना मंडळाकडून मानधन देण्याची सोय सध्या तरी नाही.

आपला
सु. द्वा. देशमुख
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई–४

पुन्हा एकदा मर्ढेकर

विवेक गोखले

१९८२ आणि ८३ या दोन वर्षात मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राशी संबंधित दोन मराठी ग्रंथ प्रकाशित झाले. पहिला, डॉ. द. भि. कुळकर्णी यांचा "मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनःस्थापना" ऑगस्ट ८२ मध्ये आणि दुसरा मौज प्रकाशनाचा, श्री. रा. भि. जोशी यांचा "कला आणि मानव" मार्च ८३ मध्ये. यापैकी दर्भिच्या ग्रंथाविषयी मार्च ८३ च्या तरुण भारतमध्ये लिहिले होते. आज, एक डिसेंबर १९८५ ला येणाऱ्या मर्ढेकरांच्या जयंतीच्या निमित्ताने, राभिंच्या ग्रंथाबाबत लिहिण्याची इच्छा आहे.

मर्ढेकरांच्या 'Arts and Man' चे भाषांतर राभिंनी १९३९ च्या उत्तरार्धातच केले होते आणि ते 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'त ऑक्टोबर १९४० ते एप्रिल १९४२ या दरम्यान पाच लेखांत प्रसिद्ध झाले होते. त्यांत 'Rhythm in Literature' आणि 'Literary Criticism' च्या भाषांतराची भर घालून आता 'कला आणि मानव' हा ग्रंथ सिद्ध झाला आहे. ग्रंथ भाषांतर स्वरूपाचा आहे. भाषांतर करतानाची स्वतःची भूमिका आणि घेतलेली खबरदारी याविषयी राभि लिहितात, "हे भाषांतर करताना मुळातला शब्द शक्यतो सोडायचा नाही, पण त्याबरोबरच शब्दाला प्रतिशब्द असेही करायचे नाही; मुळातला आशय सुटू नये, मूळ वाक्यांतल्या विधानांचे वजन बदलू नये, आणि भाषांतरात मराठीचे वळणही सुटू नये;–अशी काळजी घेण्याचा प्रयत्न केला आहे".

"भाषांतर करताना मुळातला अर्थ वाचकांना अधिक सहजपणे कळावा यासाठी जिथे मला माझ्या पदरचे शब्द घालणे इष्ट होईल असे वाटले तिथे मी ते [ ] अशा चौकोनी कंसात घातले आहेत. मुळातल्या एखाद्या संज्ञेसाठी पहिल्यांदा जिथे मराठी प्रतिशब्द वापरला तिथे वाचकांच्या सोयीसाठी मूळ इंग्रजी शब्द त्याच्या पुढेच ( ) अशा गोल कंसात दिले आहे. त्याचप्रमाणे जिथे मला माझ्या भाषांतराबरोबरच मूळ इंग्रजी देणेही उचित होईल असे वाटले तिथे मी पुढेच ( ) अशा गोल कंसात दिले आहे. मर्ढेकरांनी मुळातच जे शब्द गोल कंसात घातले आहेत, त्याचे भाषांतर करून ते मी { } अशा मेहरपी कंसात दिले आहेत".

"काही ठिकाणी मर्ढेकरांनी इंग्रजी शब्द, शब्दप्रयोग किंवा वाक्ये यांच्या अनुरोधानेच चर्चा केली आहे. अशा ठिकाणी मूळ शब्द, शब्दप्रयोग, वाक्ये वगैरेंचे भाषांतर किंवा लिप्यंतर न करता ती रोमन लिपीतच दिली आहेत". (सर्व अवतरणे कला आणि मानव, प्रस्तावना पृ. सात व आठ).

याखेरीजही जी काळजी राभिंनी घेतली आहे तिचा निर्देश त्यांनी केला आहेच. उदा. इटालियन मजकुराचे भाषांतर किंवा पाश्चात्य संगीतातील संज्ञा याबद्दल विवेचन करताना संबंधित तज्ज्ञांची मदत घेतली आहे. याच संदर्भात डॉ. रा. भा. पाटणकर आणि प्रा. श्री. पु. भागवत यांच्या झालेल्या मदतीचा विशेष उल्लेख राभिंनी केला आहे तो असा, "डॉ. पाटणकर आणि प्रा. भागवत यांनी तर जवळ जवळ प्रत्येक वाक्य मुळाशी ताडून पाहिले आणि योग्य त्या सूचना केल्या" आणि शेवटी असे म्हटले आहे की, "भाषांतराच्या बरेवाईटपणाची जबाबदारी अर्थात शेवटी माझीच आहे". सारांश, भाषांतर करताना घ्यायची ती

सर्व खबरदारी घेण्यात राभिनी यत्किंचित कसूर केलेली नाही हे कोणालाही मान्य करावेच लागेल. इतकेच नव्हे तर बराचसा मजकूर खुद्द मर्ढेकरांनी पाहिला होता, जरी त्यासंबंधी कोणतीच प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली नव्हती. याबाबतीत राभि लिहितात, "श्री. के. नारायण काळे यांनी मी केलेले भाषांतर पत्रिकेत प्रसिद्ध करायला मागितले आणि मर्ढेकरांनी ते दिले त्यात त्या दोघांचाही मोठेपणा दिसतो. मर्ढेकरांनी ते दिले यावरून त्यांना ते समाधानकारक वाटले असावे असे मी समजलो. कारण मर्ढेकर लेखनाच्या बाबतीत फार काटेकोर असत आणि श्री. काळेदेखील चोखंदळ समीक्षक आणि संपादक होते". (प्रस्तावना पृ. सहा) वास्तविक एवढे सगळे झाल्यावर, आणि पूर्वी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'त भाषांतर प्रसिद्ध झाले तेव्हा कोणी ना कोणी अनुकूल-प्रतिकूल अभिप्राय नोंदवलेच असणार आणि त्या अभिप्रायांची योग्य ती दखलही घेतली गेली असणारच असे मानले की प्रस्तुत भाषांतर अगदी निर्दोष असणार अशी आपली धारणा झाली तर त्यात अस्वाभाविक असे काहीच नाही. (हा झाला 'पण तरीही......' या प्रस्तुत लेखाच्या शीर्षकाचा पूर्वार्ध) आणि त्या धारणेला सामान्यत: धक्का लागण्याचा काही संभवही नाही. कारण असा धक्का लागण्याचा संभव निर्माण व्हायला 'Arts and Man' शी 'कला आणि मानव' कोणीतरी ताडून पाहायला हवे. आणि असे घडून येण्यासाठी असे ताडून पाहाण्याची इच्छा एखाद्याला व्हायला हवी (किंवा परीक्षणासाठी एखाद्याकडे ते दोनही ग्रंथ पाठवून एखाद्यात ती निर्माण करायला हवी.) आणि इच्छा निर्माण झाल्यावर Arts and Man त्याला उपलब्ध व्हायला हवे. पण ते झाले आहे दुर्मिळ. यामुळेच म्हटले की धक्का लागण्याचा संभव कमी. पण परिणामत: 'कला आणि मानव' प्रमाणभूत मानले जाण्याचा संभव आहे आणि त्याच्या प्रसिद्धीनंतर एका विशिष्ट कालमर्यादेपर्यंत जर ते अपरीक्षित राहिले तर मग त्याच्या प्रामाण्यावर अलिखित असे अखेरचे शिक्कामोर्तब होऊन मर्ढेकरांचे मराठीतील अभ्यासक आपला अभ्यास, आपले विचार, Arts and Man ला चुकूनही हात न लावता 'कला आणि मानव' याच ग्रंथावर आधारतील, आपली मते या भाषांतील ग्रंथाशी अविरोधी आहेत एवढीच खबरदारी घेऊन पुढे वाटचाल करत राहतील. या परिणामाचा पुढचा संभाव्य परिणाम असा होऊ शकेल की 'सौंदर्य आणि साहित्य' व 'कला आणि मानव' यांतील विचारांत परस्पर संगतीच कशी आहे हे दाखविण्यासाठी, प्रसंगी काही विज्ञान मंडळी हव्या तशा कोलांटचा उड्या मारायला, ...चे तारे तोडायला तयार होतील. असे काहीही होऊ नये, मर्ढेकरांच्या सौंदर्यविषयक मतांबाबत आहेत तेवढेच गैरसमज पुरे झाले, त्यांत आणखी भर पडू नये किंवा तशी शक्यताही निर्माण होऊ नये म्हणूनच राभिंच्या 'कला आणि मानव' या भाषांतराची मर्ढेकरांच्या अभ्यासाच्या निमित्ताने घेतली गेलेली आंशिक दखल जाहीर करायची इच्छा आहे. मर्ढेकर, पाध्ये, रेगे, पाटणकर, भागवत, राभी. इत्यादींनी मराठीतील सौंदर्यशास्त्राचे दालन समृद्ध करण्यासाठी जे निरलसपणे आणि निस्पृहपणे परिश्रम घेतले आहेत त्यामुळे या सर्वांबद्दल आदर वाटतो आणि त्यामुळेच वाटते की त्यांच्याच हेतूने प्रेरित होऊन काही दोषास्पद वाटलेल्या स्थळांचा निर्देश करणे अपरिहार्य वाटते तेव्हा (आणि त्यामुळेही) त्यांच्याविषयी वाटणाऱ्या आदराला धक्का बसतो असे कोणी मानू नये. माझी भावना अनादराची नाही.

दोषस्थळांचा विचार करताना प्रथम मर्ढेकरांचे अवतरण नंतर राभींचे भाषांतर, त्यानंतर पर्यायी भाषांतर आणि शेवटी स्पष्टीकरणात, पर्याय सुचवताना केलेला विचार किंवा पर्यायाचे समर्थन असा क्रम ठेवलेला आहे. तसेच या सर्वांत ज्यावर लक्ष केंद्रित व्हायला हवे आहे त्या शब्दांच्या किंवा वाक्यांच्या शिरोभागी १, २ असे अंक दिले आहेत आणि ते भाग ठळक लिहिले आहेत.

(१) मर्ढेकर, "Out of these concurrent experiences of the eye and the heart, combined with the feeling that in the former[१] I seemed to grasp something intrinsically abiding, and strengthened by the fact that the eye

never betrayed me while the heart sometimes did, arose a line of thought which has borne fruit in the analysis which the following essays set forth." (Arts and Man p. X)

राभी : "दृष्टी आणि अंत:करण यांच्याद्वारा हे जे अनुभव मला एकाचवेळी मिळत गेले त्याबरोबरच या अनुभवांच्या¹ ठिकाणी मला काही स्वभावत: अक्षय आढळल्यासारखे वाटले. माझे अंत:करण मला केव्हा केव्हा फसवी, पण दृष्टी कधीही फसवत नसे हा मला प्रत्यय आला. या साऱ्यांमधून एक विचारसरणी प्रकट झाली. तिचेच फळ म्हणजे पुढील निबंधात केले गेलेले विश्लेषण." (कला आणि मानव पृ. ३)

गोखले : "दृष्टी आणि अंत:करण यांच्याद्वारे हे जे एका रोखाने नेणारे (एकसारखे) असे अनुभव मला आले ते आणि त्यांच्या जोडीला, ज्या भावनेला या वास्तवाने बळकटी आणली की माझी दृष्टी मला कधीही दगा देत नाही पण अंत:करण मात्र कधी कधी दगा देते, अशी भावना की पहिल्या प्रकारच्या अनुभवात¹ (म्हणजे दृष्टीने मिळणाऱ्या अनुभवात) काही तरी, स्वभावत: खिळवून ठेवण्याची शक्ती आढळते, यांमधून एक विचारसरणी उदय पावली आणि तीच या निबंधांमधून फलित झालेली दिसते."

स्पष्टीकरण : (१) राभि म्हणतात तसा दोन्ही प्रकारात जर अक्षय असा अनुभव आला तर चित्रकलेला साहित्यापेक्षा वरचा दर्जा द्यायला मर्ढेकरांना काहीच कारण उरणार नाही. (२) 'concurrent' चा अर्थ जरी 'running or existing together' असा असला तरी इथे त्याला महत्त्व देण्याचे कारण नाही. कारण, येणारे अनुभव दोन भिन्न साधनांनी येणारे आणि भिन्न प्रकारचे आहेत. म्हणून त्यापेक्षा 'Concur'चा 'अर्थ' tend in the same direction (wirh)' हा अर्थ घेतला तर ते अनुभव भिन्न जातीचे असले तरी सौंदर्याच्या एकाच रोखाने जाणारे आहेत हे त्यातील साम्य, सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने सार्थ व अधिक महत्त्वाचे ठरते.

(२) मर्ढेकर : "......and beauty or aesthetic delight is said to depended upon the qualities of sensation absolutely and exclusively, without the addition of any other cognitive item to those sensations,......" (Arts and Man p. xiii)

राभि : "आणि असे म्हटले आहे की सौंदर्य किंवा सौंदर्यजन्य आनंद हा संवेदनांच्या गुणांवर संपूर्ण निखालसपणे अवलंबून असतो." (कला आणि मानव पृ. ५)

गोखले : "आणि सौंदर्य किंवा आभिरौचिक आनंद हा पूर्णपणे आणि फक्त संवेदनांच्या गुणांवरच अवलंबून असतो असे म्हटले आहे."

स्पष्टीकरण :. राभिच्या भाषांतरात सौंदर्य आणि संवेदना गुण यांतील संबंधाचे केवळ वर्णन आहे. मी सुचविलेल्या भाषांतराने 'सौंदर्यात ज्ञानात्मक घटक नसतो' या मर्ढेकरांनी पुढे व्यक्त केलेल्या भूमिकेला पाठिंबा मिळतो कारण माझ्या भाषांतराने ती भूमिका व्यंजित होते.

(३) मर्ढेकर : "......one art is as good as another; that poetry is no worse than painting and music¹ no better than either" (Arts and Man p. 78)

राभि : "म्हणजे कोणतीही एक कला घेतली तरी ती दुसऱ्या कोणत्याही कले इतकीच समर्पक होईल; म्हणजे काव्य हे चित्रकला आणि संगीत¹ ह्यापेक्षा उणे आहे असे नाही किंवा दोहोंपेक्षा सरस आहे असेही नाही." (कला आणि मानव पृ. २२)

गोखले : "म्हणजे कोणतीही एक कला घेतली तरी ती दुसऱ्या कोणत्याही कले इतकीच समर्पक होईल; म्हणजे काव्य हे चित्रकलेपेक्षा निकृष्ट नाही की संगीत हे त्य दोहोंपेक्षा सरस नाही."

स्पष्टीकरण : कलांमध्ये सोपानक्रम असल्याची मर्ढेकरांची भूमिका मर्ढेकरांच्या भाषेतून व्यंजित होते पण राभिच्या भाषेत असे न राहता सगळा रोख काव्यकेंद्रित होतो. असे होण्याचे संभाव्य कारण असे की मुळातील वाक्यात 'music' नंतरही 'and' आहे या गैरसमजातून भाषांतर झाले आहे. पहा, अशा प्रकारे 'and' हा शब्द ठेवला की राभिचे भाषांतर अगदी योग्य ठरते.

(४) मर्ढेकर : "The chief traffickers' of this kind of soporific aesthetics are the poets" (Arts & Man p. 76).

राभी. "या मोहनिद्रात्मक सौंदर्यमीमांसेचे प्रमुख प्रवर्तक[१] कवीच असतात." (कला आणि मानव पृ. २१).

गोखले : "या मोहनिद्रोत्पादक सौंदर्य मीमांसेचा काळा[१] बाजार करणारे प्रमुख व्यापारी कवीच असतात."

स्पष्टीकरण : राभिंच्या 'प्रवर्तक' शब्दातून Traffickers चा निर्भर्त्सनात्मक अर्थ व्यक्त होत नाही. भावनात्मक अर्थाला महत्त्व येणे ही सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने गर्हणीय बाब आहे असे मर्ढेकरांचे मत–

कोशातील, Traffic चा अर्थ असा : Trade (in goods or usu. in something that should not be bought and sold.)

(५) मर्ढेकर : "Either by explicit[1] aesthetic formulation or by recording their own reactions before a work of non–literary art, both of which could not but be in terms[2] of poetic (that is to say non–aesthetic–emotional) experiences they have brought the assuarance of an apparently authentic certainty to what was before merely a tempting surmise namely, the assumption[3] that poetry is a fine art on the same level as painting, music, sculpture dancing etc. (Art & Man p. 76).

राभि. : "आणि काव्य ही देखील चित्र, संगीत, शिल्प, नृत्य इत्यादींच्या पातळीवरचीच एक ललित कला आहे अशी जी पूर्वी केवळ एक मोहक कल्पना[३] होती तिला, एक तर सौंदर्य तत्त्वांची उघड[१] मांडणी करून किंवा जी वाङ्मयेतर कलाकृती आपण पाहिली तिच्या आपल्यावर झालेल्या परिणामांची नोंद करून, आपातत: विश्वासार्ह अशा सत्यवाची आश्वासकता त्यांनी प्राप्त करून दिली आहे. पण कवींची सौंदर्य मीमांसा किंवा वाङ्मयेतर कलाकृतीसंबंधीची त्यांची प्रतिक्रिया यांना साहजिकच काव्यात्म (म्हणजे सौंदर्यभावनेतर) अनुभवांचा[२] संदर्भ असणार. (कला आणि मानव पृ. २१).

गोखले : "एक तर उघड उघड[१] आभिरोचिक मांडणी करून किंवा वाङ्मयेतर कलाकृतींच्या दर्शनाने आपली जी प्रतिक्रिया झाली ती नोंदवून, या दोन्ही गोष्टी अर्थातच काव्यात्म अनुभवांच्या भाषेत[२] (म्हणजेच अन–भिरोचिक भावनात्मक) असणार, कवीमंडळींनी, काव्य ही चित्र, संगीत, शिल्प, नृत्य इत्यादि ललित कलांच्या स्वरूपाचीच एक ललित कला आहे या काव्यविषयक गृहीताच्या[३] स्वरूपाच्या मोहक अटकळीला सकृद्‌र्शनी विश्वासार्ह अशी आश्वस्तता आणून देण्याचा प्रयत्न केला आहे."

स्पष्टीकरण : (१) 'Explicit' हे aesthetic'चेच विशेषण समजावे 'formulation'चे नव्हे. कारण पुढे 'or' नंतर आलेली गोष्ट अनुभवांच्या पातळीवरची आहे म्हणजे म्हटलं तर तिला implicitly aesthetic म्हणू शकतो.

(२) 'in terms of'चे भाषांतर '...चा संदर्भ असणार' असे करण्यापेक्षा '...च्या भाषेत' असे करणेच योग्य वाटते. आणि असेच भाषांतर पुढे खुद्द राभींनीही केले आहे पाहा. कला आणि मानव पृ. २३ वरून १६ वी ओळ, उजवीकडून दुसरा शब्द.

(३) 'the assumption'चा अर्थ राभींच्या भाषांतरात यायचा राहूनच गेला आहे

(६) मर्ढेकर : "Since every one understands, or thinks he understands, poetry, more or less" (Arts and Man pp. 78-79).

राभि : "प्रत्येकालाच आपल्याला काव्य समजले किंवा कमी अधिक प्रमाणात समजते असे वाटते" (कला आणि मानव पृ. २३).

गोखले : "कमी अधिक प्रमाणात प्रत्येकालाच काव्य समजते, किंवा निदान त्याची तशी समजूत असते."

(७) मर्ढेकर : "You will appreciate one thing in the comfortable delusion that you are appreciating something else" (Arts & Man p. 81).

राभि : "एका गोष्टीचे रसग्रहण करताना आपण दुसऱ्याच गोष्टीचे रसग्रहण करीत आहो या सुखद संभ्रमात तो असतो." (कला आणि मानव पृ. २४).

गोखले : "भलत्याच (दुसऱ्याच) गोष्टीचे रसग्रहण करत असताना आपण योग्य त्याच गोष्टीचे रसग्रहण करीत आहो या सुखद संभ्रमात तुम्ही असता."

स्पष्टीकरण : राभींच्या भाषांतरात निदान अधोरेखित शब्दरचनेऐवजी 'असे त्याला वाटत असते' अशी शब्दरचना तरी हवी होती म्हणजे त्याच्या क्रियेतील भ्रामकत्व योग्य रीतीने व्यक्त झाले असते.

* * *

महत्त्वाची टीप : मर्ढेकरांनी 'आर्टस् अँड मॅन'-मध्ये Aesthetic quality, beauty असे दोन स्वतंत्र अर्थाचे शब्द वापरले आहेत. पण राभींनी त्यासाठी दोन स्वतंत्र शब्द वापरलेले नाहीत. फक्त 'सौंदर्य' हा एकच शब्द वापरला आहे कदाचित मर्ढेकरांच्या स्वत:च्या मराठी लिखाणातही असेच दिसून येते' हे त्यामागचे कारण असावे. पण हे समर्थन लंगडे आहे. कारण 'सौंदर्य आणि साहित्य'-च्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मर्ढेकरांनी पारिभाषिक शब्दांविषयी व्यक्त कलेली भूमिका लक्षात घेता १९८२ मध्ये भाषांतर होत असताना आणि विशेषत: Aesthetics करता 'अभिरीचिकी' हा योग्य शब्द पुढे आल्यावर, असे व्हायला नको होते असे वाटते. आणि जर या मागचे दुसरे कारण 'रूढी' असे असेल किंवा 'परिचितपणा' हे असेल तर एवढेच सुचवावेसे वाटते की शास्त्रीय लिखाणात 'रूढी' किंवा परिचितपणा' यापेक्षा 'चपखल आणि असंदिग्ध अभिव्यक्ती' हीच गोष्ट स्वीकारार्ह वाटायला हवी.

□ □

प्रा. विवेक गोखले
विदर्भ महाविद्यालय
अमरावती

रूपरेषा

वि. वा. शिरवाडकर / संपा. सुभाष सोनावणे / चेतश्री प्रकाशन, अमळनेर / पृष्ठे ११२, मूल्य रुपये ३५.

वि. वा. शिरवाडकर यांच्या वाङ्मयविषयक लेखांचे संकलन 'रूपरेषा' या पुस्तकात आहे. हे संपादित संकलन सुभाष सोनावणे यांनी केले आहे. १९६० ते १९८३ सालातील वाङ्मयीन लेखांच्या आधारे शिरवाडकर यांच्या वाङ्मयीन भूमिकेचे दर्शन ह्या संग्रहातून दृग्गोचर होते. ह्या संग्रहात १२ लेख व ७ टिपणे आहेत. काव्य, नाटक, ललित साहित्य, साहित्य समीक्षा, मराठी भाषा–लिपी या संदर्भातील लेख व टिपणे आहेत. लेख आणि टिपणे असे दोन स्वतंत्र भाग ह्या संग्रहात असले तरी त्यांचा अनुक्रम विस्कळीत आहे. क्रम कसा लावला याचा खुलासा संपादकाने केला असता तर प्रस्तुत ठरले असते. वस्तुत: हा अनुक्रम लेखांच्या संदर्भात ३, ९, ४, १०, ८, ५, ११, १२, १, ७, २, ६ असा व टिपणांच्या संदर्भात २, ३, ४, ५, १, ७, ६ असा असणे योग्य ठरले असते, त्यामुळे शिरवाडकरांची त्या त्या संदर्भातील भूमिका सलगपणे अनुभवता आली असती. माझ्या विवेचनाच्या सोयीसाठी वरील अनुक्रम ध्यानात घेऊन मी पुढे लिहित आहे.

कवितेच्या संदर्भातील टिपणे व लेख मी सलगपणे घेतले आहे. तसेच नाटक, ललित साहित्य, साहित्यसमीक्षा, मराठी भाषा–लिपी या संदर्भात केले आहे. त्यामुळे एक ठळकपणे दिसून आले की, शिरवाडकर यांची साहित्य व भाषा–लिपी संदर्भातील भूमिका न्यायाधिशाची नसून 'मर्मज्ञ रसिकांची आहे. त्यांनी कलेचा, कलाकृतीचा–परिणामसंबंध जीवनाशयाशी सातत्यानं जोडला आहे.

त्या त्या विषयाच्या संदर्भातील त्यांची भूमिका प्रथम आपण विचारात घेऊ. अगोदर कवितेबाबतची त्यांची विचारधारा काय आहे ते पाहू.

'कविता : एक खाजगी बेट' ह्या आत्मनिवेदनपर लेखनात शिरवाडकरांनी स्वकाव्यनिर्मितीचा पूर्वशोध घेतला आहे.

लेखनामागची असंख्य कारणं अज्ञात असतात याची त्यांना जाणीव आहे. 'कविता म्हणजे काय ?' शिरवाडकरांच्या मते काव्य हा माणसाच्या भोवतालच्या परिसराशी असलेला एक संबंध किंवा संवाद असतो. स्वानुभवात दुसऱ्याला सामील करून घेणे, तो स्वानुभव सर्वांचा होणे, स्वत:तून असे बाहेर जाणे व 'मी पण' व्यापक केल्याचे समाधान मानणे ही काव्यलेखनाची प्रक्रिया व प्रेरणा आहे. "शब्दांच्या द्वारे कवीचे व्यक्तित्वच बाहेर पल्लवित होत असते. म्हणजेच कवी काव्याच्या साहाय्याने एक सामाजिक संबंध जोडीत असतो. एक रिलेशन निर्माण करीत असतो. काव्य म्हणजे अखेरत: कवी आणि वाचक यांच्यामधला एक शब्दांकित प्रतिमामय संबंध" असतो. आत्माविष्काराची परिणती जेव्हा शब्दांचा द्वारा संवादात होते, तेव्हाच काव्याचा उदय होतो. काव्यातील आविष्कारात कल्पना आणि रचना याचे (ही) पदर विणले जातात. जे आपल्या मनात रुतलेले आहे, जे व्यवहारात आपण सांगू शकत नाही, ते काव्यातून आपण शब्दबद्ध करू शकतो.

व्यक्तिमत्व आणि काव्य यांचा संबंध सांगताना शिरवाडकर लिहितात, कविता ही संघटनेने सिद्ध करण्यासारखी वस्तू नव्हे. वाङ्मयाच्या सर्व प्रकारात काव्य हे अधिकात अधिक व्यक्तिगत स्वरुपाचे असते. साधारणत: सारेच वाङ्मय लेखकाच्या व्यक्तिमत्वातून आकार घेत असते. सर्वच साहित्य–प्रकारात अनुस्यूत असलेले लेखकाचे

व्यक्तिमत्त्व काव्यामध्ये अधिकतम प्रमाणात खर्ची पडते आणि प्रकटही होते. व्यक्तिमत्त्वाचा लोप म्हणजे काव्याचाही लोप. [पहा—रविकिरणांचा उदय आणि अस्त.] काव्य म्हणजे अखेरत: एक व्यक्तिगत अनुभव असतो. परंतु कितीही व्यक्तिगत असला, तरी समाजामध्ये प्रचलित संस्कारांची जी हवा असते त्या हवेतच तो जन्माला येतो. कवी कितीही आत्मनिष्ठ असला तरी प्रचलिताशी असलेले नाते त्याला झुगारून देता येत नाही. कारण प्रचलित संस्कारांच्या वातावरणातच त्याचे मानसिक जीवन व्यतीत होत असते, किंबहुना आकारित होत असते. येथे, शिरवाडकर साहित्य—कला व जीवन—समाज यांचा परस्परात समन्वय साधतात. पुढे मातृभक्ती व कौटुंबिक नाते या संदर्भातील प्रेमभावना काव्यातून आज नाहीशी होत असल्याची खंत शिरवाडकरांना आहे.

"ज्या भावना चिरंतन आहेत असे आपण मानतो त्यांचाही आशय कालान्तराने बदलतो, त्यांचे रूप पालटते व त्यातील उत्कटता कमीअधिक होते." या इतिहास तत्त्वाने प्रेमभावना काव्यातून नष्ट होत आहेत, कारण ती प्रत्यक्ष जीवनातूनही (तिच्या पूर्वीच्या स्वरुपात) लोप पावू लागली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आमच्या सामाजिक परिस्थितीत आणि मनोरचनेत जे बदल झाले आहेत अथवा होऊ लागले आहेत त्यातील हा एक. असा अचूक वेध शिरवाडकर घेतात. काव्यातील मातृभक्ती व कौटुंबिक नाते या संदर्भातील प्रेमभावनेचा काव्यातील अभाव—अॅलिनिएशन त्यांनी सूचित केले आहे. [पहा 'काव्यातील आई कोठे गेली ?]

केशवसुत व त्यांची कविता, गोविंदाग्रज व त्यांची एक कविता, बालकवी व त्यांची कविता, नारायण सुर्वे व त्यांची कविता व एकूण कवी—व्यक्ती, या संबंधीच्या टिपणांमधून शिरवाडकरांनी आपली काव्यआस्वादक दृष्टी व कलाभिरुची स्पष्ट केली आहे.

केशवसुतांनी "काव्यान्तर्गत आत्मनिष्ठा जीवनाच्या सर्व प्रांतांना स्पर्श करण्याइतकी व्यापक केली." या शब्दात शिरवाडकरांनी केशवसुतांचे निराळेपण पकडले आहे. "सामाजिक न्यायाची जाणीव ही प्रेमाच्या किंवा अध्यात्माच्या जाणिवेइतकी भावरूप आणि म्हणून काव्यकारण असू शकते, हे मराठी काव्याच्या अनेक शतकांच्या इतिहासामध्ये प्रथमत: केशवसुतांनी प्रत्यक्ष लेखनाने सिद्ध केले." "केशवसुतांनी आत्मनिष्ठेचे एक नवे तत्त्व मराठी काव्यात प्रविष्ट केले. बौद्धिक विलासात किंवा अलंकारांच्या सराफ बाजारात हरवलेली कविता त्यांनी माणसांच्या अंत:करणाजवळ आणली. म्हणजेच कविता कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्याच्या आंतरिक जीवनाचा आविष्कार करू लागली !" हे सार्वत्रिक मत मात्र शिरवाडकरांनी खरे मानले नाही.

'प्रेम आणि मरण' ह्या गोविंदाग्रजांच्या कवितेचा भावानुभव घेताना ते लिहितात ही कविता 'एक स्वल्पाकार महाकाव्य (मिनिएचर एपिक)' आहे. ह्या टिपणात त्यांनी 'प्रतिभा शक्ती'चे लक्षण सांगितले आहे की, "कला-निर्मितीला प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारी एक मानसिक शक्ती...अनुभूती, कल्पकता आणि विशिष्ट माध्यमातून आविष्कार करण्याचे तिचे सामर्थ्य" म्हणजे प्रतिभाशक्ती !

बालकवींवरील टिपणातही 'कविता म्हणजे एका मनाने दुसऱ्या एका मनाशी केलेला संवाद' हीच भूमिका मांडतात. केशवसुत—गडकऱ्यांच्या तुलनेने शिरवाडकरांना, 'बालकवी हे फार मोठे कवी आहेत, ज्यांना महान म्हणता येईल असे कवी आहेत, असे कधीच वाटले नाही. तथापि 'फुलराणी' त्यांना परिकथा वाटते. याच टिपणात बालकवींच्या मरणाविषयी ते लिहितात, "सांज उषेचे किरण पंखावर घेऊन वावरणारा, त्यांची पखरण मराठी काव्यात करणारा हा 'बालविहग' रेलगाडीच्या अजस्त्र, पोलादी एंजिनाखाली चिरडला जावा, ही महाराष्ट्राच्या काव्येतिहासातील एक निर्दय शोकांतिका. कठोराने कोमलाचा असा सूड घेतला नसेल." ह्या त्यांच्या शब्दातील सामर्थ्य रसिकांच्या लक्षात राहते.

शिरवाडकरांना माणसांमध्ये आणि जीवनामध्य रस आहे; म्हणूनच जीवनाचे कलात्मक दर्शन घडविणारे काव्यादी साहित्य त्यांना महत्त्वाचं वाटतं. आणि त्याच दृष्टीनं त्यांनी नारायण सुर्वे

अनुक्रमणिका

यांच्या काव्यवृत्तीचा वेध घेतला आहे. ह्या टिपणा-तही त्यांनी आपली काव्यविषयक भूमिका सहजपणे नोंदविली आहे.

पहिली गोष्ट लक्षात येते ती ही की, सामाजिक स्तरांच्या अनुषंगाने व स्थानमहात्म्याने कवी व काव्य मूल्यमापन करण्यास त्यांचा विरोध दिसतो. वाचकत्वाच्या सरहद्दीचा कवित्वाच्या सरहद्दीशी मिलाफ होणे हेच काव्याच्या यशस्वितेचे गमक ते मानतात. इथं ते वाचकत्वालाही महत्त्वाचं स्थान देतात. 'अखेरत: वाचक हा समाजाच्या वाङ्मयीन परंपरांचा संरक्षक आणि या सांस्कृतिक माल-मत्तेचा मालकही असतो.' तथापी 'माणसाच्या आत्मिक आविष्काराशी प्रतिज्ञेने संबंधित असलेली काव्यासारखी वस्तु स्थिर किंवा स्थितीस्थापक केव्हाच असू शकत नाही.' म्हणूनच कवितेत नवतेला महत्त्व येते. वाङ्मयात जीवनाप्रमाणेच 'एक विरोधविकास तत्त्व नेहमीच कार्य करीत असते. जे आहे त्याच्या विरोधातून काही नवे उत्पन्न होते आणि हे नवे प्रस्थापिताशी मिलाफ करून पुन्हा नव्या वेगळ्या 'आहे'ला जन्म देत असते.' याला सुर्वे यांची कविता अपवाद नाही. परंपरेची 'नाळ तुटली तरी नाते तुटत नाही' हे सुर्वेची कविताही बोलून दाखविते. म्हणून सुर्वेची कविता चांगली आहे. ती आशय-आकारात एकत्व साधते. 'चांगल्या कवितेत आशय आणि आकार यात भेद असत नाही. आशयच आपल्या विशिष्ट आकाराला बोलावून घेतो.' आणि हाच विचार पुढे 'साहित्य : रूप आणि आशय' या लेखात विस्तारानं मांडतात. त्यासंबंधी पुढे पाहू.

'कवी : एक आदिवासी !' हे शिरवाडकरांचे टिपण अपूर्ण वाटते. फसलेले वाटते. आदिवासी व कवी यांचा भावसंबंध त्यांनी नीट उलगडलेला नाही. मात्र 'परंपरांशिवाय मूल्यांचे संरक्षण होत नाही' हे त्यांनी त्यात म्हटले आहे कवी मूल्यगर्भ परंपरा जपतो या अर्थानं तो 'आदिवासी'च असतो. A Poet is a savage in civilized society हे त्यांना त्यातून सांगायचं असलं तरीही टिपणातून त्याचे नीटसे सूचन होत नाही.

यानंतर आपण वि. वा. शिरवाडकर यांचा नाट्यविचारानुभव समजून घेऊ.

नाटकाचा विचार करताकरता सहजपणे शिरवाडकरांनी काव्य व एकूण साहित्यविचार यांना स्पर्श केला आहे.

त्यांना नाटक म्हणजे अनेक 'मीं'ची छावणी वाटते. आणि ते 'काव्याचे सहोदर'ही भासते. नाट्य व काव्य यांच्या सीमारेषा संदिग्ध आहेत. नाट्य व काव्य यांचा संबंध पाणी आणि तरंग याप्रमाणेच आहे. म्हणूनच त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, "काव्यामध्ये 'अहम्' अथवा मी हा जसा प्रधान घटक असतो तसा तो नाटकातही असतो का ?" आणि याचा शोध घेताना त्यांना जाणवतं की, "नाटकात अनेक पात्रे असतात, पण ती पात्रे म्हणजे लेखकाच्या दृष्टीने 'ते' नसतात, तर अनेक 'मी'च असतात." शिरवाडकरांना 'एकच प्याला' तील मद्यासंबंधीचे तीन पानी भाषण सुधाकरापेक्षा गडकऱ्यांचे अधिक आहे असे वाटते. हे 'एकच प्याला'बाबत खरे असले तरी 'माता द्रौपदी' (विद्याधर पुंडलिक) मधील 'मातृत्वासंबंधी'चे संवाद हे पुंडलिकांचेच आहेत, असे म्हणता येईल काय ? अर्थात नाही. म्हणूनच हा शिरवाडकरांचा विचार 'एकच प्याला'बाबत खरा असला तरीही नव्या काळातील नाटकां-मधील साल्पअल्प स्वगतांबाबत मान्य करता येईलच असे नव्हे. उलट नाटकात मी रहित 'मी' असतो त्या त्या पात्रांचा तो 'मी' असतो. हा विरोध नोंदवूनही शिरवाडकरांच्या विचारांची दखल घ्यावी लागते. आपले प्रमेय मांडताना ते लिहितात. "आपले मीपण हे अनेक मीपणांचे एक संकरित जाळे असते. नाटकात हा गुंडाळा सुटतो आणि त्याचे अनेक पदर विलग होऊन अनेक भूमिकांत प्रगट होतात. नाटकाच्या सर्वच नाही, तरी महत्त्वाच्या पात्रांमध्ये लेखकाचे मीपण, म्हणजे त्याच्या मीपणाचे एक सूत्र, व्यक्त होत असते. अर्थात काव्याइतके हे प्रगटीकरण निर्मल वा प्रांजळ असत नाही. त्यावर कल्पकतेचे, ज्ञानाचे आणि नाट्यान्तर्गत आवश्यकतेचे संस्कार होतात किंवा अधिक होतात. कारण काव्यातही ते कमी-अधिक प्रमाणात होतात." लेखकाचे मीपण जेव्हा नाटकात अधिक गुंतलेले असते तेव्हाच ते नाटक काव्याच्या जवळ जाते, हे कळल्यामुळे नाटक

अनुक्रमणिका

काव्यात्मता कधी येते याचे उत्तरच शिरवाडकरांनी त्यांच्या दृष्टीने नेमके दिले आहे.

पण प्रश्न असा आहे की लेखकाचे 'खाजगी-पण' (मीपण) नाटकात त्या त्या महत्त्वाच्या पात्रांमध्ये गुंतलेले असले तर ते नाटक 'काव्यात्म' होईल का ? Escape away from the personality ह्या तत्त्वाचा हा पराभव नाही का ?

शिरवाडकरांना 'नाटक' कुठे व 'कशात' सापडते ? याला त्यांचे उत्तर असे की, "मला नाटक हे नेहमी व्यक्तीत, माणसाच्या स्वभाव-धर्मात, त्याने भोवतालच्या परिस्थितीशी केलेल्या संघर्षात सापडलेले आहे. म्हणजे मला तरी नाटक सहसा घटनेत वा कथानकात सापडत नाही. (माणसाचे मन हा नाटकाचा मुख्य विषय असतो.) घटनांची गुंतागुंत हा नव्हे". (नाटक दोन व्यक्ती-मधल्या संघर्षातच असते असे नव्हे तर माणसाच्या एकाच मनातील मानसिक द्वन्द्वातही असू शकते) हेच ते सिद्ध करू पहातात. "नाटक सापडणे म्हणजे आपल्या शंभर 'मी' मधला एखादा 'मी' नाट्यव्यक्तीशी स्वभावाने, वृत्तीने, आशा आकांक्षेने–वास्तवाने नाही पण कल्पनेने बांधला जाणे" असते याचा दाखला म्हणून त्यांनी आपले 'दुसरा पेशवा' हे नाटक पुढे केले आहे. बाजीरावामध्ये त्यांना आपला 'मी' दिसतो.

नाटकाचा विचार करता करता त्यांनी कला आणि कारागिरी या द्वन्द्वासंबंधी आपला निर्वाळा दिला आहे की, "कारागिरी ही कलेची वैरीण नसते, तर आविष्कारांच्या व्यवहारात तिला साथ आणि साहाय्य करणारी ती तिची सखी प्रियंवदा असते. चांगला कलावंत हा चांगला कारागिरही असतो तसा तो नसेल तर त्याची कृती ही भोंगळ, आकारहीन, विस्कळीत होईल आणि मग ती कलाकृती या पदवीला पोचणारही नाही". हेच सूत्र पकडून त्यांनी वाङ्मयीन गुणवत्तेचा नाटकाच्या संदर्भात विचार केला आहे. (पहा नाटक: मूलतः एक वाङ्मयच) ह्यात नाटकाच्या एका प्राथमिक मूल्यासंबंधीची चर्चा आहे. 'वाङ्मयीन गुणवत्ता हा चांगल्या नाटकाचा पहिला निकष आहे'. असे शिरवाडकर लिहीत असले तरी, 'वाङ्मयीन गुणवत्ता' म्हणजे नेमके काय ? कोणते गुणविशेष वाङ्मयीन ठरतात ? याचा उलगडा सबंध विवेचनात होत नाही.

"नाटक हे रम्य काव्य आहे, आणि म्हणूनच काव्याप्रमाणे वा कोणत्याही इतर वाङ्मयप्रकारा-प्रमाणे चांगले नाटक हे वाङ्मयगुणांचा आविष्कार करणारे हवे, म्हणजेच त्याला वाचनीयता हवी."

यावरून स्पष्ट होते की, शिरवाडकरांनी फक्त नाट्यसंहितेचा विचार केला आहे, नाट्यप्रयोग व प्रयोगमूल्य यांचा विचार केला नाही. साहित्यमूल्य व प्रयोगमूल्य भिन्न असू शकतात वा नाही याचा बोध त्यांच्या विवेचनावरून होत नाही. जी नाटके वाचनीय नसतात ती वाङ्मयीन गुणवत्तारहित असतात असेच ते सुचवितात.

'नाटक' हा समूहात–समूहाने समजून घेण्याचा प्रकार असूनही ते लिहितात. काही नाटकांची (सावरकर, शि. म. परांजपे) वाचनीयता नाट्यावर नव्हे तर इतर गोष्टींवर आधारलेली आहे तथापि, "नाटकाची वाचनीयता म्हणजे वाचकाच्या मानसिक रंगभूमीवर होणारा त्याचा प्रयोग" हे वाक्य मग संदिग्ध वाटते. पुढे ते लिहितात, "कल्पना, भावना आणि आकलन यांच्या हाती निर्मितीची सूत्रे सोपवून वाचक आपल्या मनो-मंचावर नाटकाचा जो प्रयोग करीत असतो, तो वाङ्मयीन गुणवत्तेशिवाय कधीच यशस्वी होणार नाही...नाटकातील वाङ्मयीन गुणवत्ता हरवली तर सारेच हरवले."

'वाचनीयता' हा नाट्यपरिणाम आहे. वाङ्मयीन गुणात्मकता नक्कीच नव्हे. 'संगीत सौभद्र'च्या वाचनीयतेपेक्षा त्याची प्रयोग-शरणताच अधिक परिणामकारक ठरते हे विसरून कसे चालेल ?

त्यांनी संगीत नाटकांचे मूलतत्त्व पुढील शब्दात सांगितले आहे, "अभिजात संगीताला लालि-त्याची मर्यादा घालून त्याचा नाट्यपरिपोषासाठी उपयोग करून घेणे हे मराठी संगीत नाटकाचे मूलतत्त्व आहे." (पहा : संगीत नाटक : एक सुंदर वारसा)

काव्य व नाटक यांचा विचार करीतच शिरवाडकरांनी साहित्य–समस्यांसंबंधी आपले विचार मांडले आहेत. हे त्यांचे विचार 'साहित्य :

अनुक्रमणिका

रूप आणि आशय ', ' साहित्यातील परतंत्र', ' काही आग्रह आणि दुराग्रह ', ' कुंपणे आणि जानवी ' या चार लेखांतून स्पष्ट होतात.

' कलेची आधारभूत तत्त्वे कोणती ?' शिरवाडकरांच्या शब्दात सांगायचे तर, " अहंकार, अनुभव आणि आविर्भाव ही साहित्याचीच नव्हे, कोणत्याही मानवनिर्मित कलेची आधारभूत तत्त्वे आहेत. या तत्त्वामुळेच साहित्याच्या रूप व आशयात एकत्व येते हे त्यांनी ' साहित्य : रूप आणि आशय ' ह्या लेखात स्पष्ट केले आहे. या लेखात त्यांनी वाचक व निर्माता, आस्वाद आणि निर्मिती—या दृष्टीने वरील सूत्र स्पष्ट केले आहे. वाचक एखादी वाङ्मयीन कलाकृती वाचतो म्हणजे काय करतो ?— याचे ते उत्तर देतात की, लेखक कलाकृतीच्या संदर्भात आपली empathy—अंतरानुभूती प्रकट करतो. शब्दांच्या माध्यमातून जे भावनेचे, कल्पनेचे अथवा विचारांचे विश्व लेखकाने उभे केलेले असते त्यात तो (वाचक) प्रवेश करतो, आणि स्वतःच्या व्यक्तिगत जीवनाचे संन्यसन करून तो तेवढ्या वेळेपुरता मनाने लेखकाच्या स्वाधीन होतो." ही प्रक्रिया म्हणजे लेखकाच्या विश्वाप्रतीची sympathy नसते तर empathy असते. कलाकृती हा एक संवादच असतो. " एका मनातील भावविश्व दुसऱ्या मनापर्यंत संक्रान्त करण्याचे सामर्थ्य ज्या वाङ्मयात नाही. त्याला वाङ्मय म्हणण्याचे खरोखर कारणच राहत नाही ", ह्याही लेखात त्यांनी ' वाचनीयता ' हा वाङ्मयाचा पहिला—सर्वात महत्त्वाचा गुणविशेष सांगितला आहे.

कलाकृती रसिकनिरपेक्ष, निरुद्देश नसते. " माणसाचे सारे अस्तित्व म्हणजे भोवतालच्या जगाशी तो प्रस्थापित करत असलेल्या अनेकविध संबंधांची एक मालिका असते. साहित्य म्हणजे मूलत: अशा प्रकारचा एक संबंध होय. हा संबंध एका बाजूला साहित्यिकाच्या अहंकाराने आणि दुसऱ्या बाजूला वाचकांच्या अनुभवशोधकतेने नियंत्रित झालेला असतो." म्हणूनच ' कलेकरिता कला ' हे मत त्यांना ' थोतांड ' वाटते. कलावादी विचारसरणीत ' कलाकृती म्हणजे निर्भेळ आविष्कार ' हे जे प्रमेय आहे ते त्यांना चुकीचे वाटते.

साहित्य ' वाचकासाठी असणे ' व ' वाचकासाठी लिहिणे ' ह्यात फरक आहे. साहित्याच्या प्रक्रियेत वाचक गृहीत धरणे म्हणजे बरोबर वाचन गृहीत धरणे. ' साहित्यिक साहित्य लिहितो तेव्हा स्वतःचे व्यक्तित्व तो स्वतःच्या बाहेर प्रक्षेपित करीत असतो. वाचकांच्या आवडीनिवडीचा हिशेब करून आणि त्यांची टाळी कशी मिळवता येईल या चिंतेनेच तो लिहू लागला तर त्या प्रमाणात साहित्याच्या मूळ तत्त्वाशी तो प्रतारणा करील आणि त्याच्या साहित्याचे स्वरूप त्या मानाने निकृष्ट होईल.'

साहित्याचे मोल कशावर ठरते ? साहित्याचे साहित्यत्त्व, अनुभव, आविर्भाव या दोन तत्त्वांमुळे सिद्ध होते. आविर्भावाने (आकार देण्याची पद्धती) साहित्याचे रूप ठरते तर अनुभवाने त्याचा आशय निश्चित होतो. अनुभवशीलतेवरच अखेरत: साहित्याचे कमीअधिक मोल ठरते. अनुभवाचे सर्वाधिक वैशिष्ट्य हे की तो माणसागणिक वेगळा ठरतो. अनुभवातील वेगळेपणच साहित्याची प्रेरणा आहे. साहित्याचे ' विषय संपत नाहीत याचे एकच कारण माणसे संपत नाहीत, माणसांचे अनुभव संपत नाहीत आणि त्या अनुभवातील वेगळेपणाही संपत नाही.' अनुभवाच्या अनुरोधानेच साहित्याला कलाकृतीचे स्वरूप येते. म्हणजेच आशय आणि आकार यात सुसंवाद असतो. परंतु शिरवाडकरांना ' या दोन्हीत काही अभिन्नता असते, किंवा अनुभवातून आविर्भाव उत्क्रान्त होतो ' हे अमान्य आहे. या दोघांचे परस्परांशी अपरिहार्य नाते असले तरी आविर्भावाचे नियमन, समाजाने दिलेला शब्द, वाङ्मयीन परंपरा, त्या सांभाळण्याची—तोडण्याची प्रकृती—आवश्यकता, बदलती परिस्थिती ह्या गोष्टी करीत असतात.

साहित्यात काहीच स्वयंभू व नवे नसते. हेही शिरवाडकरांना आवर्जून सांगायचे आहे. " संपूर्ण नवीन हे विशेषण साहित्याच्या क्षेत्रात सशाच्या शिंगाहूनही अधिक खोटे आहे." आविर्भावाच्या म्हणजे आकाराच्या पलिकडे असलेली कलाकृतीची खास नवीनता, तिची खास स्वतंत्रता अनुभवातच समाविष्ट असते. आणि साहित्यकलेत जे पारंपारिक असते, आवाहनात्मक असते, समाजाच्या जवळ

जाणारे असते ते आविर्भावातून उत्पन्न होते. कलाकृतीचे अनन्यसाधारणत्व अनुभवाच्या संदर्भातच असते. "एखादी कलाकृती ही खास आणि फक्त तिच्या निर्मात्याचीच असते ती तिच्यातील अनुभवामुळे...... चांगल्या साहित्यकृतीला...... ही केवलता, ही अनन्यसाधारणता प्राप्त होते ती अनुभवाच्या संदर्भात."

अनुभव म्हणजे प्रत्यक्षाशी (वास्तवाशी) येणारा संबंध नसून लेखकाच्या मनात उद्‌भवणारी एक 'भावावस्थेतील जाणीव' होय.

'सामाजिकता' हा सुद्धा एक अनुभव आहे. म्हणजे भावावस्थेतील जाणीव आहे. 'सामाजिकता'ही आत्मप्रत्ययाचा भाग आहे. बाह्य संस्कारामुळेच व्यक्तीच्या भावकोषात प्रविष्ट झालेली सामाजिकता वाङ्मयरूप धारण करते. समाजाचा विचार म्हणजे सामाजिकता, संस्कृतीचा विचार म्हणजेच सामाजिकता, 'समाज जिवंत रहातो तो त्याच्या संस्कृतीमुळे आणि साहित्य हा संस्कृतीचा एक प्रमुख आधार आहे. साहित्याने संस्कृतीला अंकित करणे हीच साहित्याची सामाजिकता.'

या लेखात त्यांनी पांढरपेशी–जातीयवादी साहित्यावर नाराजी प्रकट केली आहे. "आपले साहित्य संपूर्ण आणि समृद्ध होण्यासाठी जातीयतेची बंधने नष्ट होणे ही एक आवश्यक शर्त आहे. 'साहित्यातील परतत्त्व कोणते ?' 'परतत्त्व' ह्या संकल्पनेचा आध्यात्मिक अर्थ शिरवाडकरांनी नाकारला आहे. त्यांच्या मते, "परतत्त्वाचा अर्थ सध्याच्या सामाजिक संदर्भात बदललेला आहे. आजचे परतत्त्व म्हणजे जे दलित, पतित व व्यथित आहेत त्यांच्या हिताहिताची जाणीव ठेवणे हेच होय. जाणीव प्रगट करण्यासाठी ललित साहित्यातून संदेश किंवा व्याख्याने देण्याची आवश्यकता आहे; असे मुळीच नव्हे. स्वातंत्र्य संपादनानंतर सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या नावाखाली...आध्यात्मिक घुके पुन्हा देशात निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. पण ऐहिक व्यवहारात मात्र जागोजाग अवनती, पराभव आणि दारिद्र्य यांचा स्वीकार करावा लागतो. जातिभेद, दारिद्र्य, अज्ञान समाजात आहे, "या काळोखातून मार्ग काढण्याची धडपड आजचा समाज करीत असताना ज्यांच्या जवळ प्रज्ञा आहे, प्रतिभा आहे, सहानुभूती आहे अशा साहित्यिकांनी व कलावंतांनी त्यांना सहाय्य करायला नको का ?" असा प्रश्न शिरवाडकरांनी उपस्थित केला आहे.

सामाजिकतेचा विचार करताना त्यांनी विश्वास प्रकट केला आहे की, राजकारणापासून साहित्य अलग राहूच शकत नाही. दुसरा विश्वास असा की 'श्रेष्ठ लेखनाच्या मागे प्रत्यक्ष अनुभूती असतेच असे नाही, पण अप्रत्यक्ष अनुभूती मात्र जरूर असते...श्रेष्ठ अप्रतिम साहित्याने रसिकतेचे जे संस्कार होतात ते जीवनाला पोषक व जीवनासंबंधीची निष्ठा वाढवणारे असतात.' मात्र "प्रचलित मताशी सोयरीक जमवण्यासाठी कलाकार जेव्हा आपल्या कृतीचे केवळ लेखन नव्हे तर संपादन करू लागतात, तेव्हा साहित्याची प्रगती खुंटते" (पहा : काही आग्रह आणि दुराग्रह)

स्वत: लेखक जेव्हा आपल्या विशिष्ट मतांचा अभिनिवेशाने उच्चार करू लागतात तेव्हा त्यांच्या स्वत:च्या लेखनावरतीच या मतांचे बंधन पडून त्याच्या निर्मितीची कक्षा संकोच पावू लागते आणि "लेखक प्रतिष्ठित आणि कीर्तिवंत असेल तर त्याचा मागोवा घेत येणाऱ्या नवीन संस्कारावस्थेत असलेल्या, उमलू पाहण्याऱ्या पण अद्याप न उमललेल्या कलाकारांवरही त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही." साहित्यातील विविध इझम्स् (वाद) स्वीकारून लेखक केवळ त्या वादाची तत्त्वे सिद्ध करण्यासाठी, साहित्याचा साधन म्हणून वापर करतात तेव्हा ते साहित्य 'कलात्मक'तेत उणे ठरते, असेच त्यांना सुचवायचे आहे. साहित्यातील 'कलात्मकता' अगोदर नंतर वाद–प्रणाली. साहित्यात 'वाद' यावाच ह्या आग्रहात त्यांना तथ्य जसे वाटत नाही, तसे साहित्यासंबंधींच्या दुराग्रहातही त्यांना रस नाही. हे दुराग्रह कोणते ? तर "काव्य दुर्बोध असायला हवे, कथा विश्लेषणात्मक असायला हवी, कादंबरी लैंगिक असायला हवी, नाटक काव्यशून्य आणि त्रोटक असायला हवे, अशा कितीतरी विचित्र दुराग्रहांची वर्दळ मध्या साहित्यात चालली आहे." याचे कारण लेखकांची लौकिक जीवनाबद्दलची अलिप्ततावादी प्रवृत्ती होय. "मराठी साहित्याचा

अनुक्रमणिका

विस्तार सर्व दृष्टींनी फार तोकडा आहे. आणि म्हणून अशा दुराग्रहांचा परिणाम येथे तीव्रतेने जाणवतो. लेखकांना आणि वाचकांनाही." साहित्यात वैफल्यग्रस्त प्रवृत्ती येणे हे वास्तवाशी सुसंगत नाही, आणि प्रचाराला नाके मुरडणे हे त्याहूनही उचित नाही. 'प्रचार नको' म्हणणाऱ्यांची 'साहित्यात एक नवीन पुरोहितशाही अवतीर्ण होत आहे." असे लिहून शिरवाडकरांनी प्रचारासंबंधीचा दुराग्रह खोडून काढला आहे.

साहित्य आणि क्रांती याबाबतही असणारा दुराग्रह त्यांनी नाकारला आहे साहित्याने क्रांतीला पोषक असे वातावरण तयार होऊ शकते, क्रांतीला अनुकूल असे लोकमत घडविता येते, लोकांना सजग दृष्टीकोन देता येतो यावर शिरवाडकरांचा विश्वास दिसतो. साहित्याची 'परिणामकारकता' नाकारता येत नाही, 'साहित्याने काहीच होत नाही असेमानणे म्हणजे साहित्याच्या अंगभूत सामर्थ्याचाच इन्कार करणे होय. साहित्याचे साहित्यत्त्व नाकारणे होय." सामाजिक परिणामातच साहित्याचे 'साहित्यत्व' असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. अशा साहित्यात अंशाने 'कलात्मकता' कमी पडली तरीही नुकसानीचे नाही. साहित्य लेखनामागे 'कलात्मक प्रेरणा' असावी–असते–असा जो आग्रह धरला जातो (हा आग्रह धरला जातो तो कलावाद्यां कडूनच) त्याने साहित्याच्या विस्ताराला अस्वाभाविक मर्यादा पडते. परंतु शिरवाडकरांचे हे मत एकांगी वाटते. कारागिरीचे समर्थन करणारे शिरवाडकर 'कलात्मक प्रेरणेसंबंधी' उदासीन होतात हे पटत नाही. 'नाटक : मूलतः एक वाङ्मय' लेखात त्यांनी तर वाङ्मयीन गुणवत्तेचा' आग्रह धरला आहे. साहित्यात 'विस्ताराला' महत्त्व की गुणात्मकतेला ? कलात्मक प्रेरणेमुळे साहित्याला–विस्ताराला –अस्वाभाविक मर्यादा पडत असेल तर साहित्याला 'कला' का मानावे ? हा माझा प्रश्न आहे. म्हणूनच साहित्याची गुणवत्ता त्याच्या लेखनामागे ज्या प्रेरणा असतात त्यावर अवलंबून असते असेही नाही. हे त्यांचे मत ग्राह्य धरता येत नाही. जर प्रेरणा कलात्मक वा कलाबाह्य असल्या तरीही साहित्याला 'गुणवत्ता' येऊ शकते.

"जेवढा विस्तार माणसाच्या मनाचा तेवढाच साहित्याचाही" हे खरे असले तरी मनाइतकी गूढ साहित्यकृती नसते. "वाङ्मय म्हणजे अखेरतः निवेदन (communication) असते. आविष्काराचीच परिणती निवेदनात होते आणि ते शब्दाच्या साहाय्याने साहित्यरूप धारण करते. अनुभवाच्या सामर्थ्याबरोबर निवेदनाची समर्थता ज्या प्रमाणात लेखकाजवळ असेल त्या प्रमाणात ते साहित्य कमीअधिक प्रभावी होते. साहित्यात काय सांगितले याला जेवढे महत्त्व, तेवढेच कसे सांगितले यालाही आहे. म्हणजे आविर्भावाला महत्त्व आहे. आविर्भावाला महत्त्व असेल तर ज्या प्रेरणेमुळे साहित्याला कलात्मक आविर्भाव लाभतो तो प्रेरणेला दुर्लक्षून चालणार नाही." असे ते म्हणतात.

पुन: नीती व क्रांती प्रचाराचा विचार करताना खिरवाडकरानी छान चिमटे घेतले आहेत. 'प्रकर्षाने केलेला संस्कार' म्हणजे प्रचार होय. साहित्यात प्रचार येतो म्हणून "कथाकाव्यातून संदेश मिळाल्याबरोबर वाचक कोटटोपी चढवून सगेच क्रांती करायला बाहेर पडतात, किंवा शत्रूपक्षाच्या मस्तकावर क्रांतीवादी पुस्तके आदळून त्यांचा कपाळमोक्ष करतात असा दावा कोणी केला आहे काय ?' असा एक रेशमी चिमटा घेतला आहे. गंगाधर गाळगीळांच्या साहित्यातील नीतीसंबंधीच्या भाषणाची वैयर्थता ते पटवून देतात. 'लेखकाने सद्गृहस्थ होऊ नये' हे गाडगीळांचे गृहितकृत्य...त्यावर शिरवाडकर लिहितात. "राक्षसांच्या अथवा पक्षूंच्या कोटीतील प्राणी श्रेष्ठ साहित्य निर्माण करतील अशी आशा बाळगणे कठीण आहे." असाही एक चिमटा घेतला आहे. प्रस्थापित नीती ही नीती नसून नाटक आहे आणि लेखक नीतीविरोधी असू शकेल पण नीतीबाह्य नाही. हे मत त्यांनी मांडले आहे. 'कुंपणे आणि जानवी' या लेखात अश्लीलतेचा विचार करताना नीतीअनीतीच्या आजच्या कल्पना सोळाव्या शतकातील पापाच्या कल्पनेवर नव्हे, तर न्यायअन्यायाच्या मूलगामी विचारावरच उभारणे आवश्यक झाले आहे ..." खऱ्या नीतीची प्रस्थापना टाळण्यासाठी, खोट्या नीतीचे देव्हारे माजवून

तिच्यावर समाजाचे लक्ष बांधून ठेवण्याचा उद्योग रूढ समाजव्यवस्थेत चालू असतो.". असा विचार त्यांनी केलाच आहे. कारण साहित्यातील अनुभव हा अखेरत: माणसाच्या जागृत मनाचा आशयपूर्ण अनुभव' असल्यामुळे व अहंकार हे साहित्याचे उगमस्थान असल्यामुळे साहित्यातील सामाजिक आशयाला कमी लेखणे हे एक कुंपणच आहे, साहित्याचे मुख कोणत्यातरी नैतिक ध्येयाकडे वळलेले पाहिजे हा विचार भ्रामक आहे. कलात्मकतेचा वनीतीचा उद्घोष हे साहित्यातील दुराग्रहच आहेत "विशिष्ट दुराग्रहांच्या मर्यादा घालून साहित्य सीमित करू पाहणे हा साहित्यासंबंधीचा सर्वात मोठा अपराध आहे." हे शिरवाडकरांचे मत न्याय्य आहे ह्या न्यायदृष्टीचा विचार करता, "अश्लीलतेचा प्रश्न सामाजिक वंधनाचा आहे त्याप्रमाणेच अनुभवविषयक प्रामाणिकतेचाही आहे." हे पटते परंतु त्यांनी याचे सविस्तर विवेचन केले असते तर ह्या विचाराला नेमकेपणा आला असता. समीक्षक, पाश्चात्य साहित्यकल्पना इथल्या साहित्याला लावतात उदा. पाश्चात्य रोमँटिसिझम व महाराष्ट्रीयन रोमँटिसिझम वेगळा असूनही त्यास पाश्चात्य रोमँटिसिझमसारखं वागवलं जातं. इथल्या वास्तववादाच्या व तिथल्या वास्तववादाच्या कल्पना भिन्न असू शकत नाहीत काय काय ? पण समीक्षक पाश्चात्य तयार कुट पट्ट्या घेऊन एतद्देशीय साहित्यकृती मोजतात. (उदा.वा. ल. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, माधव आचवल, श्री. के. क्षीरसागर) तेव्हा शिरवाडकर उपहासाने लिहितात, "दुसऱ्या देशातून येणाऱ्या मनीऑर्डरीवरतीच आपण गुजराण करणार आहोत काय ? प्रत्यक्ष जीवनाकडे तुच्छतापूर्ण पहाणे हा साहित्यातला मायावादच आहे, असे शिरवाडकरांना वाटणे म्हणूनच स्वाभाविक आहे.

यानंतर आपण शिरवाडकरांच्या 'मराठी असे आमुची मायबोली', 'हिंदी की इंग्रजी', 'लिपी सुधारणेचा विचार' या 'भाषा व लिपी' संबंधातील तीन लेखांचा विचार करू. ह्याही लेखांमध्ये त्यांची 'स्व–तंत्र' विचारसरणी दिसून येते.

साहित्यसंमेलने लेखकांची व साहित्यप्रेमिकांचीच न होता ती मराठी भाषिकांची 'प्रातिनिधिक मेळावा' व्हावा अशी अपेक्षा करून "लोकांना न समजणाऱ्या भाषेत चालणारी लोकशाही हे अद्भूत नवल या देशात सध्या घडत आहे" असा टोला हाणला आहे. भाषा ही नेहमीच जनसामान्यांना आकलन होणारी असावी, ती त्यांच्यापर्यंत पोहचावी हीच शिरवाडकरांची अपेक्षा आहे.

मराठी मायबोलीचा विचार करताना त्यांनी लिहिले आहे की, भाषेचा प्रश्न गौण मानणे ही कल्पना मुळातच त्यांना चूक वाटते. "भाषा हे समाजाच्या जीवनविकासातील एक आधारभूत सनातन असे तत्त्व आहे. भाषा जेव्हा नष्ट होते तेव्हा समाजाचे अस्तित्वच समाप्त होते...सर्व परिवर्तनातून समाजाला सोबत करणारी, गेलेल्या काळातील सत्त्व आजच्या काळापर्यंत आणून पोचवणारी. आणि पुढच्या काळातील परिवर्तनाला आवश्यक असे पाथेय. आजच्या काळात सिद्ध करणारी ती समाजाची मायशक्ती आहे मराठीवर होणारी इंग्रजीची कुरघोडी थांबवणे योग्य आहे, "सरकारी आणि शैक्षणिक प्रांतातून इंग्रजीला वेळीच निरोप दिला नाही, तर देशातील एकतेला आणि सामाजिक विकासाच्या गतीला...एक खीळ लागल्याशिवाय राहणार नाही" असा त्यांनी इशारा दिला आहे. त्यासाठी जागृतीचे कार्य हाती घ्यायला हवेच. "पाटील झोपला आहे तोपर्यंत आम्हीही झोपलेले राहू असे गावातील लोकांनी म्हणून चालणार नाही. ज्याला अगोदर जाग येईल त्याने आपले जागेपण जाहीर करायला हवे आणि जागृत दृष्टीला दिसणारी कार्येही हाती घ्यायला हवीत." असे त्यांनी सुचविले आहे. या संदर्भात त्यांनी 'सरकारी पदनामकोश' ह्यावर कडाडून हल्ला केला आहे, तो योग्यच आहे. त्यातील शब्दार्थ हे सामान्य वाचकाला आकलन न होणारे पण अव्यवहार्य, विचित्र व विसंगत आहेत हे पटवून दिले आहे.

'कारकून' हा शब्द कळणारा पण पदनामकोशातील 'उच्च, निम्न स्तर लिपिक' हे शब्द न कळणारे...जणू यात कारकूनाची थट्टाच आहे, शिरवाडकर लिहितात–"कमी पगाराच्या जोडीला या भयानक नामावळीचे ओझे फोडावर पुटकुळी

आल्यासारखे विचाऱ्याला वाटेल यात शंका नाही." अशा शब्दात त्यांची मिस्किलवृत्ती दिसते. ह्या पदनामकोशावर आचार्य अत्रे ह्यांनीही टीका केली होती. (संदर्भ : मुं. सकाळ–रविवार २७–१–१९८५)

संस्कृत ही मराठीची मातृभाषा आहे असे ठामपणे भाषाशास्त्रज्ञ सांगत नसताना शिरवाडकर 'संस्कृत भाषा ही मराठीची मातृभाषा आहे हे खरे आहे' असे लिहून जातात.

'राज्यभाषेला राज्यात शासनभाषेची पूर्ण प्रतिष्ठा मिळाल्याशिवाय, त्या राज्यातील स्वतंत्रता आणि त्यातील लोकशाही अपूर्णच राहील' ती राहू नये म्हणून सरकारी पातळीवरून मराठीची अवहेलना थांबावी ही शिरवाडकरांची रास्त अपेक्षा आहे. ह्यात त्यांनी लिपी सुधारण्याच्या कार्यासंबंधीही विचार व्यक्त केला आहे.

लिपीची 'सुकरता' हा त्यांनी महत्त्वाचा निकष मानला आहे. "मुद्रण आणि मुद्रालेखन (टायपिंग) ही सुकर केल्याशिवाय कोणत्याही समाजाला आपले राज्यविषयक, व्यवसायविषयक वा साहित्यविषयक उद्योग पुरेसे गतिशील करता येणार नाहीत" आणि देवनागरी लिपी ही ह्या दोन्ही बाबतीत अत्यंत अडचणीची आहे. अडचण दूर व्हावी म्हणून ते पुढील उपाय सुचवितात. १. शीर्षरेषा काढून टाकणे. २. आकारदर्शक रेषेप्रमाणे इकार, उकार, एकार इत्यादींच्या खुणाही नव्याने ठरवून त्यांची स्थापना संबंधित अक्षरांच्या पुढे आणि त्याच ओळीत स्वतंत्रपणाने करणे. ३. संयुक्ततेची नवीन खूण ठरवून सर्व जोडाक्षरे विलग करणे. ४. अनुस्वार अक्षरशीर्षावर न देता संबंधित अक्षरांच्या पुढे त्याच ओळीत देणे. ५. इ, ऊ, ए, ऐ या अक्षरांचे स्वतंत्र अस्तित्व रद्द करून ती 'अ'च्या बाराखडीत समाविष्ट करणे...

ह्या सूचित उपायांवरून शिरवाडकरांना लिपीविषयीचा अभ्यास काटेकोर असल्याचे सिद्ध होते. तर 'हिंदी की इंग्रजी ?' या लेखात त्यांची सामान्य–माणसासंबंधीची आस्था व्यक्त होते. इंग्रजीतून चालणाऱ्या राज्यकारभारामुळे "सामान्य माणसाचा, देशातील राज्यसत्तेशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होणार नाही. आपला प्रतिनिधी पार्लमेण्टमध्ये काय करतो हे त्याला कळणार नाही" कारण भाषा नव्हे आकलनीय, सुलभ भाषा हे राजकारण–आकलनाचे साधन आहे. आज हे साधन सामान्यांच्या हाती नाही, कारण आजच्या राजकारणात हिंदीपेक्षा इंग्रजीचाच व्यापार असल्याने, इंग्रजी भाषा जशी सामान्यांना कळत नाही, तद्वत त्यांना इंग्रजीमुळे राजकारणही कळत नाही. राजकारणाचा संबंध जसा साहित्याशी आहे तसाच जीवनाशीही आहे. जीवन व साहित्य हे राजकारणापासून अलग राहूच शकत नाही हे त्यांनी अगोदरच मान्य केले आहे.

इंग्रजी ही लोकभाषा नसून हिंदी ही लोकभाषा आहे तर मराठी ही मायभाषा आहे. "लोकभाषा होण्याची गरजही स्वातंत्र्य आणि लोकसत्ता ही दोन्ही जेव्हा अस्तित्वात असतात तेव्हाच निर्माण होते आणि तेव्हाच तसे होण्याची शक्यता असते," परंतु आज 'स्वातंत्र्य' असले तरीही पूर्णांशांनी लोकसत्ता नाही, म्हणूनच लोकभाषेला समाजकारण व राजकारण यातून हद्दपार व्हावं लागत आहे.

सत्यकथा मार्च १९६५ च्या अंकात प्रभाकर पाध्ये यांनी जो इंग्रजीचा पुरस्कार करणारा विचार मांडला होता, त्याला उत्तर म्हणूनच परामर्शपूर्ण असा 'हिंदी की इंग्रजी ?' हा लेख शिरवाडकरांनी लिहिला आहे.

प्रस्तुत परिचय–लेखात, वि. वा. शिरवाडकर यांच्या 'साहित्य व भाषा' या संदर्भातील विचारांचा परिचय करून दिला आहे. जेथे परामर्श घेणे आवश्यक वाटले तेथे थोडक्यात परामर्शही घेतला आहे.

डॉ. शशिकांत लोखंडे
६।११२ स्वातिमित्र, गुलमोहर मार्ग,
जुहू, मुंबई ४०००४९.

चंद्रबन

काव्यसंग्रह / कवी : बबन सराडकर / प्रकाशिका : सौ. नंदा कस्तुरे, चंद्रकांत प्रकाशन, ५३३ अ, न्यू नंदनवन लेआऊट, नागपूर.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानामुळे वर्षानुवर्षे अंधारात खितपत पडलेले

काही गुणवान कवी हळूहळू प्रकाशसन्मुख होत आहेत; त्यापैकीच बबन सराडकर हेही एक. नुकताच त्यांचा 'चंद्रबन' हा कवितासंग्रह नागपूरच्या चंद्रकांत प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे. विदर्भातला रसिक श्रोत्यांना गेल्या दहा वर्षात सराडकर = गेय कविता + गझल हे समीकरण मुखोद्गत झाले आहे. लय आणि तालबद्ध असलेल्या या कवितेला सराडकरांच्या पहाडी पल्लेदार आवाजाची साथ मिळाल्यामुळे तिला एक लक्षणीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

१९७२ ते ११८२ या दशकात सराडकरांनी ज्या कविता लिहिल्यात त्यांचे स्थूलमानाने प्रेमकविता, निसर्गकविता व सामाजिक आशयाच्या कविता असे ठळक टप्पे पाडता येतील. प्रत्येक वर्गात मोडणाऱ्या कविता अगदी मोजक्याच आहेत; आणि या कवितांना सत्यकथा, प्रतिष्ठान, युगवाणीपासून आकाशवाणीपर्यंत पूर्वप्रसिद्धीसाठी माध्यम मिळाले आहे. प्रत्येक काव्य प्रकारातील त्यांच्या मोजक्या पण अर्थवाही कवितांना बिंदूत सिंधू सामावणारे रूप प्राप्त झाले आहे. आणि ही रूपसिद्धीही स्वतःसिद्ध अशीच आहे. चंद्रबनाच्या प्रस्तावनेतून याचा निर्वाळा ते स्वतः देत आहेत—

"मी आयुष्यात कुठल्याही विशिष्ट काव्यप्रकाराशी बांधिलकी स्वीकारली नाही. कुठल्याही वळणावर कुणाचा गुलाम होणे, माझ्या प्रकृतीने सहन केले नाही. प्रवाहाच्या दिशेने केवळ वाहत जाणाऱ्या ओंडक्यासारखा मला ओंडका होता आले नाही. जगात जे जे सुंदर आहे ते ते मनाच्या अचेतन कोपऱ्यात सामावून घेत गेलो. एवढे मात्र खरे! शेवटी मी जसा आहे तसा समुद्राच्या चरणाशी नम्रतेनं उभा आहे, माझा तोल सांभाळून."

अर्थात कवितेच्या अभिव्यक्तीसाठीही त्यांनी विशिष्ट रचनाबंधाशी बांधिलकी स्वीकारली नाही. ओव्या, अभंग, मुक्तक, गझल इतकेच नव्हे तर हायकूसारखे जपानी रचनाप्रकारही त्यांनी आपल्या अभिव्यक्तीसाठी उपयोजिले आहेत. गेय कवितेप्रमाणेच मुक्त काव्याचेही त्यांना वावडे नाही.

अभिव्यक्त होण्यासाठी तथाकथित बड्यांच्या रचनाकृतींचा नाद एखाद्या नव्या कवीच्या कवितेला येऊ लागतो तेव्हा ती अनुकृती असते. आणि रूढ हायकूसारखे काव्यप्रकार हाताळण्याची कवीला जेव्हा गरज भासू लागते तेव्हा तिच्या परभाषेतील अभिव्यक्तीला प्रयोगाचे स्वरूप प्राप्त होते. 'हायकू' हा जपानी रचनाप्रकार सराडकरांनी प्रयोग म्हणूनच वापरलेला आहे. या संदर्भात आणखी उल्लेखनीय गोष्ट अशी की, सराडकरांनी 'हायकू' कवितेच्या आरंभीच मराठी रसिकांशी शास्त्रोक्त परिचय करून दिलेला आहे. "तीन ओळींत अनुक्रमे ५–७–५ अशी शब्दावयवं वापरून एकंदर १७ शब्दावयवांचा अत्यंत बंदिस्त असा 'हायकू' हा एक जपानी काव्यप्रकार."

ही वैशिष्टये डोळयांपुढे ठेवूनच सराडकरांनी 'पाखरं' निर्माण केली. दशकापूर्वी 'संदर्भ' मासिकाने 'हायकू'चा मराठीतून प्रथम प्रयोग केल्याचे स्मरते. माझ्या आठवणीप्रमाणे सुप्रसिद्ध कवयित्री सौ. शिरीष पै यांनी हा प्रकार प्रथम हाताळला होता. त्यानंतर फॅशन म्हणून अनेकांनी हा प्रकार अभिव्यक्तीसाठी वापरला. सराडकरांनी या प्रकाराचा अदमास घेऊन—अभ्यासपूर्वक तो अंगवळणी पाडून घेतला. त्यात ते यशस्वी झालेही. परंतु सराडकरांची खरी कविता भेटते ती त्यांच्या गझलांतून.

सुमारे दहा वर्षांपासून नागपूरी वृत्तपत्रांच्या साप्ताहिक अंकांतून पावसाच्या कवितांचा प्रघातच पडून गेला आहे. दरवर्षी पावसाच्या कवितांच्या विशेषांकांचा जणू मोसमी पूर वाहत असतो. अशा कविता पावसाळा सुरू झाल्याबरोबर वेष्टनातील छत्री बाहेर काढावी तितक्या कामचलाऊ असतात. नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे पावसाची कविताही तितक्याच नियमितपणे येऊ लागली आहे. या कवितांतही काही वैशिष्टपूर्ण कविता असतात. त्या आपले लक्ष वेधून घेतात. ना. धों. महानोर, बबन सराडकर हे जितके कवी तितकेच जातीवंत शेतकरी. पावसाशी त्यांचे नाते रक्तातूनच येत असते. किंवा पाऊसच या कवींच्या रक्तातून वाहत असतो. पावसाचे बहिर्गत उल्लास ते अंतःसौंदर्याच्या अभिव्यक्तीने नोंदवितात. सराडकरांचा 'पाऊस' अशा पाऊसगर्दीतूनही नेमके आपले लक्ष वेधून घेतो, रसिक मनाला चिंब भिजवून टाकतो—

" वाटते एकदा मजही
तू असे असे भिजवावे
की दुःख भोगिले जे जे
ते पार वाहुनी जावे "

' पावसाच्य कविता ' प्रत्येक भाषेतील श्रीमंत गीतांची परंपरा आहे. मराठी भाषाही त्याला अपवाद नाही. ' रविंद्रांची पाऊसगीते ' हा या परंपरेचा आद्य सूर. ' जलसिंचित क्षितिसौरभ ' रविंद्रांच्या असंख्य पाऊसगीतांतून कान अत्तराच्या थेंबासारखा दरवळत असतो. या पाऊसगीतांविषयी रविंद्रांनी आपला पहिलावहिला अनुभव सांगितलेला आहे, तो असा :

' जल पडे, पाता नडे (पाऊस पडे, पान डुले) त्यादिवशी झालेला आनंद आजही स्मरतो. अवघ्या चैतन्यात पावसाची रिमझिम नि पानांचे डुलणे भरून राहिले होते.'

सराडकरांच्या पाऊस ५, पाऊस १०, आणि एकांत ६ अशा कवितांनी मला—एका सामान्य रसिकाला—गुरुदेव टागोरांच्या पाऊसगीतांचे स्मरण व्हावे, हे सराडकांच्या पावसाच्या कवितांचे यश आहे :

" यावा निरोप आधी घेऊन गार वारा
तेव्हा जणू फिरावा देहावरी पिसारा "

पाऊस सुरू होण्यापूर्वीची ही सूचक चिन्हे कवीने शब्दबद्ध केली आहेत. पावसाच्या रुसण्यामुळे कवीचे मन हुंबरू लागते. पण तो सुरू होताच—

" तू बरसत येतो तेव्हा, हृदयातून कविता झरते " असा चिंब क्षण कवीला भोगायला मिळतो.

आजकाल गझल या रचनाबंधाची लोकप्रियता लक्षात घेऊन प्रस्थापितांकडून नवोदितांना ' गझलेचा ओनामा ' पढविण्यात येत आहे. ही तशी चांगली घटना आहे. परंतु गझलेचा प्रांत म्हणजे मोकाट कुरण नव्हे की कुणीही उठावे नि झटक्यात ग़झल करून बसावे. देखादेखी जोग घेण्याची ही गोष्ट नव्हे. कविश्रेष्ठ सुरेश भट, उ. रा. गिरी, भाऊसाहेब पाटणकर यांच्या गझला; शायरीमागे अनेक वर्षांची तपश्चर्या आहे; ही गोष्ट नवशिक्या गझलकारांनी विसरता कामा नये. नव्या पिढीत गझल हा प्रकार अनेक कवींनी हाताळण्याचा प्रयत्न केला. त्यात बबन सराडकर हे हुकमी पान आहे. श्रोत्यांकडून उत्स्फूर्त दाद मिळावी अशाच गझला सराडकरांनी लिहिल्या आहेत.

" जाणार जो तयाला नाही कसे म्हणावे
खोटे हसून मीही ' टाटा ' करून जातो."
(मार्गात भेटणारा)

" काय सांगावी प्रतीक्षा केवढी डोळ्यात या
पेटल्या सूर्यासही ये, ये म्हणावे लागते."
(म्हणावे लागते)

किंवा ' जीवन ' या गझले मधल्या ओळी :

" मुखडाच आळवावा कित्येकदा तरीही
इथल्या सुरात गाणे जुळले अजून नाही "
" सांगा कुठे उगाच वाकी भविष्य माझे ?
मी जीवनास शत्रू म्हटले अजून नाही "

याशिवाय ' काळ ', ' फाटके आयुष्य माझे ', ' हळूहळू ' या गझला बेमिसाल आहेत, यात संशय नाही. या गझलप्रकारातून कवी आणि कवितेचे व्यक्तिमत्व कमालीचे उठावदार बनते—

" हा काळ एवढासा सांगून खूप गेला
सूरांत हुंदक्यांच्या गाऊन खूप गेला."

' आता ' आणि ' माणूस ' या गझलाही अमिताभ आहेत. ' माणूस ' ही गझल तर सर्वधर्मसमन्वयाचे एक राष्ट्रीय स्मारक म्हणून जोपासावी या योग्यतेची आहे :

" नुसत्याच मंदिरांचा येथे सुकाळ झाला
हा देश देवतांचा सगळा बताल झाला "

या गझलेत ' वेताल ' ऐवजी ' बताल ' हा ग्रामीण शब्द कवीने हेतूपुरस्पर उपयोजिल्यामुळे गझलेची खुमारी आणखीच वाढली आहे. हा एक शब्द गझलेतील लोकभाषेचा प्रभाव दर्शविण्यास पुरेसा आहे. सर्वधर्मसमन्वय साधणाऱ्या आणखी या गझलप्राय ओळी :

" रे कोण बौद्ध, हिंदू ? इस्लाम अन् इसाई
एकाच ईश्वराची जो तो मशाल झाला ! "

' शहर / खेडे ' ही अशीच एक उल्लेखनीय कविता. या कवितेतील शब्दचित्र बघा—

तिथं रोज आभाळाला । फुटे चांदण्याचा पान्हा ।।
इथं उजाडून येता । काळजाचा होतो घाणा ।।

काळजाचा असा घाणा झालेले ग्रामीण कवीमन अखेर वैतागून म्हणते—

काय बांधावी देवळे मृगजळी देवासाठी ?
इथं आक्रंदतो कृष्ण मूठभर पोहचासाठी

सराडकरांच्या कवितेतील ही काही सौंदर्यस्थळे.

सराडकरांच्या कवितेत 'पाणी', 'नदी' या प्रतिमा विलक्षण प्रसरणशील होताना दिसतात. उदा: 'चंद्रवन' या शीर्षक कवितेतील 'पाणी' ही प्रतिमा पाहुण्यासारखी आहे.

"तू तर आता पैलथडीवर
फुलःफुलांची गाशिल गाणी
मलाच आले मरण भोगणे
जोवर आहे नदीत पाणी. . ."

ना. धों. महानोरांच्या प्रतिमासंदर्भात फ. मु. शिंदे म्हणतात– "निसर्ग आणि कविमन यांच्या नात्यातली प्राणलिप्तता इथे आहे." हीच प्राणलिप्तता बबन सराडकरांच्या 'चंद्रवना'तही आहे.

चंद्रबनातील कवीबरोबर होणारी आपली यात्रा नितांत रमणीय आणि स्मरणीय अशीच असते. ही कविता येणाऱ्या 'रम्य' भावीकाळाचे आपल्याला आश्वासन देऊन जाते.

'चंद्रवन'चे मुखपृष्ठ नासिकच्या आनंद अभंग या नवोदित कलावंताने या संग्रहाला दिलेली एक आकर्षक देणगी आहे. अभंगाच्या या मुखपृष्ठामुळे चंद्रबनाला लोभस रूप प्राप्त झालं आहे. प्रस्थापित कलावंतापेक्षा नवोदित गुणवंतांचे स्वागत हे कवी आणि चित्रकार या दोघांच्याही दृष्टीने सोयीचे असते.

'चंद्रबना'ची रेखाचित्रे अहमदनगरच्या श्रीधर अंभोरे यांनी रेखाटलेली आहेत. प्रत्येक रेखाटनामागे भाववृत्तीचे एक अंतःसूत्र आहे. कवितेवर असलेल्या या रेखाटनांनी 'पक्ष्याच्या वाढत्या पिसांचा भाव असलेली प्रत्येक थडी.' बोलकी केलेली आहे. 'मी संथ उभा'ला या चित्राची पार्श्वभूमी असती तर कवितेला एक वेगळे परिमाण प्राप्त झाले असते.

कवितांची मांडणी सुबक असून मुद्रणदोष टाळण्याची योग्य ती खबरदारी घेण्यात आलेली आहे. सराडकरांच्या कवितेला उज्ज्वल भवितव्य आहे. त्या दिवसांची मराठी माणसाला प्रतीक्षाही असणे स्वाभाविकच वाटते.

राम देशमुख
जि. प. मा. शाळा हंतोडा व्हाया अंजनगावसुर्जी
जि. अमरावती.

खुली मराठी एकांकिका लेखन स्पर्धा निकाल जाहीर

वेलिंग-२०-येथील श्री. सरस्वती सांस्कृतिक मंडळ या संस्थेने आंतरराष्ट्रीय युवकवर्षानिमित्त नवोदित लेखकांसाठी आयोजित केलेल्या खुल्या मराठी एकांकिका लेखन स्पर्धेचा निकाल आज जाहीर करण्यात आला. सविस्तर निकाल खालील प्रमाणे :–

रु. २५१/– चा प्रथम पुरस्कार : श्री. नारायण महाले यांच्या चिऊचंही घर होतं शेणाचं या एकांकिकेसाठी. रु. १५१/– व रु. १०१/– चा द्वितीय व तृतीय पुरस्कारासाठी अनुक्रमे श्री. राजगुरु आगरकर व श्रीमती प्रतिमा केसकर त्यांच्या वेठगिर आणि कळप या संहितांची निवड करण्यात आली.

या स्पर्धेत गोमंतक तसेच महाराष्ट्रातील एकूण ३५ स्पर्धकांनी भाग घेतला होता. तीन स्पर्धक लेखकानी स्पर्धेच्या अटी पुऱ्या न केल्याने त्यांच्या संहिता परिक्षणार्थ पाठवल्या गेल्या नाहीत. परिक्षक म्हणून डॉ. अरुण हेबळेकर, प्रा. मालती लाड व श्री. मनोहर सावकार यांनी काम पाहिले.

तीन कविता / रजनी कविमंडन

१. जलधार
वेभान सूर्याला
पेटलेल्या दिवसांना
हलकेच वाजूला सारत
कोसळली जलधार
गंधगार-देहाची

मरगळल्या झाडांवर
कोळपल्या भूमीवर
कोसळली जलधार
लवलवत्या अंगाची

दिशा-दिशातून-
साऱ्यां आसमंतातून
हिरव्या-गार लकेरी घेत-घेत
कोसळली जलधार
रुणझुणत्या पावलाची

नादावले सारे त्या-
गंधगार जलधारेने
नादावले सारे तिच्या-
हिरव्या-गार लकेरीने

२. पक्षी
तुझ्या या झाडावर
अनेक पक्षी-
वादळवाऱ्यावर झोका घेणारे
हर्षभरले गीत गाणारे
क्षितिजापलिकडे झेपावणारे
नवीन प्रदेश शोधणारे
तुझ्या या झाडावर
अनेक पक्षी-
नितळ आकाशात संथ पोहोणारे
नर
मानेत चोच खुपसून
अश्रू ढाळणारे
तुझ्या या झाडावर
अनेक पक्षी-
अनेक रंगाचे, अनेक ढंगाचे
एकाने उठावे
दुसऱ्याने बसावे
दुसऱ्याने बसावे
तिसऱ्याने उठावे
त्यांच्या रंगा-रंगात
तू न्हातेस
त्यांच्या लहरी-लहरींवर
तू तरंगतेस
तुझ्या या झाडावर
अनेक पक्षी
अनेक रंगाचे-अनेक ढंगाचे

३. शोध
या वाटेवर—
सतत हसणारे आकाश
लडिवाळ विलगणारा गारवा
अलगद तरंगणारी पावले
तर
आंत आंत रंगणारी सुस्वरांची मैफल
गुलाबी नक्षीदार वाट ही तुझ्यापर्यंत-
गुलाबी नक्षीदार वाट ही केवळ
तुझ्यापर्यंतच........!
आंतर डोहाचा वेध घेतेय रे मी
आंतर-डोहाचा शोध !

□ □

दोन कविता / मनोहर सप्रे

१. तुरूंग

सरळ रेषांसारखे गज आहेत पण—
तुरुंग अलिकडे की पलिकडे
ते मात्र माहिती नाही.
तरी—
अलिकडचे पलिकडच्यांना व—
पलिकडचे अलिकडच्यांना
मोकळं समजतात.
खरं तर मोकळं कुणीच नाही व—
असतीलच तर,
फक्त गजच तेव्हढे मोकळे आहेत.

२. प्रतिक्षा

अन् त्यांनी मला अनुज्ञा दिली की—
या क्षणानंतर तू पूर्ण मोकळा आहेस
पण—
तोवर मी इतका थकलो होतो की—
गुलाम म्हणून माझा स्वीकार करा
हा मी पुन्हा अर्ज केला.
त्या अर्जावर त्यांनी मला लाथाडले तेव्हा—
आतले स्थितप्रज्ञ हसले.
आता तुरुंगाची दारे बंद झालेली आणि—
पहारेकरी निश्चिंतपणे झोपाळलेले.
तटाबाहेर मीच फक्त जागा
दारे केव्हा उघडतात याची वाट बघत.

□ □

संदर्भ / किशोर पाठक

शापित असतात काही संदर्भ
अनाग्रही .... अवस्थांतर अनुभवणारे
साकल्याने संपवून टाकावीत गाऱ्हाणी
किंवा ओठावरली गाणी
दोघात अक्षरांची मूलभूत जागा तीच
एकात अक्षरे मावळतात
एकात उगवतात.

□ □

माणसं / शांताराम टेळकीकर

चटचट तापलेल्या दुपारी
रस्त्याच्या कडेला
उघड्या गटारीशेजारी
भिंतीच्या सावलीला ही माणसं बसून राहतात....
शहराच्या बेपर्वा रहदारीचे चढउतार
पाहणारी भकास नजर—
उन्हानं काळवंडलेल्या जरठ चेहऱ्यावर
दाढीचे राठ खुंट
आणि ओझी खेचून....खेचून....
कायम उमटलेली त्रासिक थकावट—
यांचे जुनाट मळकट विरलेले कपडे
आणि तुटक्या वहाणा....
....दुष्काळी आयुष्याच्या अशा एकेक खुणा
भिंतीवरच्या पोस्टरवर सुख–समृद्धीचे
भरघोस आश्वासन
अन् उगवत्या सूर्याच्या निशाणीवर
शिक्का मारण्याचे आवाहन—
तूर्त : यांच्या घट्टे पडलेल्या हातात
फक्त विडयांची थोटकं.

□ □

सप्टेंबर / वासंती इमानदार

सगळीच दुखरी दुःखं समजावून देता येत नाहीत.
थोडया सुखाळ आठवणीही आळवायला हव्यात !
सगळ्याच आर्ष भावना टिकवता येत नाहीत.
जर मानसिक संदर्भच ढळले असतील तर
कोडी घालूनही उत्तरं सुटत नाहीत.... !
सगळ्या चिन्हांकित केलेल्या वाटा,
मी मुद्दाम परत फिरून पाहून आले.... !
कुठही....कुठही अंकुर उगवलेला नाहीय.
पानफुटीचा ऋतू असूनही
पखालीतले पाणी वापरण्याची वेळ आली आहे....!
सगळीच दुखरी दुःखं
समजावून देता येत नाहीत.... ! !

□ □

अनुक्रमणिका

स्वगत / कॉम्रेड

प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते
आज जेव्हा डोळयातील पाणी
रक्त होत असते
तर याचंही कारण समजून घ्या
जी गोष्ट भिजवता येईल रक्ताने
ती भिजवून घ्या
वेळेपासून डोळे लपवता येत नाहीत

आपण काळया पडद्यांच्या
आणि निरागस चेहऱ्यांच्या
विरोधात असले पाहिजे
आपण हे पडदे फाडून
आपल्यातला उजेड
रस्त्यांना, माणसांना, ताऱ्यांना
दिला पाहिजे.

आजकाल नवी लिपी शोधण्याचा
माझा हव्यास कमी झाला आहे
दरेक पिढीत आता
बोलके ते अर्णव पियुषांचे नको
मी मुक्यांकडून फक्त
हात उंच करून
मुक्याने घोषणा देण्याची अपेक्षा करतो.

चौकात चार कावळयांनी यावे
त्यांनी ठरवावे की तेच उडणारे
ते उत्सव म्हणतील तोच उत्सव
तेव्हाच गावाने सजावे
तर मग कावळयाचा राग पाहिल्यावर
मी मरणाचे पत्र
कुणालाच पाठविणार नाही.

उगीच जन्मदत्त आयुष्य घेऊन
जगू नये उगाच उपटसुंभासारखे
असे वाटते
बांधावे एखाद्या एकांतात घर
आणि ऐन संध्याकाळी
दिवा सुद्धा लावू नये.

□ □

कविता / राजीव प्रभाकर पांडे

उंच होऊन होऊन
कोण किती उंचावेल
हात टेकता नभाला
त्याची जमीन सुटेल !

कुणी उडेल हवेत
त्याचे होईना पाखरू
पंख पंख ओरडून
नको आभाळाला धरू!

वृक्ष सांभाळण्यासाठी
मुळं खोलवर जाती
वरवर ज्यांचे ज्ञान
ते क्षणात कोसळती !

□ □

'अशी एकटचा एकटचाने' / प्रतिमा कामत

अशी एकटया एकटयाने, इथे ओढयाकांठी
घनगर्द दाट रानजाळीचा स्पर्श
मनीं भरून घेताना
अचानक आभाळ भरून येते.
पाऊसभरल्या दिशांतून उडू लागतात
खुळावलेले पांढुरके पक्षी चोंच भिजून.
तेव्हा आठवतात मला तुझी अनेक वेडं,
वेड लावणारी....... उखाणे घालणारी.
उदाहरणार्थ, पक्ष्यांच्या वासाचे एक झाड
तुला हवेसे वाटायचे, अचानक
तेव्हा थांबून जायचे, काळीज ओळखल्याप्रमाणे,
तू वाजवीत असलेले तंतुवाद्य. अबोल व्हायचे;
तंद्रीच्या खोल घुमट्यावर तरंगत
कुठे निघून जायचास...अगदी मलाही विसरून...
ही पॉपीच्या फुलांनी डवरलेली वाट ही
तुला आठवायची नाही.
नंतर कधीतरी असाच निघून गेलास, सांजवेळी
निळसर डोंगरांच्या दरीत, वारा भरारताना,
साधे वळूनही पाहिले नाहीस मागे
जशी काही आपली ओळखच नव्हती कधी......

□ □

दोन कविता / अर्जुन वाघमारे

१. वऱ्हाड

तुमचं नातं हेच विपरीत जुळलं
म्हणून गावकुसाबाहेर
आमचं विऱ्हाड थाटलं
असं हे सोयीरपण लाठ्या वांध्याचं
म्हणून तेजाव टाकून कशाला पाह्याचं !
ज्याची वान आहे ते रॉकेल
ज्याची वान आहे ती काडी डब्वी
एवढंच उजाड वस्तीतलं
लाईटिंगचं सामान थाटलं
म्हणून लग्न घटीकाचं
आवतानं सांगलं
पाण्याविना जेवण साधून
वऱ्हाड रानोमाळाला लागलं.

२. मला गाव कोठलं ?

संध्याच्या थडीत
ढोरं राखताना एकदा
झुडपा आडोशाचं
मडकं बाटलं....
नदी असून पानी नाही
तर—
मला गाव कोठलं ?
मला गाव कोठलं ?

□ □

जखम / नामदेव कांवळे

मोर्चेबंदी झाली आणि
समोरासमोर आलोही आम्ही
आघात प्रत्याघात
करण्याच्या उर्मीने !
पण—
मी उध्वस्त त्यांना पाहून.
उरीपोटी कवटाळून
हसावे की रडावे
या संभ्रमात !
अन्
ते तितकेच शोकाकुल
आपला वजीर गमावून.
मी हृदय विव्हल
ते भाव भग्न
मी त्यांना साठवतो डोळ्यात
ते डोळे चुरचुरत असल्याचे निमित्त करून
पुसतात डोळे
आमचे युद्ध नजरांचे
कधी मी घायाळ झाल्याचे
माझे डोळे सांगतात
कधी घाव खोल बसल्याचे
त्यांची मूक वेदना बोलते
तेव्हा मी परास्त योद्धयासारखा चालू लागतो
माझ्या जखमा मोजीत
त्यांच्या जखमांचा अंदाज घेत

□ □

तिची आणि त्याची गोष्ट / सुभाष सु. थेपडे

'तू किती चांगला आहेस.'
'....................'
'तू अशा विस्कटलेल्या कुरळ्या केसांत
कित्ती छान वाटतोस.'
'....................'
'माझ्या डोळ्यांत तू स्वतःला
पाहू शकतोस ?'
'हुं....'
'ए, बघ ना,
हा उधाणणारा समुद्र
तुला भीती नाही वाटत.... ?'
'नाही.'
'तू हातात आभाळ पेलशील ?
मी वाऱ्याची गाणी पाठ करत्येय्.... !'
'पुन्हा विचार कर.'

'तू नेहमीच निर्विकार असतो
पण कविता लिहिताना
तुझा चेहरा वेदनेने आक्रसल्यासारखा
का दिसतो ?'
'....................'
'सांग ना प्लीज.'
'................, ? ? ? '

□ □

दूरच्या गोष्टी / अनुराधा पाटील

झाडावरून तोडलेल्या फुलांना
पाणी शिंपून शिंपून टवटवी आणावी
तसं दिवसांच्या प्रत्येक कळीला
मी माझे श्वास देत गेले.
पण कोमेजतच गेलीत फुलं.
गळत राहिली एकेक पाकळी.
डोक्यावरच्या रणरणत्या उन्हात
नजर उचलून आभाळाकडे पाहणेही अवघड झाले.

कोवळी पानं ओरबाडताना कुणी
अचानक मुळंच ओढावीत
आणि सुकत जावं रोपटं तसं होत गेल जगतांना.
पसरल्या देह—मनभर मुक्या कळा.
असंच काळवंडत आकाश कोणत्याही संध्याकाळी
असेच-कढ येतात घडल्या न घडल्या गोष्टींचे
सांगतांना स्वतःलाच असं,
नकळत दाटून आला गळा.

कवितेतले जगणेच तेवढे खरे उरले.
बाकीचे हातात काहीच राहिले नाही.
खूप समजावूनही,
माझी रुसलेली स्वप्नं आता
डोळयात उतरेनाशी झाली आहेत.

मी चालते आता आकाशाखाली
माझ्याच सावलीतून.
तेव्हा काहीच नसतं आसपास माझ्या
पावलांच्या आवाजाखेरीज.
बाकी तर सगळयाच दूरच्या गोष्टी.
आणखी दूर गेल्या आहेत.

□ □

साभार पोच

□ माणूसनामा / चंद्रशेखर धर्माधिकारी / चेतश्री प्रकाशन, अमळनेर / रु. ४०/– □ आशा उद्याची / दादा धर्माधिकारी / चेतश्री प्रकाशन, अंमळनेर / पृ. ८९ / रु. १५/– □ हॅम्लेट / नाना जोग / मौज प्रकाशन गृह, मुंबई / पृ. १०७ / रु. २०/– □ कमल देसाई यांचे कथाविश्व / रा. भा. पाटणकर / मौज प्रकाशन गृह / मुंबई / पृ. ११० / रु. १९/– अॅश इज बर्निंग / प्रदीप राणे / कवडसे प्रकाशन, मुंबई / पृ. ११८ / रु. १५/– □ गुजराती साहित्याचा इतिहास / मनसुखलाल जव्हेरी / जयंत जोशी / साहित्य अकादमी, दिल्ली / पृ. ३२७ / रु. ३५/– □ काव्य गंगा / शं. गो. चरडे / राघे गोविंद प्रकाशन, हिंगणघाट / पृ. ५१/– रु. १३/– □ गोविंदाग्रज समीक्षा / अक्षयकुमार काळे / अमेय प्रकाशन, नागपूर / पृ. २०२ / रु. ५०/– □ सूक्तसंदर्भ / अक्षयकुमार काळे / अमेय प्रकाशन, नागपूर / पृ. १२३/– रु. ३५/– अनुवाद / भगवान ठग / वार्ड नं १० / पृ. १६ □ युद्ध / भगवान ठग / धनतोली वर्धा / पृ. ४८/ रु. १०/– मूरलॅंडस् / महावीर जोंधळे / पारिजात पब्लिकेशनस्, पुणे □ सागरशक्ती आकाशी / अनुताई भागवत / अमित प्रकाशन, नागपूर / पृ. ६७ / रु १५/– □ हर्ष खेद ते मावळले / ना. वा. फडके / श्री विद्या प्रकाशन, पुणे / पृ. २३६ / रु. ५०/– □ धारेला लागल्यानंतरच्या कविता / मंगेश विश्वासराव / सुमेरु प्रकाशन / पृ. ५६ / रु. १०/–.

चर्चा

मराठी विज्ञान कथा : अस्सल किती ? नक्कल किती ?

विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या पुढाकाराने दि. २८ व २९ जून १९८५ रोजी पहिले मराठी विज्ञान साहित्य संमेलन नागपूर येथे भरले होते. त्यात वाचले गेलेले शोध (?) निबंध विदर्भ साहित्य संघाच्या युगवाणी या मुखपत्राच्या मे-जून १९८५ च्या अंकात छापले आहेत. त्यातील मराठी विज्ञान कथा : अस्सल किती ? नक्कल किती ? सारखा एखादा दर्जेदार (?) आणि वादग्रस्त निबंध अधिकांच्या नजरेस पडावा म्हणून डॉ सावदेकरांनी २८ जुलै १९८५ च्या पुण्याच्या सोबतमध्ये पुनर्मुद्रित करविला आहे. त्यामुळे तो अधिकांच्या नजरेस आल्याने जास्त दर्जेदार व अधिक वादग्रस्त ठरला आहे.

डॉ. विश्वेश्वर सावदेकर यांनी वरील लेखात श्री. भा. रा. भागवत, डॉ. जयंत नारळीकर, श्री. चिंतामणी देशमुख, श्री. लक्ष्मण लोंढे, श्री. अरुण साधू, श्री यशवंत रांजणकर, श्री. किशोर कुळकर्णी, श्री. नारायण धारप, श्रीमती स्नेहल सोवनी, प्रा. रा. वि. सोवनी, श्री. विजय मोडक, श्रीमती सुमति कानिटकर, श्री. अ. ना. ठाकूर, श्री. ग. रा. टिकेकर, श्री. निरंजन घाटे अशा १५ लेखकांच्या दुगटीच्यावर कलाकृतींचे उल्लेख करून या कथा अनुवादित, भाषांतरित, रूपांतरित किंवा चक्क चोरलेल्या अशा चार प्रकारातील आहेत असे म्हटले आहे. डॉ. सावदेकरांचा रोख 'चक्क चोरलेल्या' यावर साहजिकच अधिक आहे. कथाकाराने अमुक एखादी कथा डोळ्यासमोर धरून त्यावर येथील वातावरणाचा पेहेराव चढवून आपली कथा सजवली असली तरी मूळ कथेचा उल्लेख जरूर केला पाहिजे हे सर्वमान्य होण्यासारखे आहे. काही-वेळा लेखनप्रक्रिया अशीही असू शकते की ५–६ पाश्चात्य कथा वाचल्यावर त्या आधारे एखादी कथा लेखकाच्या मनात मूळ धरते व त्यात त्या ५–६ कथांतील काही ना काही डोकावते. अशा-वेळी कशाचाच नामोल्लेख करायचा नाही की शोध निबंधासारखे कथेखाली संदर्भ साहित्य म्हणून त्या ५–६ कथांचा उल्लेख करायचा ? लेखकापुढे पेच आहे, पण डॉ. सावदेकरांसारख्या गुप्त पोलिसाच्या कचाट्यातून सुटण्यासाठी ते करावे लागेल अन्यथा मराठी साहित्यात सध्या व्यंकटेश माडगूळकरांचे सत्तांतर प्रकरण गाजतेच आहे आणि सोबत साप्ताहिकाच्या स्तंभातून ज्या निरंजन घाटयांनी हे प्रकरण निनावी राहून बाहेर काढले त्याच निरंजन घाटयांना आपल्या स्वत:वरही पुढील २–३ महिन्यात अशाच आरोपाखाली आरोपीच्या पिंज-न्यात उभे रहावे लागेल आणि थातूर मातूर उत्तर द्यावे लागेल (पहा सोबत दि. ११ ऑगस्ट १९८५ पृष्ठ ९, निरंजन घाटे यांचे पत्र) असे स्वप्नातही आले नसेल.

वरील १५ आरोपींपैकी आणखी एका लेखकाची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनी टीकेस उत्तर न द्यायचे पत्करले तर डॉ. जयंत नारळीकरांशी विस्तृत चर्चा केली तेव्हा त्यांनी सावदेकरांनी त्यांच्यावर केलेल्या टीकेतील प्रत्येक मुद्यास सडेतोड उत्तरे दिली.

'गंगाधरपंताचे पानिपत' ही कथा कॅटॅस्ट्रॉफे व क्वांटम् ट्रॅन्झिशन या दोन सिद्धांतावर आधारलेली आहे. फ्रेड हॉयेल यांच्या ज्या 'सेव्हन स्टेप्स् टू सन' या कादंबरीवर ही कथा बेतली आहे असे सावदेकरांचे म्हणणे आहे ही कादंबरी जेव्हा लिहिली जात होती त्याकाळी कॅटॅस्ट्रॉफे सिद्धान्त प्रचारात येत होता आणि हॉयेलनी या सिद्धांताचा उपयोग सेव्हन स्टेप्स टू सनसाठी केलेला नाही. धूमकेतू कथा ज्या 'ऑक्टोबर फर्स्ट इज टू लेट'

या कथेवर आधारलेली आहे त्या दोन्ही कथांच्या वैज्ञानिक कल्पना संपूर्ण वेगळ्या आहेत. त्यात कसलेही साम्य नाही. उलट धूमकेतू ही नारळीकरांची कथा १९७६ मधील आहे व त्यांचे गुरु फ्रेड हॉयेल त्यांच्या कथांचे नारळीकरांनी भाषांतर केले असा डॉ. सावदेकर आरोप करतात त्या हॉयेलनी 'कॉमेट हॅले' ही कादंबरी १९८५ मध्ये प्रकाशित केली आहे. आता नारळीकरांच्या धूमकेतूवर हॉयेलची कॉमेट हॅले आधारीत आहे का असे नारळीकरांना विचारता नम्रपणे 'तसेही नाही' असे ते म्हणाले. असे विचारायचे कारण म्हणजे अलिकडे सायन्स एज, सायन्स टूडे, द इलस्ट्रेटेड वीकली ही इंग्रजी मासिके मला कथा मागतात तेव्हा माझ्या आजवरच्या मराठी कथांची इंग्रजी भाषांतरे मी करून देतो असे त्यांनी सांगितले. प्रा. हॉयेलच्या कॉमेट हॅलेवर नेचर या सुप्रसिद्ध मासिकात परीक्षण आले आहे तर धूमकेतूचे इंग्रजी भाषांतरही द इलस्ट्रेटेड वीकलीत नुकतेच आले आहे. हे दोन्ही ज्यांच्या वाचनात आले आहे व ज्यांनी सावदेकरांची टीकाही वाचली आहे अशा एक रसिकाने नारळीकरांना गंमतीने का होईना पण विचारलेच की काहो वीकलीतील धूमकेतू कथा कॉमेट हॅले या हॉयेलच्या कादंवरीवरूनच ना ? काळाचा संदर्भ सुटला की टीका सुरू होते म्हणून टीकाकारावर फार प्रकांड वाचन आणि तौलनिक अभ्यासाची-त्यात काळाचा संदर्भ आलाच-अशी सर्वांगीण जबाबदारी येते.

'अॅथेन्सचा प्लेग' ही ज्या वैज्ञानिक सिद्धान्तावर आधारलेली कथा आहे तो सिद्धांत फ्रेड हॉयेल व विक्रम सिंघे यांनी १९७६ मध्ये मांडला. पण या सिद्धांतावर हॉयेल वा सिंघे यांनी कथा लिहिलेली नाही. उलट हॉयेलच्या ब्लॅक क्लाऊडवर ही कथा आधारित आहे म्हणून सावदेकर म्हणतात त्यातील वैज्ञानिक कल्पना इन्टरस्टेलर क्लाऊडमध्ये बुद्धिमता असते ही आहे तर अॅथेन्सचा प्लेग ची आधारभूत कल्पना अंतराळातून रोगांचे जीवाणू येतात ही आहे.

'अखेरचा पर्याय' कथा 'ए फॉर अॅंड्रोमेडा' आणि 'फॉबिन प्रॉजेक्ट'वर आधारित आहे असे सावदेकर म्हणतात. पैकी 'फॉबिन प्रॉजेक्ट' नारळीकरांनी अजून वाचलेली नाही तर 'ए फॉर अॅंड्रोमडा' मध्ये परग्रहातून संदेश येतात व त्या आधारे जिवंत मुलगी तयार केली जाते तर 'अखेरचा पर्याय'मध्ये कथानक आणि मूळ वैज्ञानिक कल्पना अगदी वेगळी आहे.

किर्लोस्करमध्ये प्रसिद्ध झालेली 'हिमप्रलय'ही नारळीकरांची कथा. त्याच्या शेवटी त्यानी हॉवेल यांच्या 'आइस' या पुस्तकाचा उल्लेख केला आहे पण आइस हे विज्ञान कथेचे पुस्तक नाही तर त्यात त्यांनी हिमयुग का येते याची वैज्ञानिक कल्पना मांडली आहे. हीच कल्पना हिमयुगमध्ये आहे, एवढेच.

'उजव्या सोंडेचा गणपती' या मागची वैज्ञानिक कल्पना 'वन टू थ्री इन्फिनिटी'मध्ये गॅमॉने मांडली तिचा उल्लेख 'यक्षांची देणगी' च्या परिशिष्टात पान क्रमांक २३२–२३३ वर विस्तृतपणे केला आहे.

'प्रेषित' कादंवरीच्या संदर्भात सावदेकर म्हणतात की ही कादंबरी 'सुपरमॅन' या इंग्रजी चित्रपटाच्या कथानकावर घेतलेली आहे. हे अशोक पाध्ये यांनी केसरीच्या १२ फेब्रुवारी १९८४ च्या परीक्षणात स्पष्ट केले आहे. परंतु १२ फेब्रुवारी १९८४ च्या केसरीच्या परीक्षणातील अवतरण पुढील प्रमाणे आहे (पाश्चात्य विज्ञानकथांचा प्रभाव) 'प्रेषितच्या कथेत सुपरमॅनच्या जन्मरहस्याची व त्याच्या पृथ्वीवरील अवतरणाची कल्पना सरळ अन्य ठिकाणाहून घेतल्यासारखी वाटते. टारझन या व्यक्तिरेखेची उचल जशी अनेकांनी इंग्रजीतही केलेली आहे तसाच हा प्रकार धरला तर तो क्षम्य ठरेल." नारळीकरांनी प्रेषित लिहिण्यापूर्वी सुपरमॅन हा चित्रपट पाहिलेला होता. त्यातील काही भाग डोक्यात घोळत होताच. त्यामुळे प्रेषितचा नायक आणि सुपरमॅनचा नायक ज्या तऱ्हेने पृथ्वीवर येतो यात साम्य आहे परंतु प्रेषितची कल्पना सुपरमॅनपेक्षा वेगळी आहे हे ज्यांनी सुपरमॅन पाहिला आहे आणि प्रेषित वाचली आहे त्यांना मुद्दाम सांगायला नको. मात्र ज्यांनी फक्त अशोक पाध्यांच्या परीक्षणाचा व तोही उडत उडत आधार घेतला आहे त्यांच्याकडून यापेक्षा वेगळी कोणती अपेक्षा करणार ?

नौलखा हारांचे प्रकरण 'ही कथा अनुवादित आहे असे सावदेकर म्हणतात पण या कथेच्या निमित्ताने पाश्चात्य वाङ्मय सतत वाचून, मराठी वाङ्मयास नावे ठेवणाऱ्या, नाक मुरडणाऱ्या व मराठी वाङ्मय इंग्रजी वाङ्मयावर परपुष्ठ आहे असे भूत ज्यांच्या डोक्यात घोळते त्यांना नारळीकरांनी, एक चांगलाच गुगली टाकला आहे तो 'नौलखा हारांचे प्रकरण' या कथेत. ही कथा इतर इंग्रजी कथेवरून घेतलेली तर नाहीच पण गंमत म्हणून त्यांनी त्या खाली 'भाषांतरीत' म्हटले आहे. भाषांतरित म्हटल्याने शेरलॉक होम्सबद्दलचे वातावरण अधिक वास्तविक वाटावे म्हणून 'भाषांतरीत' असे म्हटले आहे. उलट सावदेकरांसारख्या गुप्त पोलिसाने नौलखा हारांचे प्रकरण ही कथा शेरलॉक होम्सच्या कोणत्या मूळ कथेवरून घेतली आहे हे ओळखून काढावे असे त्यांचे त्यांना आव्हान आहे.

यक्षांच्या देणगीच्या प्रस्तावनेत (पृष्ठ अकरा) नारळीकरांनी त्यांच्या 'कृष्णविवर' या पहिल्या कथेची कथा लिहिली आहे. ती कथा त्यांनी जयंत विष्णु नारळीकर ज. वि. ना. या आद्याक्षरांची उलटा पालट करून ना. वि. ज. नारायण विनायक जगताप या नावाने व पत्नीच्या हस्ताक्षरात मराठी विज्ञान परिषदेच्या १९७४ मध्ये तळेगावला भरलेल्या नवव्या मराठी विज्ञान संमेलनानिमित्त भरवलेल्या विज्ञान रंजन कथा स्पर्धेसाठी पाठविली. नारळीकर वैज्ञानिक आहेत त्यामुळे ते सतत प्रयोग करत असतात. त्यात ते थोडया गंमतीही जाणून बुजून करतात. पण त्या मागे वेरकेपणा नसतो तर शुद्ध प्रामाणिक हेतू असतो. उदा. कृष्णविवर ही कथा मराठी विज्ञान परिषदेच्या कथा स्पर्धेत ना. वि. जगताप नावाने पाठवली कारण त्यांनी जयंत नारळीकर नावाने पाठवली असती तर परीक्षकांवर अगोदरच दडपण आले असते. शिवाय नारळीकर आदल्याच वर्षी म्हणजे १९७३ मध्ये जालन्यास झालेल्या आठव्या मराठी विज्ञान संमेलनाचे अध्यक्षही झालेले होते. त्यामुळे नावाच्या दडपणामुळे पहिले बक्षीस मिळण्याऐवजी नाव बदलून कथेचा कस पणास लागावा ही त्यामागची प्रामाणिक इच्छा होती. अशा या प्रामाणिक शास्त्रज्ञ आणि विज्ञान साहित्यिकाने सावदेकरांनी केलेल्या टीकेवर त्यांची मते विचारावयास गेलो असता दिलेली वरील उत्तरे प्रामाणिक नाहीत असे का म्हणावे ?

अ. पां. देशपांडे
बी. ५ जलाराम ज्योत
वल्लभबाग रोड, घाटकोपर (पूर्व)
मुंबई–४०००७७

चुकीची दुरुस्ती

युगवाणी मार्च–एप्रिल' ८५ अंकात 'ड्रायव्हर 'ही कविता सुभाष. सु. थेपडे या नावावर प्रसिद्ध झालेली आहे. वस्तुत: ही कविता श्री. मनोहर जाधव यांची आहे. 'ती थेपडे प्रकाशन' साठी आलेली असतांना चुकून युगवाणींकडे पाठविल्याबद्दल, स्वत: श्री. थेपडे यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

संपादक

पत्र

माननीय संपादक, युगवाणी,
स. न.

युगवाणी मे-जून अंकात अरुण साधू यांच्या विज्ञान कादंबऱ्या आधारित आहेत असा उल्लेख माझ्या 'मराठी विज्ञान-कादंबरी' या लेखात आहे. यासंबंधी श्री. अरुण साधू यांचे मला पुढील-प्रमाणे पत्र आलेले आहे–

प्रिय श्री. घाटे

युगवाणी मे-जून अंकात आपल्या लेखात माझ्या तथाकथित विज्ञान कादंबऱ्या आधारित असल्याचे आपण लिहिले आहे आणि ते पुन्हा मला विचारून लिहिले असेही आपण म्हटले आहे.

माझ्या समजुतीप्रमाणे या दोन्ही कादंबऱ्या संपूर्णपणे स्वतंत्र आहेत. कोठल्याही कथेचा वा कादंबरीचा आधार घेतलेला नाही. मग आपल्याला कसे सांगणार ? दुर्दैवाने वाचन कमी असल्याने ओ. सी. क्लार्कच्या ज्या कादंबरीवर मी विप्लवा बेतलेली आहे असे आपण म्हटले ती मी पाहिलेली नाही.

मी जर कादंबऱ्या कशावरून आधार घेऊन लिहिल्या असत्या तर तसे सांगण्यास मुळीच लाज वाटली नसती. लेख वाचून आश्चर्य वाटले. कृपया युगवाणीच्या पुढील अंकात दुरुस्ती करू शकाल काय ?

आ. नम्र.
अरुण साधू.

याबद्दल माझा खुलासा असा.

मागच्या दिवाळीच्या सुमारास मी अरुण साधूंना स्फोट आणि विप्लवा आधारित आहेत अशा अर्थाचे पत्र लिहिले होते. त्यावर त्यांचे उत्तर आलेले नव्हते. पुढे डॉ. विश्वेश्वर सावदेकर यांनाही असाच अनुभव आल्याचे त्यांनी मला सांगितले. कदाचित साधूंना ती पत्रे मिळाली नसावीत. त्यात मी लिहीले होते–चाअील्डहुड्स अेंड आणि विप्लवा यात कथानकाचे बरेच साम्य आढळते. तसेच स्फोट आणि लेस्ली शार्तरीज्च्या 'सेंट' कथा मधल्या अेका कथेत आणि बाबूराव अर्नाळकरांच्या झुंजार आणि भैरवनाथ, तसेच गोलंदाज कथात साम्य आढळते. याचा अर्थ याच कथांवर साधूंनी आपली कादंबरी बेतली असा होत नाही, असे त्यांच्या पत्रावरून वाटते. हेच पत्र आधी मिळते तर माझ्या हातून ही चूक झाली नसती. या चुकीबद्दल श्री. अरुण साधू मला माफ करतील अशी आशा आहे. मी साधूंच्या विज्ञानकथांना 'तथाकथित' म्हटलेले नाही.

कृपया वरील पत्रास आपल्या पुढील अंकात प्रसिद्धी द्यावी. कळावे

आपला
निरंजन सिं. घाटे

ता. क. माझ्या लेखात 'बहुतेक सर्व लेखकांना विचारून' असे वाक्य आहे.

नि. घाटे

कवी कथाकारांसाठी

• युगवाणी नव्या–जुन्या प्रतिभावंत साहित्यिकांचे व्यासपीठ आहे. युगवाणी प्रत्येक दर्जेदार कथा कवितेची आवर्जून दखल घेते. तुमच्या नव्या समर्थ कथा-कवितांना युगवाणीत स्थान आहेच !

जनकवी कै. भवानीप्रसाद मिश्र

तारा धर्माधिकारी

हिंदीचे प्रसिद्ध महाकवी दिनकर म्हणतात, माझी भवानी बाबूंच्या काव्यावर भक्ती आहे कारण त्यांची भाषा सरळ व अभिव्यक्ती प्रांजळ आहे. माझ्या काळात जे अनेक थोर कवी होऊन गेले त्या सर्वात भवानीबाबूंच्याबद्दल मला असा मोह होई की या कवितेखाली आपले नाव असायला हवे होते ! हिंदी साहित्यातील या महाकवीने गौरवलेले भवानी प्रसाद मिश्र यांच्या निधनाने हिंदी साहित्याची फार मोठी हानी झाली आहे एवढेच नव्हे तर आपण एका संवेदनशील लोककवीला व मानवनिष्ठ नागरिकाला मुकलो आहोत.

कै. भवानीबाबूंची शब्दसामर्थ्यावर अपार श्रद्धा होती. काव्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून संजीवनाचे उपकरण आहे असे त्यांनी मानले होते. शब्दासाठी आणि शब्दामागील प्रेरणांसाठी हाल-अपेष्टा व मरण पत्करण्याची त्यांची तयारी होती म्हणून त्यांचे जीवन एका निष्ठावंत कवीचे जीवन होते. गांधीवादाचे चिंतन अत्यंत सफलतापूर्वक काव्यस्तरावर उतरविणारे भवानीबाबू एक श्रेष्ठ कवी, साहित्यिक, संपादक, कलाकार होते. गांधी साहित्याचे वर्षानुवर्ष चिंतन, संपादन करून-ते समाजात हरतऱ्हेने रुजविण्यासाठी प्रयत्न करणारे ते एक महान साधक होते. त्यांना संपत्ती, प्रसिद्धी प्रतिष्ठा कीर्ती यांचा यत्किंचितही मोह नव्हता. साधी रहाणी व उच्च विचारसरणी हे त्यांच्या जीवनाचे रहस्य होते म्हणूनच हिंदी साहित्यातही त्यांना एक आगळेच स्थान होते. ज्या ज्या क्षेत्रात त्यांनी काम केले त्या त्या ठिकाणी आपल्या प्रेमळ वाणीने आणि ऋजू स्वभावाने साऱ्यांना आपलेसे करून घेतले.

ज्यावेळी मध्ययुगीन हिंदी कविता शब्दांच्या अलंकाराने नटून सजून घुंगट काढून मान्यवर साहित्यिकांभोवती घोटाळण्यातच दंग होती, त्यावेळी भावना व कल्पनांच्या प्रभावाने भारलेल्या छायावादी कवींनी हिंदी साहित्यात प्रवेश केला होता, त्या काळात भवानीबाबूंनी अगदी सामान्य माणसाच्या हृदयाचा वेध घेऊन, त्याला आपल्या काव्याचा विषय बनवून काव्यनिर्मिती केली. साधेपणा हा त्यांच्या काव्याचा प्राण आहे छंद-रचना सोपी आहे. भाषा अलंकृत बोजड नाही. ही सहजता प्राप्त करण्यासाठी कवीला कठोर परिश्रम, दांडगा अभ्यास व साधना करावी लागते. हिंदी साहित्य सामान्य जनांच्या जीवनाचे संजीवन ठरावे अशी त्यांना ओढ होती म्हणून गंभीर विचार, गहनविषय त्यांनी सोप्या भाषेत जनते-पर्यंत पोहचविले. मान्यवर साहित्यिकांप्रमाणे, सामान्य वाचक आणि श्रोताही त्यांच्या काव्यावर लुब्ध होता. सामाजिक बांधिलकी हा त्यांच्या जीवनाचा संकल्प होता. समाजातील अन्याय शोषण, अज्ञान, दुष्काळ, निराशा या साऱ्या अन्यायाला त्यांच्या काव्याने वाचा फोडली. त्यांची शैली पूर्णत: त्यांची व्यक्तिगत काव्यशैली होती, ज्या शैलीने हिंदी साहित्यात एक नवी पायवाट निर्माण केली.

जीवन परिचय

कै. भवानी प्रसाद मिश्र यांचा जन्म मध्यप्रदेशातील होशंगाबाद जिल्ह्यात असलेल्या टिगाळी

अनुक्रमणिका

यां गावी २६ मार्च १९१३ रोजी झाला. शिवनी माळव्याच्या सीमेवर असलेल्या विंध्याचल आणि सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या रेवा नदीकाठी निसर्गानेच त्यांचे जीवन घडविले एका मध्यमवर्गीय कान्यकुब्ज ब्राह्मण परिवारात जन्मलेल्या कै. भवानीबाबूंचे बाळपण, शालेय शिक्षण, खांडवा बैतूल, सुहागपूर, नरसिंगपूर येथेच झाले. महाविद्यालयीन शिक्षण जबलपूरच्या रॉबर्टसन कॉलेजात झाले.

बी. ए. पास झाल्यावर ठराविक चाकोरीचे सुखमय जीवन जगण्याकडे त्यांनी पाठ फिरविली व म. गांधींच्या प्रेरणेने स्वत:ला स्वातंत्र्य आंदोलनात झोकून दिले.

"दो सूत कातो और दाने चार उपजाओ
कि तुम खाते पहनते हो जरासी शर्म तो खाओ।।
ही त्यांची काव्यपंक्ती त्यांच्या तारुण्यातील ध्येयवादी जीवनाचे प्रकटीकरण होती. १९४२ ते १९४५ पर्यंत ते कारावासात राहिले. तेथे त्यांचे भरपूर अध्ययन झाले. "वह मेरे अध्ययन-पठन का स्वर्णयुग था" अशा शब्दात त्यांनी त्या काळाचे वर्णन केले आहे. गांधीवादी जीवनमूल्यांचे जतन ही त्यांची जीवननिष्ठा होती. विचार आणि आचार यात कधीच तफावत नव्हती.

त्यांनी आपल्या जीवनात विविध क्षेत्राचे अनुभव घेतले. जेलमधून बाहेर आल्यावर त्यांनी महिलाश्रम वर्धा येथील राष्ट्रीय शाळेत चार वर्षे शिक्षकाची नोकरी केली. १९५०-५१ वर्धा येथे राष्ट्रभाषा प्रचार समितीचे कार्य केले. १९५२ ते १९५५ पर्यंत हैदराबाद येथे 'कल्पना' मासिकाचे संपादन केले. १९५६ ते ५८ मुंबई, दिल्लीच्या, आकाशवाणी केन्द्रावर हिंदी कार्यक्रमाचे संचालन केले. चित्रपटासाठी त्यांनी गीत संवाद सुद्धा लिहिले आहेत.

१९५८ ते १९७२ सतत संपूर्ण गांधी वाङ्मयाचे संपादन केले इतके ते गांधीसाहित्याचे भोक्ते होते. कै. काका कालेलकरांनी देखील भवानीबाबू बद्दल आदर व्यक्त करून त्यांचे काव्य प्रेरणादायक आहे असे म्हटले होते. त्यांनी गांधी स्मारकनिधी, गांधी शांती प्रतिष्ठान आदि अनेक गांधीवादी संस्थांशी निगडित राहून लेखन व सेवाभावी कार्याला स्वत:ला वाहून घेतले होते. ते पत्नी-मुले व मुली यांच्यासह कौटुंबिक आयुष्य अत्यंत समाधानात जगले. त्यांच्या जीवनात गाढ निसर्गप्रेम, 'मानवतेबद्दलची अतूट आत्मीयता आणि सहज अभिव्यक्तीचे कृतीशील, चिंतनशील भावदर्शन यांचा विलक्षण मेळ होता. काव्यात शब्दमाधुर्य व शब्दशक्ती होती. त्यांच्या 'गीत फरोश', 'खुशबू के शिलालेख' या काव्यसंग्रहांनी तर रसिकांना वेड लाविले. त्यांनी हिंदी काव्यात नवे युग निर्माण केले पण त्यांचे काव्य छायावाद, प्रगतीवाद, प्रयोगवाद, नवी कविता यांच्या कुठल्याही चौकटीत न मावणारे होते.

"जी हाँ हुजूर, मैं गीत बेचता हूँ,
मैं तरह-तरह के गीत बेचता हूँ,
मैं किसिम-किसिम के गीत बेचता हूँ।...
जी, पहले कुछ दिन शर्म लगी मुझको;
पर बाद-बाद में अक्कल जगी मुझको,
जी, लोगों ने तो बेच दिये ईमान,
जी, आप न हों सुन कर हैरान-
मैं सोच समझकर कर आखिर
अपने गीत बेचता हूँ...
है गीत बेचना वैसा बिल्कुल पाप,
क्या करू मगर लाचार

या काव्य पंक्तीने रसिकांना वेड लावले. हिंदी कवितेच्या प्रांतात नवीन युगाची सुरवात झाली राष्ट्रभक्ती, क्रांती, निर्भयता यांचे गीतनिमंत्रण

त्यांचा 'गांधी पंचशती' काव्यसंग्रह म्हणजे म. गांधींना अर्पण केलेली शाश्वत श्रद्धांजली. ते गांधीवादाचे, गांधी साहित्याचे व गांधी तत्त्वज्ञानाचे भोक्ते होते. राष्ट्रीय आंदोलनात जीवन समर्पित करणाऱ्या भवानीबाबूंच्या या कविता त्या काळच्या अनेक सामान्य माणसांच्या आशा आकांक्षा ध्वनित करणाऱ्या आहेत. गांधीजींच्या विचारांसोबत आजारानेहि प्रभावित झालेले भवानीबाबू अखेरपर्यंत गांधी साहित्य, गांधीवाद आणि गांधींच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेल्या व्यक्ती यांच्या सोबतच जगले. त्यांचे जीवन म्हणजे गांधीजींच्या प्रेरणांची, साहित्याची व्यक्तिमत्त्वाची, आठवणींची कहाणी बनले. स्वातंत्र्यासाठी बलिदान करण्यासाठी तत्पर असलेले भवानी बाबू म्हणतात...

"चलो गीत गाओ, चलो गीत गाओ
कि गा गा के दुनिया को सिर पर उठाओ
अभागों की टोली अगर गा उठेगी
तो दुनिया पे, दहशत बडी छा उठेगी ..
अगर गा न पाये, तो हल्ला करेंगे
इस हल्ले में मौत आ गई तो मरेंगे,
कई वार मरने से जीना बुरा है..."

देशभक्तीने पेटून उठलेले त्यांचे मन आक्रंदते...

हमे चुनना है हमारा काम इस जलती घडी में
चुप नही हम बैठ रह सकते कभी चलती घडी में
जल रहा है आज सब कुछ,
लाख छोटा हो, बडा हो
फूल हो, पत्थर हो कोमल हो कि
फिर चाहे कडा हो
जल रहा है इस लपेट में कहीं माँ का लाल कोई
राख होता है सती सिंदूर शोभा भाल कोई।"

आपल्या क्रांतीतत्त्व कवितेत ते लिहितात,

"हमारी बात में जिंदादिली है।
हमारे ख्याल में हर चीज फानी।
कहो या मत कहो बदलेंगे सब कुछ।
फना की कोख से लेकर जवानी।"

त्यांचे मन अत्यंत संवेदनाशील आहे त्यामुळे त्यांची कविता हृदयाला भिडणारी आहे. गांधीपंच–शतीच्या बऱ्याच कविता म्हणजे त्यांच्या १९४५ च्या तरुण जीवनातील कवीमनाचा उत्कट भाव आहे. 'अभयगान' मध्ये ते म्हणतात...

'तू किसे देगा अभय जो खुद हुआ। दलगीर मन
लौ लगेगी क्या अगर
टपकायगा तू नीर मन्।
दर्द है भीतर तो अपनी दर्द की किमत चुका
प्यार प्रत्यंचा से अपने देह की धन ही झुका
छोड दे विश्वास के उस पर चढाकर तीर मन
तू किसे देगा अभय जो खुद हुआ दिलगीर मन।
काम से ताकद बढेगी काम से सुझेगी बात
काम की किरनो से क्या खाकर भला जूझेगी रात
काम का सूरज तेरे हाथो में तू है मीरमन
तू किसे देगा अभय जो खुद हुआ दिलगीर मन।'

अशा अत्यंत सोप्या पण हृदयाला हलवून सोडणाऱ्या भाषेत भवानीबाबू आपल्या रसिक श्रोत्याला मोहून टाकीत. त्यांनी १९३० ते १९६९ पर्यंत लिहिलेल्या या पंचशतीतील कविता त्यांच्या राष्ट्रीय आंदोलनातील जीवनकाळाचे भावविश्व पुन्हा आपल्या डोळ्यासमोर उभ्या करतात.

त्यांच्या कविमनाचा विचार करताना ते एका प्रस्तावनेत लिहितात–"मैं कविता नहीं लिखता, कविता मुझको लिखती है। हो सकता है यह बात सुनने में अजिब लगे। किन्तु मैं इस अंतर को जानता हूँ और मुझे खबर है कि यह अंतर मेरे व्यक्तित्व का अंश है" या त्यांच्या कविता कधी एकांतात गातात, कधी कधी जनसमुदायाबरोबर गातात. या जगात प्रत्येक वस्तूचे प्रयोजन आहे यावर त्यांचा ठाम विश्वास होता. ते निसर्गाशी फार एकरूप झाले होते. म्हणूनच त्यांचे निसर्गकाव्य रसिकांचे अत्यंत आवडते ठरले.

निसर्गकवी

त्यांच्या 'गीतफरोश' काव्यात निसर्गावर सर्वात अधिक आणि अप्रतिम कविता आहेत. निसर्गाशी ते समरस झाले होते. निसर्ग त्यांच्या जीवनाचे अध्यात्म होते. त्यांचे निसर्गवर्णन शब्द सौंदर्याने नटलेले आहेच परंतु तितकेच सखोल आणि मनाला स्पर्शून जाणारे आहे. त्यांची 'सतपुडा के जंगल', मध्ये विहरणारी काव्यदृष्टी 'नर्मदा के चित्र' रेखाटते, भग्न खंडहराचे 'सन्नाटा' ऐकते आणि 'आषाढ', 'पहिला पानी' पाहून 'मेघदूत'च्या कल्पनेत तर कधी 'घर की याद' मध्ये रममाण होते. त्यांच्या या सर्व कविता निसर्गाशी किती निकटचा, नित्याचा संबंध होता हे सिद्ध करतात. ते प्रकृतीला केवळ वंदन करीत नाहीत तर तिच्या स्पंदनाशी एकरूप होतात म्हणून त्यांची निसर्गकाव्ये हिंदी साहित्यात अद्वितीय ठरली.

"सतपुडा के घने जंगल
नींद में डूबे हुए से
ऊंघते अनमने जंगल।...
घेसो इनमें डर नही है,
मौत का यह घर नही है
उतर कर बहते अनेकों
कल कथा कहते अनेकों
नदी निर्झर और नाले,

इन बनों ने गोद पाले,
लाख पंछी सौ हिरन दल,
चाँद के कितने किरन दल..."

त्यांच्या लघु कविता तर फारच लोकप्रिय ठरल्या. शब्दांची तरलता व सखोल अर्थ या दोन्ही गुणांमुळे त्यांचे काव्य सहज, सोपे पण अर्थवाहक वाटते. त्यांच्या या लघुकाव्याचे स्वरूप जपानी 'हायकू' काव्यस्वरूपासारखे असले तरी ते उधार उसनवार नाही. त्याचा आत्मा अस्सल भारतीय आहे. कारण त्यात सखोल चिंतन आहे.

नमुना पहा–

चट्टान चुप रही
पानी बोलता रहा
मिलाती रही हवा
हाँ में हाँ...
तुमने कभी ठीक से देखा भाला है ।
अंधेरा कॉफी हद तक उजाला है ।
सफेत काफी हद तक काला है ।

कविता बोली भाषेत करणे त्यांना अधिक पसंत होते. १९७१ नंतर त्यांचा पाचवा संग्रह 'बुनी हुई रस्सी' प्रकाशित झाला तेव्हा ते प्रौढ मान्यताप्राप्त कवी झाले होते. शब्दाचा जादुगार म्हणून सिद्धहस्त कवीच्या रूपात जनतेसमोर आले होते. त्यानंतर त्यांना दीर्घ आजाराने घेरले व मग आठवा संग्रह 'खुशबू के शिलालेख' प्रसिद्ध झाला व त्यातील अनेक कवितांना रसिकांनी डोक्यावर घेतले.

त्यांच्या 'गीत फरोश'ने आधुनिक हिंदी कवितेत नवा प्रवाह आणि नवीन काव्यतरंग निर्माण केले. सामान्यांच्या जीवनातील जे विषमतेचे काव्य आहे ते त्यांनी हेरले आणि त्याला कविताबद्ध केले कविता त्यांनी बाह्य प्रेरणेने किंवा प्रयोजनाखातर कधीच केली नाही. त्यांची काव्यरचना उत्स्फूर्त होती, त्यात संवाद आहे, त्यामुळे एक दुसऱ्याला जोडण्याची ताकद आहे. सामान्य माणसाला समजेल अशा भाषेत त्यांनी काव्यरचना केली. ते कोणत्याही 'वादाचे' कवी नव्हते, ते लोकजीवनात जगणारे कवी होते. माणसातील वेदनेचे, जमिनीवर प्रेम करणाऱ्या साध्या भोळ्या शेतकऱ्याचे भारतीय निसर्गाचे, लोकजीवनाचे एक अपूर्व काव्य रचले. विपुल शब्दशक्ती, जीवनानुभवाचा अथांग आशय यांनी त्यांचे काव्य वैभवशाली बनले आणि वाचकांच्या व श्रोत्यांच्या मनात खोलवर रुजले. अचूक शब्द प्रयोग हाच कवितेचा आत्मा असतो. भवानीबाबूंच्या काव्याचे सामर्थ्य त्यातूनच प्रकट होते. म्हणून ते सांगत

शब्दों का सही उपयोग
योग है,
और कल्याणकारी है,
योग की तरह ।
उसका मनमाना उपयोग
भोग है,
और विनाशकारी है–भोग की तरह ।

त्यांच्या काव्याचा विषय सामान्य माणूस आहे. सामान्यांचा प्रतिनिधी म्हणून ते जन्मभर जगले. यांचा ठाम विश्वास होता की हाच भारताच्या लोकशाहीचा विधाता आहे. त्यांची 'गाव' कविता आजही तितकीच जिवंत वाटते–

सहन नहीं होती अब
गाँवों की ये साँसे
दु:ख के स्तब्ध थके मांदे पाँवो से पीडित
कब तब इनकी छाती पर हमारे
शार्दूलविक्रीडित

हिंदी साहित्य क्षेत्राच्या गटबाजीत ते सामील झाले असते तर त्यांची साहित्यरचना अनेक पटींनी वाढली असती, मानमरातब, कीर्ती वाढली असती, पण ते भाट नव्हते, कवी होते. त्यांचे जीवनच गांधीविषयक सर्वोदयाला वाहिलेले होते. "दर्शन में अद्वैत, वाद में गांधी का और टेक्नीक में सहज लक्ष्यही मेरे बन जायें ऐसी कोशीश की है, और अधिक क्या कहूं ? इतना भी न कहता तो ज्यादा अच्छा लगता"–इतकी विनयशील वृत्ती या थोर मनाच्या कवीच्या ठायी होती. परंपराप्रिय वाचक व श्रोते यांनी भवानीबाबूंना सन्मानित केले त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने लोकप्रियता व श्रद्धा त्यांना नवीन रचनाकारांकडून मिळाली. दोन्ही पिढयांकडून त्यांच्या काव्यांचे उत्स्फूर्त स्वागत झाले.

त्यांचे 'गीतफरोश' राष्ट्रीय भावना, सामाजिक वेदना निसर्गसौंदर्य आदि विविध विषयावरील

अनुक्रमणिका

कवितांनी समृद्ध आहे 'चकित है दुःख' या संग्रहात कवीने आपल्या जीवनात कमावलेले समग्र सत्य प्रगट केले आहे. उत्कटता, अभिनव अनुभूती, उचित शब्दप्रयोग या साऱ्यांचा समन्वय या काव्यात आहे. त्यांच्या काव्याने यावेळी चांगलेच प्रौढ व गंभीर वळण घेतले.

'अंधेरी कविताएँ' ह्या संग्रहातील जवळपास पंचावन कविता त्यांनी १५ दिवसात लिहिल्या. हृदयविकाराचे झटके आल्याने ते अंथरुणावर पडून होते परंतु त्यातही त्यांचा उदासीनतेचा, निराशेचा सूर कुठे दिसून येत नाही. त्यात आत्मस्वीकृतीचा अंशच अधिक आहे. त्यांचा मानवतेवर अढळ विश्वास आहे–

कीमते बदल रही है. जीवन की मरण की
इसलिए अब हम उतनी चिन्ता नही करते
गति की यति की यहाँ तक कि चरण की
इस अपने देश की अंधेरी रात में
भरोसा मुझे समाज में नही है,
भरोसा व्यक्ति में है,
व्यक्तित्व रखने वालों की जमात में है
जाग्रत समाज के अभाव में
व्यक्तित्ववान व्यक्ती दीपक है
फिर वह छोटा है कि बडा
बिजली का है या तेल का
मिट्टी का है कि काँच का
अपने अपने द्वारों पर
कम ज्यादा जैसे बने उजालो करो।

प्रसिद्ध कवी हरिवंशराय बच्चन लिहितात की छायावादानंतर हिंदीला भाषेची सरळता आणि उदात्तता दिली हे भवानीबाबूंचे फार मौलिक कार्य आहे. प्रसिद्ध साहित्यिक जैनेंद्रजी पण म्हणतात की भवानीबाबूंची कविता मला नित्य नूतन वाटते कारण त्यात जीवनाची आशा आकांक्षा व जिज्ञासा असते.

'खुशबू के शिलालेख' हे त्यांचे सर्वोत्कृष्ट काव्य मानले गेले कारण तेच त्यांच्या समग्र व्यक्तित्वाचे व स्फूर्तीचे चित्रण आहे. त्यात त्यांच्या संपूर्ण जीवनाचा संदेशही आहे आणि अभिव्यक्ती देखील आहे. सुख, शांती सौंदर्य आणि प्रेम हे मानवी जीवनाचे प्रयोजन आहे त्यासाठी त्याची तृष्णा मिथ्या नाही. त्याच्या जीवनात अंतिम वस्तु दुःख नाही, सुख आहे, अंतिम लक्ष्य संघर्ष वा मृत्य नाही-सुख आणि शांती आहे, जीवन आहे. या विचारांनी प्रेरित झालेले भवानीबाबू मनुष्याच्या आंतरिक बळाला, अध्यात्मिक जीवनसुगंधाला फार मोलाचा मानतात, आणि यालाच यथार्थवाद समजतात...

आदिम सुगन्ध आदमी को
हर कीचड से उपर रख सकती है
पंकज की तरह
रखती भी है
यह मैंने जाना है
और यह भी जाना है
कि जितने दिन जियूंगा
यह सुगन्ध, केवल पियूंगा नही
फैलाऊंगा, सुगन्ध लिखूंगा
सुगन्ध गाऊँगा।

जीवनातील पलायनवाद त्यांना मान्य नव्हता, ते लोककवी होते. जीवनाला सामोरे गेले, जीवन जगू इच्छित होते. शब्दपारंगत ते होतेच पण केवळ काव्यरचनेत संतुष्टता नव्हती. ते शब्दांना जिवंत करू इच्छित होते. यालाच जीवनाचा अध्यात्म व योगी जीवनातील काव्य सृजनता म्हणता येईल. भवानीबाबूंच्या काव्यातील नाविन्याचा स्रोत त्यांच्या अंतरात्म्याच्या मौलिक, सौंदर्यपूर्ण संवेदनशीलतेतच आहे.

विशेषतः 'खुशबू के शिलालेख' कविता भावनांचा आविष्कार करणारी सर्जनशील कविता आहे. नवकाव्याची प्रातिनिधिक कविता असून शब्दमाधुर्य आणि आनंद याचा रसिकाला खराखुरा आस्वाद देणारी आहे. या काव्याचे वैशिष्टच असे आहे की ही निसर्गकविता एक नवा आयाम प्रकट करणारी आहे. यात निसर्ग आणि मानवी मनोव्यापार एकरूप झाले आहेत एवढेच नव्हे तर सुगन्ध, रंग, शब्द आणि प्रकाश या साऱ्यांचीच भागीदारी आपापली भूमिका समर्थपणे वठवीत आहे. त्यांच्या काव्यसाधनेचा बीजमंत्र नर्मदेच्या तीरावर रुजला. निसर्गाबद्दल ते नेहमीच कृतज्ञापूर्वक उद्‌गार काढतात...

यह जो वन है

असल में वह मेरा मन है...
जितना लिया है मेरे मन ने
पंछी से, वृक्ष से, बादल से, नदी से, वन से...'

हिंदीच्या या ऋषीतुल्य कवीने हिंदी कवितेला अध्यात्मिक जीवनाची उंची गाठताना जणू उपनिषदांच्याच पातळीवर नेऊन ठेवले आहे. त्यांच्या काव्याची उत्कट निर्मिती व अस्वस्थता जणू वेदांच्या ऋचा बनून त्यांचा सुगंध दूरवर दरवळत आहेत.

भवानीबाबूंच्या काव्याचे वैशिष्ट्यच असे आहे की त्यांची कविता ही अंतःप्रेरणेतून झाली होती. ही अंतःप्रेरणा सत्य व अनुभूतीची होती म्हणूनच अत्यंत मौलिक व निजस्वरूपात्मक होती. त्यांचे काव्य काळातील आहे काळाबरोबर वाहून जाणाऱ्या Conditioned Mind चा तो श्वासोच्छ्वास नव्हता, तो एक स्वतंत्र चैतन्यमय मंत्रोच्चार होता. युगसंघर्षातून आविष्कारित झालेला हा काव्यसुगंध केवळ या युगाच्या आत्म्याचे रुदन आणि स्पंदन नव्हता वर या युगाचा संवाहक बनला. त्यांचे काव्य काळ आणि परिस्थितीची निर्मिती नव्हते

भवानीबाबू भावनांच्या धाराप्रवाहात वाहणारे प्रचलित वादांमध्ये सामावणारे कवी नव्हते ते स्वतंत्र प्रज्ञेचे, मूल्यांची निष्ठा बाळगणारे, चिंतनशील कवी होते. त्यांच्या काव्यसृष्टीची पार्श्वभूमी इतकी विराट आणि विशाल आहे की येणाऱ्या युगासाठी या काव्ययात्रेची नोंद झाल्याशिवाय राहणार नाही असे हिंदीतील प्रख्यात समीक्षकांचे मत आहे.

भवानीबाबूंची कवीसंमेलने ऐकलेले श्रोते त्यांना कधीच विसरू शकणार नाहीत. त्यांची कविता म्हणण्याची पद्धत अनोखी होती. ते कविता गातही नव्हते व वाचतही नव्हते. पण या दोहोंचा एक सुंदर मिलाप त्यांच्या काव्यगायनात होत होता. त्यामुळे सुरात शब्द हरवत नव्हते आणि शब्दांमुळे सूरही बेसूर होत नसे. त्यांच्या मृत्यूमुळे हा अवर्णनीय आनंद व अनुभव संपुष्टात आला आहे पण त्यांनीच लिहून ठेवल्याप्रमाणे त्यांची कविताच आता आपल्याला सोबत करू शकणार आहे. भवानीबाबूंच्या मृत्यूनंतर त्यांचे शब्दकाव्य त्यांनी लिहिल्याप्रमाणे सदैव सोबत करीत राहणार आहे.

आदमी मर जाता है
रह जाती है उसकी चीजें
चश्मा और छडी
कलम और घडी
पेन्ट और कमीजें ।
दु:ख देती हैं ऐसी चीजें
आदमी से ज्यादा जीकर !
कभी कभी छोड जाता है
कोई आदमी चीजें नही बातें
काट देते हैं जिनके सहारे
बाद के लोग
अँधेरी से अँधेरी रातें !
सुख देती हैं ऐसी बातें, ऐसे शब्द
आदमी से ज्यादा जीकर !

□ □

(बूँद–बूँद आकाश)

तारा धर्माधिकारी
११, सारंग, भोसले मार्ग
मुंबई–२१.

अनुक्रमणिका

केन्द्रीय कार्यवृत्त : विदर्भ साहित्य संघ

दि. १ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबर १९८५

दि. २–९–८५ सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात येऊन आदरांजली वाहण्यात आली.

दि. ५–९–८५ महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागातर्फे "शिक्षक दिन" रंगमंदिरात साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमास वि. सा. संघाचे विशेष सहकार्य होते.

दि. ८–९–८५ मराठी साहित्य महामंडळाची बैठक वि. सा. संघात झाली. बैठकीस प्राचार्य राम शेवाळकर, मनोहर म्हैसाळकर, प्रा. श्रीकांत तिडके व वामनराव तेलंग उपस्थित होते.

दि. ९–९–८५ शासकीय ग्रंथालयाच्या सहकार्याने "वाचक व्यासपीठ" ह्या कार्यक्रमात कवी सुधाकर गायधनी यांच्या कवितांचे वाचन व रसग्रहण करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर होते. वक्ते होते डॉ. वि. स. जोग.

दि. १०, ११, १२, १३–९–१९८५ कै. रघुनाथराव आष्टीकर स्मृति मराठी विनोदी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेत डॉ. नागसेन गाणार स्मृती प्रतिष्ठानने सादर केलेल्या "कथा दिनूच्या मृत्युपत्राची" या एकांकिकेने निर्मिती, दिग्दर्शन आणि अभिनय (पुरुष) या तिन्ही अंगांची प्रथम पारितोषिके पटकावून तिहेरी मुकुटाचा मान मिळविला. स्पर्धेतील लेखनांत प्रथम पारितोषिक श्री. गणेशकुमार वडोदकर यांनी तर कुमारी पद्मा मालाकार हिने सर्वोत्कृष्ट महिला अभिनयाचे पारितोषिक पटकाविले. वि. सा. संघाच्या टिळक सभागृहात दिनांक १३–९–८५ रोजी संपन्न झालेल्या या पारितोषिक वितरणाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथील ख्यातनाम अभिनेते व दिग्दर्शक श्री. अशोक साठे उपस्थित होते. त्यांनी कलावंतांना पारितोषिके देऊन समयोचित मार्गदर्शन केले. परीक्षकांतर्फे श्री. बाळकृष्ण गावली यांनी मनोगत व्यक्त करून संपूर्ण स्पर्धेचा आढावा घेतला. या समारंभास सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी, ज्याप्रमाणे यावर्षीपासून निर्मितीची पारितोषिके वाढविली आहेत, त्याचप्रमाणे वि. सा. संघ पुढील वर्षापासून वैयक्तिक स्तरावरील पारितोषिकांच्या रोख रकमांमध्ये वाढ करील असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे संचालन आमंत्रक श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले व आभार प्रदर्शन श्री. दिनेश दगडकर यांनी केले,

सर्वश्री बाळकृष्ण गावली, श्याम बंड आणि सौ. गौरी अंधारे या परीक्षकांनी स्पर्धेतील ११ एकांकिकांचे मूल्यमापन करून दिलेला निकाल असा.

निर्मिती

१. कै. गणेश सखाराम अंधारे फिरती ढाल व ३०१/– "कथा दिनूच्या मृत्युपत्राची" (डॉ. नागसेन गाणार स्मृति प्रतिष्ठान), २. रु. २०१/–"ओळख" महावैक स्पोर्टस अॅण्ड रिक्रीएशन क्लब) आणि ३. रु. १०१/– "असावे प्रेम शेजारी" (युनायटेड वेस्टर्न बँक, गोंदिया)

अभिनय (पुरुष)

१. रु. २०/– डॉ. श्री. विलास उजवणे व २. रु. १५/– श्रीकांत गोडबोले

अभिनय (महिला)

१. रु. २०/– कु. पद्मा मालाकार व २. रु. १५/– सौ. ममता एदलाबादकर

दिग्दर्शन : श्री. राजू कुबेर लेखन : श्री. गणेशकुमार बडोदकर

उत्तेजनार्थ पारितोषिके

१. पुरुष अभिनय : श्री. रंजू पैठणकर, २. स्त्री अभिनय सौ. आशा दारव्हेकर, ३. लेखन : श्री. श्रीकांत गोडबोले.

दि. १३–९–८५ विदर्भ साहित्य संघाच्या अन्य भाषा साहित्य विभागातर्फे, हिंदी दिनाच्या निमित्ताने शहरातील विविध भाषिक संस्थांच्या सहभागाने मराठी व हिंदीवरील अन्याय निवारणार्थ एका मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

भाषिक एकतेचे प्रदर्शन करणारा हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम होता. सर्व शासकीय कामकाज पूर्णपणे मराठीतून करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरण–अंमलबजावणीस होत असलेला विलंब ध्यानात आणून देऊन हिंदी अकादमीचेही कार्य सुरू व्हावे या करिता तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून निघालेल्या ह्या आगळ्या मोर्चाने मुख्यमंत्र्यांना पाठविण्याकरिता एक निवेदन जिल्हाधिकाऱ्यांजवळ दिले. मोर्चाचे नेतृत्व अन्य भाषा साहित्य विभागाचे आमंत्रक प्रा. श्रीपाद भालचंद्र जोशी, सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर, ज्येष्ठ नागरिक व समाजसेवक उमेश चौबे, हरीश अडयाळकर यांनी केले. मोर्चाचे वतीने श्री. उमेश चौबे, मनोहर म्हैसाळकर, प्रा. श्रीपाद भालचंद्र जोशी, वल्लभदास डागा यांच्या प्रतिनिधी मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, लोहिया अध्ययन केन्द्र, साहित्य सेतु, ललित कला भारती, नागपूर जिल्हा साहित्य संघ, जययुवक क्रांती दल, दलित पँथर, उर्दू स्टडी सर्कल, विचार विथी इ. संस्थांच्या प्रतिनिधींचा या उपक्रमात सहभाग होता.

दि. १४–९–८५ दलित रंगभूमी ह्या संस्थेच्या "शहर" ह्या पथनाटयाचा १०० वा प्रयोग रंगमंदिरात वि. सा. संघाच्या सहकार्याने सादर करण्यात आला.

दि. १५–९–८५ सांस्कृतिक संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित केलेल्या एक महिन्याच्या नाटय प्रशिक्षण शिबिरास संघाने विशेष सहकार्य दिले.

दि. २२–९–८५ कै. मामा वरेरकर यांचा स्मृतिदिन व श्रीचक्रधर स्वामी यांचा जन्मदिन पाळण्यात आला.

दि. २४–९–८५ वि. सा. संघाचे एक कार्यकर्ते श्री. वल्लूभैय्या जोग यांचा पहिला स्मृतिदिन पाळण्यात आला. ह्या प्रसंगी सुधाकर गायधनी, डॉ. वि. स. जोग, श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रभृतींची समयोचित भाषणे झाली.

दि. २८–९–८५ प्रसिद्ध हिंदी लेखक व पत्रकार श्री. रामकुमार "भ्रमर" यांचेशी लेखक व वाङ्मयप्रेमी यांची "बातचीत" घडवून आणण्याचा एक कार्यक्रम अन्य भाषा साहित्य विभागाच्या वतीने आयोजिण्यात आला. हिंदीच्या विकासाचे प्रश्न व मराठी आणि अन्य भाषा यांचे परस्पर संबंध तसेच श्री. भ्रमर यांचे लेखन यावर विस्तृत चर्चा घडून आली. अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर, प्रसिद्ध साहित्यिक डॉ. वसंत वऱ्हाडपांडे, श्री. हरीश अडयाळकर, उमेश चौबे, प्रमोद पुराणिक, प्रा. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी चर्चेत भाग घेतला.

दि. २८/२९–९–८५ परीक्षा समितीतर्फे सप्टेंबर सत्रातील परीक्षा विविध केंद्रांवर घेण्यात आल्या. एकूण ६५० परीक्षार्थी विविध परीक्षांत सम्मीलित झाले. वि. सा. संघाचे परीक्षा केंद्र सुळे हायस्कुल, धंतोली हे होते. यावर्षी केंद्रास अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर, उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग, डॉ. शि. गो. देशपांडे, सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर, आमंत्रक धनवटे रंग मंदिर श्री. अ. ल. लिमये यांनी भेट दिली.

माननीय श्री. भवानीशंकर नियोगी ह्यांनी आपल्या वयाचे शतक पूर्ण केले म्हणून संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर, उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग, सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर ह्यांनी त्यांचे निवासस्थानी जाऊन अभीष्टचिंतन केले.

विख्यात ज्येष्ठ कवी श्री. गु. ह. देशपांडे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकसभा घेऊन दुख॰वटा व्यक्त करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रा. राम शेवाळकर हे होते.

दि. ३०-९-८५ " फ्रेंच रंगभूमी एक आकलन " या विषयावर नागपूर विद्यापीठाच्या फ्रेंच विषयाच्या अध्यापिका प्रा. सौ. लतिका मांडे यांचे व्याख्यान अन्य भाषा साहित्य विभागाचे वतीने आयोजिण्यात आले होते. प्रा. प्रमोद देव यांनी सौ. मांडे यांचा तर प्रा. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी अन्य भाषा विभागाच्या विविध योजनांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. शि. गो. देशपांडे हे होते.

दि. १-१०-८५. कविवर्य अण्णाजी बोबडे याचा स्मृतिदिन पाळण्यात आला.

जबलपूर येथील राणी दुर्गावती विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. त्रिलोकनाथ पांडेय यांची वि. सा. संघास भेट अन्य भाषा साहित्य विभागाचे वतीने प्रा. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी घडवून आणली. उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग, सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर, श्री हरीश अडयाळकर, उमेश चौबे, डॉ सत्यप्रकाश सक्सेना इ. मंडळी या प्रसंगी उपस्थित होती.

परीक्षा समितीतर्फे दि. १-१०-८५ रोजी वि. सा. संघाच्या मोडी लिपी वर्गाचा उद्घाटन समारंभ डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते झाला. शिवशाहीर विजयराव देशमुख यांनी शिवकालीन मोडी व तिचा उपयोग विशद करून मोडी लिपीचे अभ्यासक तयार झाल्यास प्राचीन मराठी साहित्याचा अभ्यास करणे सुकर होईल असे प्रतिपादन केले मोडी लिपीचे हे वर्ग वि. सा. संघाच्या वास्तूत सायंकाळी ६.३० ते ७.३० च्या दरम्यान होतात. मोडी लिपीचे प्राथमिक शिक्षण याद्वारे देण्यात येते. श्री. विजयराव देशमुख यांच्या सहकार्यामुळे हा एक महत्त्वाचा उपक्रम वि. सा. संघाला सुरू करता आला हे विशेष.

दि. २-१०-८५ राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्मदिन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून साजरा करण्यात आला.

दि. ४-१०-८५ हल्का-ए-अहबाब या संस्थेच्या सहकार्याने चालविण्यात येणाऱ्या उर्दू प्रशिक्षण वर्गाचा समारोप संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. शि. गो. देशपांडे यांचे हस्ते प्रमाणपत्रे वितरण करून करण्यात आला.

दि. १२-१०-८५ केंद्रीय कार्यकारिणीची १९८५ मधील तिसरी नियमित सभा झाली.

दि. १३-१०-८५ नांदेड येथील अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष व सुप्रसिद्ध कथाकार श्री. शंकर पाटील यांचा जाहीर सत्कार संघातर्फे करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य राम शेवाळकर होते. श्री. वामनराव चोरघडे ह्यांनी ह्या प्रसंगी आशीर्वादपर भाषण केले, तर डॉ. द. भि. कुळकर्णी ह्यांनी श्री. पाटील यांच्या साहित्यगुणांचे आणि वैशिष्टयांचे विवेचन केले.

याच वेळी डॉ. आशा सावदेकर ह्यांनी संपादन केलेल्या व वि. सा. संघाने प्रकाशित केलेल्या कवी कै. ज. के. उपाध्ये यांच्या समग्र कवितासंग्रहाचे श्री. शंकर पाटील यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.

ह्याच दिवशी सकाळी कला दालनात कै. नलिनी जतकर स्मृति शालेय चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. विदर्भ साहित्य संघाच्या वतीने आयोजित कै. सौ. नलिनी जतकर स्मृती शालेय बाल चित्रकला स्पर्धेत अ गटातून पं. बच्छराज व्यास हायस्कूलची शीतल पारेख व ब गटातून

भिडे गर्ल्सची सुनीता अंवुलकर यांना प्रथम पारितोषिक मिळाले, तर सर्वाधिक बक्षिसे मिळविणाऱ्या भिडे गर्ल्स हायस्कूलला कै. सौ. नलिनी जतकर स्मृती फिरती ढाल मिळाली आहे.

इतर निकाल असे, अ गट द्वितीय चेतना चौधरी, भिडे गर्ल्स, उत्तेजनार्थ अभिजित कऊटकर (केशव नगर उच्च प्राथमिक), संवीम दासपाटनायक (एस्. ए. एस.), ब गट लिना शेंडे (भिडे गर्ल्स), उत्तेजनार्थ पी. व्ही. कानेटकर (सी. पी. ॲन्ड बेरार, महाल), प्रवीण भनारे (सुळे हायस्कूल). या स्पर्धेत १५ शाळांतून ५२ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रसिद्ध साहित्यिक शंकर पाटील, प्राचार्य राम शेवाळकर, वामन तेलंग, मनोहर म्हैसाळकर, योगेश बम्हाणपुरे व देणगीदार डॉ. डोकस व सौ. सिंधुताई डोकस यांनी दालनास भेट दिली. प्रा. धनंजय वर्मा, प्रकाश कावळे, बोरसे, दीपक जोशी यांनी परीक्षक म्हणून काम केले.

चंद्रकांत चन्ने, संजय धोतरकर, प्रमोद कानेटकर, सुनिता महाजन, प्रतिभा भोंडे यांनी यशस्वितेसाठी परीश्रम घेतले. आमंत्रक प्रकाश एदलाबादकर यांनी स्पर्धेचे संचालन केले.

दि. १४–१०–८५ मद्रासचे सुप्रसिद्ध तेलगु साहित्यिक श्री. एन. आर. चेन्दूर ह्यांनी सपत्नीक वि. सा. संघाला भेट दिली व संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

दि. १८–१०–८५ "धूमकेतू येत आहे" हा कार्यक्रम, त्याविषयी असलेले औत्सुक्य लक्षात घेऊन स्लाईड व भाषणासह आयोजित करण्यात आला. सादरकर्ते डॉ. प्रबोधचंद्र देशमुख होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मधुसूदन चान्सरकर हे होते. वि. सा. संघाने विज्ञान परिषदेच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या वेगळया प्रकारच्या कार्यक्रमाला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला.

शाखा कार्यवृत्त

बाळापूर : दि. २८–८–८५ रोजी शाखेच्या स्थायी समितीची नियुक्ती श्री. विठ्ठलराव घोपटे गुरुजी यांचे निवासस्थानी झाली. त्यात खालील कार्यकारिणी अविरोध निवडण्यात आली.

कार्योपाध्यक्ष	: श्री. श्रीपाद सोनाजी धनोकारगुरुजी
चिटणीस	: श्री. मदनभाई गुजराथी
सहचिटणीस	: श्री. वि. रा. घोपटेगुरुजी
खजीनदार	: श्री. त्र्यं. दी. पाठक
कार्यप्रमुख	: श्री. मधुकरराव गोखलेगुरुजी
सदस्य	: (१) डॉ. ल. वि. काळे, (२) श्री. द. अ. म्हैसनेगुरुजी, (३) श्री. गजानन खुजदेकर, (४) श्री. मुरलीधर धनोकार.

लाखनी : दि. २५–८–८५ रोजी शाखेची आमसभा पार पडली. प्रथम कै. यशवंतराव चव्हाण व कै. वसंत वरखेडकर, के. मा. मुन्शी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नवीन वर्षासाठी खालीलप्रमाणे कार्यकारीणीची निवड करण्यात आली.

१. शाखाध्यक्ष : श्री. बि. ग. कांवळे, २. कार्योपाध्यक्ष : प्रा. दि. पा. लाखनीकर, ३. कोषाध्यक्ष : खु. मो. बारसागडे, ४. चिटणीस : श्री. द. सा. बोरकर, ५. सहचिटणीस : श्री. ना. द. भुरे, कार्यक्रम प्रमुख : श्री. र. सं. गिन्हेपुंजे, ६. सदस्य : सर्वश्री शिवनकर, भुसारी, मोटघरे, चवळे, भावते.

दि. १६–९–८५ रोजी रात्री ८.३० वाजता प्रा. विसुभाऊ बापट पुणे यांचा "कुटुंब रंगलंय काव्यात" हा एकपात्री काव्य वाचन, गायनाचा कार्यक्रम पार पडला. श्री. विसुभाऊ बापट यांचे शाखेतर्फे शाखाध्यक्ष श्री. कांबळे यांनी हार व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

बुलढाणा : दि. ३१-८-८५ व दि. १-९-८५ ला सर्व सामाजिक असे "बुलढाणा जिल्हा महिला साहित्य संमेलन" पार पडले. स्त्रियांच्या साहित्य, सांस्कृतिक कलागुणांना वाव मिळून हे गुण अधिकाधिक विकसित होण्यासाठी वातावरण निर्माण व्हावे म्हणून हा नावीन्यपूर्ण उपक्रम आहे. संमेलनाचे उद्‌घाटन विदर्भातील नामांकित तळमळीच्या महिला समाज कार्यकर्त्या प्रा. रूपा कुळकर्णी यांनी केले, तर अध्यक्षस्थान प्रा. सौ. विद्या कावडकर यांनी भूपविले होते.

नांदुरा : दि. ५-९-८५ रोजी सायं. ५ वाजता स्थानिक कोठारी विद्यालयाच्या सभागृहात शाखा उद्‌घाटनाचा समारोह संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षक श्री. नि. रा. पाटील होते व प्रमुख अतिथी संस्कृतचे गाढे अभ्यासक श्री. नानासाहेब पांडे होते.

त्यानंतर नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. १. अध्यक्ष-श्री. श्री. वि. गुजर, २. उपाध्यक्ष-श्री. पु. मा. जोशी, ३. सरचिटणीस, श्री. द्वा. वा. नवगज, ४. चिटणीस-श्री. श्या. वा. काळवीट, श्री. जयंत नांदेडकर, ५. कोषाध्यक्ष-श्री. ज. द. फिरके, ६. सदस्य-सर्वश्री दीक्षित, कुळकर्णी, तायडे, महाजन, पालीवाल.

घुग्गुष : १५-८-८५ रोजी शाखेच्या वतीने जनता विद्यालयातील शिक्षक श्री. मांडवकर गुरुजी यांच्या स्वरचित वऱ्हाडी कवितांचे वाचन व नकलांचा कार्यक्रम पार पडला. शाखेचे सभासद श्री. टावरी यांनीही ग्रामीण कवितांचे वाचन केले. सरचिटणीस श्री. राम वोडेवार यांनी कार्यक्रमाचे संचालन व समारोप केला.

दि. २२-८-८५ रोजी आम सभा घेण्यात आली व त्यात नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

कार्याध्यक्ष श्री. आबाजी डाहूले २. कार्योपाध्यक्ष श्री. अरुण राऊत, श्रीमती प्रमिलाताई पाटील ३. सचिव श्री. नरेंद्र जोशी ४. कोषाध्यक्ष श्री. गणेश मडावी ५. सहसचिव डॉ. सुरेश कोल्हे, श्रीमती पद्मा जोशी ६. प्रसिद्धी प्रमुख श्री. गिरीश डांगे ७. महिला प्रतिनिधी कु. डॉ. व्रिजुला मसारकर ८. सदस्य सर्वश्री कळमकर, ढेंगणे, कानमपल्लीवार, धपकस, कानडे, घोटेगुरूजी.

गोंदिया : दि. २-१०-८५ रोजी भावगीत स्पर्धा पार पडली. ३९ स्पर्धकांनी भाग घेतला होता. विजय वरूडकर, श्री. गुलाबभाई जोशी व सौ. माधुरी तेलंग या परीक्षकांनी निवडलेल्या विजेत्या स्पर्धकांना सौ. वसुधा देव यांचे हस्ते पारितोषिके देण्यात आली. गट क्र. १ प्रथम क्रमांक कु. श्रुती तोडकर, द्वितीय क्रमांक कु. संजीवनी भारद्वाज, तृतीय क्रमांक कु. तृप्ती चरडे.

गट क्र. २ प्रथम क्रमांक सौ. शिवांगी कायंदे, द्वितीय क्रमांक कु. प्रांजला चरडे व तृतीय क्रमांक कु. संध्या गलांडे, स्पर्धेचे संचालन श्री. प्रकाश देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन सचिव श्री. वासु भारद्वाज यांनी केले.

पुलगाव : दि. १६-१०-८५ रोजी शाखेचा १५ वा वर्धापनदिन अध्यक्ष श्री. जेमिनी कडू, उद्‌घाटक डॉ. मदन भट्ट, व्याख्याता केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती यांचे हस्ते पार पडला. गुरुवार दि. १८-१०-८५ रोजी रात्री ८ वाजता नवोदित गायिका कु. आश्विनी ठोंबरे वर्धा यांचा गायनाचा कार्यक्रम थाटाने पार पडला.

देऊळगावराजा : १७-१०-८५ विदर्भ साहित्य संघ शाखा देऊळगावराजाचे उद्‌घाटन प्रसिद्ध कथालेखक प्राचार्य रा. रं. वोराडे वैजापूरयांचे हस्ते, श्रीमंत राजे राजेन्द्रसिंह जाधव यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. शाखा सचिव श्री. वि. दे. गव्हाणकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. शाखा अध्यक्ष प्राचार्य अ. त्रि. अभ्यंकर यांनी प्राचार्य वोराडे यांचा परिचय त्यांच्या कथातून करून दिला. संस्थेचे सध्या ६० सदस्य असून ही संख्या लवकरच वाढेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी बोलताना प्राचार्य वोराडे म्हणाले की, "अशा साहित्य स्थांनी साहित्य जोपासणे व साहित्याविषयी आवड निर्माण करून नवोदित लेखकांना प्रोत्साहित करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले

पाहिजे, आजचे शिक्षण हे आपल्या गुणांची जाणीव निर्माण करून देते. तर साहित्य संस्थांनी अशा गुणांना खतपाणी घालून साहित्य निर्माण करणे महत्त्वाचे कार्य आहे. साहित्य संघात असलेल्या गटबाजीवर त्यांनी मार्मिक टीका करून घटकांनी अशांना दूर ठेवले पाहिजे." आपल्या दोन तासाच्या भाषणात त्यांनी अनेक कथा ऐकविल्या. कथा कशी प्रसरल्या जाते व ती कशी वाढते हे अनेक गमतीदार प्रसंगातून त्यांनी सांगितले. मी एक गुराखी होतो. लहानपणी खेड्यात गुरांमागे फिरत होतो, पण लेखणी हातात घेतली, कथा लिहिल्यात. जनतेने स्वागत केले व आज कथाकार म्हणून उभा आहे. असे अनेक गुराखी खेड्यात आहेत, पण त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे व हे कार्य साहित्य संघाने करावे अशी त्यांनी विनंती केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपाध्यक्ष श्री. कि. झि. देशमुख यांनी केले. शेकडो स्त्री–पुरुष व साहित्य प्रेमी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

कारंजा : दि. २१–१०–८५ रोजी कारंजा शाखेचे उद्घाटन वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते झाले व खालील कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

कार्याध्यक्ष : प्राचार्य डॉ. अं. रं. असोलकर, कार्योपाध्याय : श्री. नरेंद्र निळकंठ नंदे, सौ. मीना कारंजेकर, सचिव : प्रा. सुभाष ज. गढीकर, सहसचिव : श्री. दीपक दर्यापूरकर, खजिनदार : श्री. मोहनलाल गोलेच्छा, सदस्य : प्राचार्य श्री. अरुण देशपांडे, श्री. प्रकाश राऊत, श्री. दिवाकर इंगोले.

मारेगाव दि. १०–१०–८५ मारेगाव साहित्य संघ शाखेची सर्वसाधारण मासिक सभा गृह पंचायत सभागृहात मोकळया वातावरणात सुरू झाली.–त्यात सुधाकर गायधनी यांचा काव्य–वाचन गायन कार्यक्रम दि. १२–१०–८५ ला घेण्याचे ठरले. याप्रसंगी संघाचे २५ सभासद उपस्थित होते. त्यात नवीन सभासद करवून जुन्यांचे नूतनीकरण करण्यात आले तर साहित्य संघातर्फे सदस्यांकडून एक सुंदर नाट्य प्रयोग घेण्याचाही गोड निर्णय ह्याच सभेत टाळयांचा कडकडाटात घेण्यात आला.

दि. १२–१०–८५ रोजी प्राथमिक शाळेच्या भव्य सभागृहात मारेगाव येथील संघाचे सभासद व ग्रामीण नवोदिताचे एक छोटेखानी कवी–संम्मेलन ठीक ९–३० वाजता सुरू झाले. त्यांत ह्या नवोदित रचनाकारांनी भाग घेतला. श्री. ऋषीकेष सिरपूरकर, अशोक पाचपोर, चंद्रकांत किन्हेकार, तुळशीराम महाजन (पायकार) शैलिश पांडे, वैरागडे. प्रल्हाद लिहितकर, प्रा. कोडगिरवार, डॉ. श्रीराम कोल्हे ते हे होत. ह्या सुखमयी सोहळयाचे अध्यक्ष डॉ. कोल्हे हे होते. तर संचालन कर्मे प्रा. ताकसांडे अध्यक्ष वि. सा. संघ मारेगाव आणि समारोप व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक श्री. पांडुरंग किन्हेकर सचिव वि. सा. संघ मारेगाव यांनी केले असे प्रसिद्धी सचिव कळवितात.

जवाहरनगर १७–१०–८५ (१) दि. ४ ऑगस्ट रोजी वि. सा. संघाच्या जवाहर नगर शाखेची स्थापना करण्यात आली.

(२) महाप्रबंधक आयुध निर्माण भंडारा (जवाहर नगर) यांची परवानगी दि. १७ ऑक्टो. ला प्राप्त झाली व त्यानंतरच खऱ्या अर्थाने कार्य सुरू झाले.

(३) आज तारखेस ४२ सदस्य आहेत.

(४) ६ ऑक्टो. ला सायंकाळी ४–३० वाजता वि. सा. संघ जवाहर नगर शाखेचे उद्घाटन प्रा. राम शेवाळकर अध्यक्ष वि. सा. संघ यांचे हस्ते महाप्रबंधकांच्या अध्यक्षतेखाली पार पाडले.

(५) आजपर्यंत कार्यकारिणीच्या दोन सभा अनुक्रमे दि. २ ऑक्टो. व १५ ऑक्टो. ला झाल्या.

लाखनी १७–१०–८५ आमच्या शाखेच्या आठव्या वर्धापन दिनाचे अध्यक्ष श्री. पुंडलिकराव तिरपुडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून श्री. प्रा. प्र. ल. पराड, समर्थ महाविद्यालय लाखनी यांना पाचारण करण्यात आले होते.

"साहित्यात जीवनाभूती हवी. जीवनातील आर्तता, मंगलता व वास्तवता चित्रित करणारे व समाजाला सुयोग्य मार्गदर्शन करणारे साहित्य अमर ठरते." अशा आशयाचे उद्‌गार प्रा. प्र. ल. पराड यांनी याप्रसंगी काढले. जीवन शिक्षण सोसायटीचे (संस्था) अध्यक्ष श्री. पुंडलिकराव तिरपुडे यांनी मी व्यवहारी माणूस असून साहित्याभिरुची बाळगणारा रसिक असल्याचे कथन केले. प्रास्ताविक कार्यवाह द. सा. वोरकर तर आभार प्रदर्शन शाखाध्यक्ष श्री. वि. ग. कांबळे यांनी केले.

याप्रसंगी लाखनी केंद्रातून मराठी विषयात प्रथम आलेल्या खालील विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रशस्तीपत्रे देण्यात आली.

(१) वर्ग १० वा अभिजीत आनंदराव खोलकुटे स. वि. लाखनी (२) वर्ग १२ वा भरतराज रामचंद्र हलमारे स. म. वि. लाखनी (३) वाङ्‌मय स्नातक (बी. ए.) कु. जिजा काशीरामजी पडोळे स. म. वि. लाखनी.

चित्रकला स्पर्धेचे मानकरी

गट १ ला–वर्ग ५ ते ७ (१) कु. प्रिती अशोक तत्ववादी रा. ल. वि. (२) दीपक श्रावण मेश्राम (३) स्मिता नेमीचंद गायधनी रा. ल. वि.–सर्व लाखनी.

गट २रा–वर्ग ८ ते १० (१) रवीन्द्र दवलतराव मेश्राम जि. प. वि. पोहरा (२) संजीव रामदास वोरकर जि. प. वि. पोहरा (३) ओमदेव शंकरराव गिऱ्हेपुंजे स. वि. लाखनी.

–वरील विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रशस्तीपत्रे देण्यात आली.

नवीन आजीव सभासद

श्री. प्रभाकर शंकरराव देशमुख, विवेक गोविंद पळशीकर, डॉ. सौ स्मिता विवेक पळशीकर, सौ. अलका गंगाधर गरुड, सौ. शुभांगी मुकुंद भडभडे (सर्व नागपूर), हरिश्चंद्र प्रभाकर वोरकर (लाखनी)

नवीन मान्यताप्राप्त शाखा

१. गडचिरोली (जि. गडचिरोली) २. जवाहर (जि. भंडारा) ३. कारंजा लाड (जि. अकोला)

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ.

युगवाणी कथा / एकांकिका स्पर्धा–८५

निकाल

खालील लेखकांच्या कथा / एकांकिकांची निवड झालेली आहे. त्यांचे अभिनंदन व ज्या इतर सर्व लेखकांनी स्पर्धेत भाग घेतला त्यांचे आभार.

कथा	लेखक
तथास्तू	श्री. हरिहर आठलेकर, सावंतवाडी
वारसा	रमेश दा. गाडे, नागपूर
इट–हॅपन्स	प्रवीण बर्दापूरकर, नागपूर

एकांकिका	लेखक
द् डेथ	विजय साळवी, रत्नागिरी
आम्ही बाकीचे	शंकर परचुरे, जुना जालना
एक असतो कावळा एक असते चिमणी	प्रकाश जोशी, अकोला.

निवडलेल्या कथा / एकांकिका युगवाणी नोव्हें.–डिसें. ८५ मध्ये दिवाळी अंकात प्रसिद्ध होतील.

–कार्यकारी संपादक